सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९४९ चा मुंबई अधिनियमं क्रमांक २५.

# मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९.

(१२ जुलै २००१ पर्यंत सुधारलेला)

BOMBAY ACT No. XXV OF 1949.

# The Bombay Prohibition Act, 1949.

*(As modified up to 12th July 2001)*

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई–४, यांच्याद्वारे प्रकाशित.

२००१

[ किंमत १३.०० रुपये ]

# मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९.

## अनुक्रमणिका


| कलमे | उद्देशिका | पृष्ठ |
|---|---|---|
| | **प्रकरण एक** | |
| | **प्रारंभिक** | |
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | २ |
| २. | व्याख्या. | २ |
| | **प्रकरण दोन** | |
| | **आस्थापना** | |
| ३. | आयुक्त, दारुबंदी व उत्पादन शुल्क | १० |
| ४. | जिल्हाधिकारी | १० |
| ५. | दुय्यम अधिकारी | ११ |
| ६. | या अधिनियमान्वये असलेले अधिकार व कर्तव्ये पोलीस विभागाच्या आणि इतर विभागांच्या अधिकाऱ्यांकडे सोपविणे. | ११ |
| ६-क. | तज्ञ मंडळ. | १२ |
| ७. | इतर मंडळे आणि समित्या | १३ |
| ८. | वैद्यक मंडळे | १३ |
| ९. | दारुबंदी अधिकाऱ्यांवर व इतर अधिकाऱ्यांवर आयुक्ताचे नियंत्रण. | १४ |
| १०. | प्रत्यायोजन | १४ |
| | **प्रकरण तीन** | |
| | **मनाई** | |
| ११. | मादक द्रव्य तयार करणे वगैरे यांस या अधिनियमाच्या तरतुदी, नियम, वगैरे यांस अनुसरून परवानगी देणे. | १४ |
| १२. | दारू तयार करण्यास व दारूची भट्टी किंवा दारू गाळण्याचा कारखाना बांधण्यास किंवा चालविण्यास मनाई. | १४ |
| १३. | दारूची विक्री, वगैरे करण्यास मनाई. | १५ |
| १४. | मादक औषधिद्रव्ये निर्यात करणे, आयात करणे, त्याचे परिवहन करणे, ते विकणे, तयार करणे वगैरे यांस मनाई. | १५ |
| १५ | गोड ताडीची आयात, निर्यात, परिवहन, विक्री वगैरेस मनाई. | १५ |
| १६. | ताडी देणारी झाडे छेदण्यास व त्यापासून ताडी काढण्यास मनाई | १५ |

| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| | **प्रकरण तीन—चालू** | |
| १७. | अफू जवळ बाळगणे, वगैरे यास मनाई | १५ |
| १८. | अज्ञान व्यक्तींना मादक द्रव्य विकण्यास मनाई | १६ |
| १९. | **(वगळण्यात आले)** | १६ |
| २० | चरसाचे उत्पादन करणे, वगैरे यास मनाई | १६ |
| २१. | विप्रकृत केलेल्या मद्यसारात बदल करणे | १६ |
| २१-क. | विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थात बदल करणे | १६ |
| २२. | कोणतीही जागा दारूचा गुत्ता म्हणून वापरण्यासाठी परवानगी देण्यास मनाई | १७ |
| २२-क. | नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीने मादक दारूसाठी औषधोपचाराचे औषधपत्र देण्यास मनाई. | १७ |
| २३. | मादक द्रव्य किंवा भांग वापरण्याची विनंती करण्यास अथवा जनतेतील एखाद्या व्यक्तीस अपराध करण्यास चिथावणी किंवा उत्तेजन देण्याच्या हेतूने कोणतेही कृत्य करण्यास मनाई. | १७ |
| २४. | मादक द्रव्य, वगैरे यासंबंधीच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यास मनाई | १८ |
| २४-क. | हे प्रकरण काही पदार्थास लागू नसणे. | १९ |
| | **प्रकरण चार** | |
| | **नियंत्रण, विनियमन व सूट** | |
| २५. | सिद्धपदार्थास सूट देणे. | २० |
| २६. | मादक द्रव्यांसाठी भट्टया व वखारी. | २० |
| २७. | वखार, वगैरे यातून मादक द्रव्य किंवा भांग काढून न नेणे. | २० |
| २८. | आयात, वगैरेसाठी पास. | २० |
| २९. | थेट वाहतूक. | २१ |
| ३०. | **(वगळण्यात आले)** | २१ |
| ३१. | खरोखरीच्या वैद्यकीय किंवा इतर प्रयोजनांकरिता लायसन. | २१ |
| ३१-क. | कलम २४-क मध्ये नमूद केलेले पदार्थ तयार करण्याकरिता, दारू खरेदी करणे वगैरेसाठी लायसन. | २१ |
| ३२. | नीरेसाठी झाड छेदण्याचे लायसन. | २२ |
| ३३. | व्यापार व आयात लायसन | २२ |
| ३४. | विक्रेत्याचे लायसन. | २२ |
| ३५. | हॉटेल लायसन. | २३ |
| ३६. | **(वगळण्यात आले)** | २३ |
| ३७. | **(वगळण्यात आले)** | २३ |
| ३८. | नौवहन कंपनीस व जहाजाच्या प्रमुखास लायसन देणे. | २४ |
| ३९. | युद्धनौका, सेनानौका, सेनादलाची भोजनालये व आहारगृहे यांत परदेशी दारू वापरण्याची किंवा सेवन करण्याची परवानगी. | २४ |
| ४०. | परवाने. | २४ |
| ४०-क. | आरोग्य परवाने. | २५ |
| ४०-ख. | निकडीचे परवाने. | २६ |

कलमे पृष्ठ

प्रकरण चार—चालू

४१. परकीय राज्यातील राजे वगैरे यांना खास परवाने. .. .. २६
४२. **(वगळण्यात आले)** .. .. .. २७
४३. विवक्षित परवाने धारण करणाऱ्या व्यक्तींनी परदेशी दारू वापरणे किंवा तिचे सेवन करणे याचे विनियमन. २७
४४. क्लब यांना लायसन. .. .. .. २७
४५. धार्मिक विधीसाठी प्राधिकारपत्र देणे. .. .. २८
४६. अभ्यागताचे परवाने .. .. .. २९
४६-क. प्रवाशाचा परवाना. .. .. .. २९
४७. अंतरिम परवाने .. .. .. ३०
४८. मादक औषधिद्रव्ये किंवा अफू सेवन करण्यास किंवा वापरण्यास परवाने .. ३०
४८-क. परवाने अहस्तांतरणीय असणे. .. .. ३०
४९. शासनाचा मादक द्रव्ये, इत्यादी आयात करण्याचा अनन्य विशेषाधिकार आणि आकारल्या जाणाऱ्या फीमध्ये संबंधित व्यक्तीला असा विशेषाधिकार देण्याबद्दलच्या भाड्याचा किंवा मोबदल्याचा समावेश असणे. ३१
५०. **(वगळण्यात आले)** .. .. .. ३१
५१. **(वगळण्यात आले)** .. .. .. ३१
५२. काही बाबतीत लायसने, परवाने व पास देण्याचा प्राधिकृत अधिकाऱ्याचा अधिकार. ३१
५३. लायसने, वगैरे यासंबंधी सर्वसाधारण शर्ती .. .. .. ३१
५३-क. विवक्षित लायसनदारांनी मापे, वगैरे ठेवणे. .. .. ३२
५४. लायसने व परवाने रद्द करण्याचा किंवा तहकूब करण्याचा अधिकार. .. ३२
५५. लायसन वगैरे धारण करणाऱ्या व्यक्तीस ते रद्द केल्याबद्दल किंवा तहकूब केल्याबद्दल भरपाई मिळण्याचा किंवा फी परत मिळण्याचा हक्क असणार नाही. ३३
५६. इतर कारणांसाठी रद्द करणे. .. .. .. ३३
५७. लायसन जप्त करणे .. .. .. ३४
५८. लायसनअन्वये असलेला हक्क, स्वामित्वहक्क किंवा हितसंबंध आदेशिकेची बजावणी करताना विकला जाण्यास किंवा जप्त केला जाण्यास पात्र नसणे. ३४
५८-क. उत्पादन, वगैरेवर देखरेख ठेवणे .. .. .. ३४
५९. लायसन धारण करणाऱ्या व्यक्तीस किंवा मालकास साठ्याची विल्हेवाट लावण्या-विषयी फर्माविण्याचा आयुक्ताचा अधिकार. ३५

प्रकरण चार–क

**कलम २४-क मध्ये नमूद केलेल्या पदार्थांचा मादक दारू म्हणून उपयोग करण्यास प्रतिबंध करण्याकरिता त्यावर नियंत्रण ठेवणे व त्याचे विनियमन करणे.**

५९-कक. कलम २४-क मध्ये नमूद केलेल्या पदार्थांच्या उत्पादनावर नियंत्रण .. ३६
५९-क. कलम २४-क मध्ये नमूद केलेले पदार्थ तयार करणे .. .. ३६
५९-ख. कलम २४-क मध्ये नमूद केलेल्या पदार्थांचे पृथक्करण. .. .. ३७

कलमे पृष्ठ

प्रकरण चार--ख

**विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थांचा मादक दारू म्हणून उपयोग करण्यास प्रतिबंध करण्यासाठी विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थांवर नियंत्रण ठेवणे आणि त्याचे विनियमन करणे.**

५९-ग. विहित केलेल्या मर्यादेहून अधिक प्रमाणात विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ जवळ ठेवण्यास प्रतिबंध आणि विहित केलेल्या मर्यादेहून अधिक प्रमाणात ते ठेवल्यास त्याचे विनियमन. . . ३८

५९-घ. विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ तयार करणे वगैरेंवर विनियमन. . . ३९

प्रकरण पाच

**मोहाची फुले**

६०. (१) मोहाच्या फुलांच्या निर्यातीस किंवा आयातीस मनाई. . . ३९

(२) मोहाच्या फुलांचे परिवहन, विक्री वगैरे यांवर नियंत्रण व त्यांचे विनियमन. ३९

प्रकरण सहा

**काकवीवर नियंत्रण व तिचे विनियमन**

६१. काकवीची निर्यात, वगैरे यावर नियंत्रण. . . ४०

६२. कलमे ५३ ते ५९ यांच्या तरतुदी कलम ६१ अन्वये दिलेल्या लायसनच्या बाबतीत लागू होणे. . . ४०

६३. काकवीबाबतच्या या अधिनियमाच्या तरतुदी या सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८ याच्या तरतुदीच्या जोडीने असतील व त्यामुळे उक्त अधिनियमाच्या तरतुदीचे न्यूनीकरण होणार नाही. . . ४१

६४. **(वगळण्यात आले)** . . ४१

प्रकरण सात

**अपराध व शास्ती**

६५. मादक द्रव्ये किंवा भांग यांची बेकायदेशीररीत्या आयात करणे, इत्यादीबद्दल शास्ती ४१

६६. भांगेची बेकायदेशीररीत्या लागवड करणे व ती गोळा करणे आणि इतर गोष्टींबद्दल शास्ती. ४२

६६-क अफूची बेकायदेशीररीत्या आयात करणे, वगैरे बद्दल शास्ती. . . ४३

६७. विप्रकृत मद्यसारात फेरबदल करणे किंवा फेरबदल करण्याचा प्रयत्न करणे याबद्दल शास्ती. ४४

६७-१क. विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थात फेरबदल करणे किंवा फेरबदल करण्याचा प्रयत्न करणे याबद्दल शास्ती. ४४

६७-१ख. औषधोपचाराच्या औषधपत्रांसंबंधी असलेल्या तरतुदीचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. ४५

६७-क. कलम ५९-क च्या तरतुदीचे उल्लंघन करून कलम २४-क मध्ये नमूद केलेले पदार्थ तयार करण्याबद्दल शास्ती. ४५

कलमे पृष्ठ

प्रकरण सात––चालू

६७-ख. पोट-कलम (१) खाली आयुक्ताची खात्री करून देण्यात किंवा कलम ५९-ख, पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या आदेशाचे पालन करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती. ४७

६७-ग. कलमे ५९-ग व ५९-घ यांच्या तरतुदींचे उल्लंघन करून विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ जवळ बाळगणे, वगैरेबद्दल शास्ती. ४७

६८. दारूचा सार्वजनिक गुत्ता उघडणे, वगैरे याबद्दल शास्ती. . . ४८

६९. मोहाच्या फुलांची बेकायदेशीररीत्या आयात करणे, वगैरे याबद्दल शास्ती. . . ४८

७०. काकवीची बेकायदेशीररीत्या आयात करणे, वगैरे याबद्दल शास्ती.. . ४९

७१. **( वगळण्यात आले )** . . . . ४९

७२. मादक पदार्थ, वगैरे नेण्याबद्दल शास्ती. . . ४९

७३. या अधिनियमाच्या तरतुदी, वगैरेचे उल्लंघन करून जाहिराती छापणे किंवा प्रसिद्ध करणे याबद्दल शास्ती. ४९

७४. मादक द्रव्ये, वगैरे यासंबंधी जाहिराती असलेली वर्तमानपत्रे वगैरे यांचा प्रसार करणे, वगैरे याबद्दल शास्ती. ५०

७५. काही कृत्ये करण्यास चिथावणी देणे किंवा उत्तेजन देणे याबद्दल शास्ती. . ५०

७५-क. कलम ४३ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.. . . . ५१

७६. मापे, वगैरे ठेवणे यात हयगय केल्याबद्दल शास्ती.. . . . ५१

७७. लायसनदाराने, वगैरे गैरवर्तन केल्याबद्दल शास्ती.. . . . ५१

७८. लायसन दिलेल्या विक्रेत्याने किंवा माल तयार करणाऱ्या व्यक्तीने गैरवर्तन केल्याबद्दल शास्ती. ५२

७९. नोकरांच्या अपराधाबद्दल लायसनदाराची जबाबदारी. . . . ५२

८०. कोणत्याही व्यक्तीने दुसऱ्याच्या वतीने मादक द्रव्याची आयात, निर्यात करणे. . ५३

८१. प्रयत्न करणे किंवा अपप्रेरणा देणे याबद्दल शिक्षा.. . . . ५३

८२. लायसन, परवाना, वगैरे यांचा भंग करणे हा अपराध असणे, . . ५३

८३. कट करण्याबद्दल शास्ती. . . . . ५३

८४. कोणत्याही सार्वजनिक गुत्त्यात दारू पिऊन धुंद झाल्याचे आढळून आल्याबद्दल शास्ती. ५४

८५. दारू पिऊन धुंद झाल्याबद्दल व गैरशिस्त वागणुकीबद्दल शास्ती. . . ५४

८६. या अधिनियमाखालील अपराध करण्यासाठी कोणतीही जागा वापरण्याची परवानगी देण्याबद्दल शास्ती. ५४

८७. रसायनी औषधे विकणारी व्यक्ती, औषधे विकणारी व्यक्ती किंवा औषध विक्रेता यास आपली जागा त्यात दारूचे सेवन करण्यासाठी वापरण्याची परवानगी दिल्याबद्दल शास्ती. ५५

८८. खोटी चिकित्सापत्रे दिल्याबद्दल शास्ती. . . . ५५

८९. दुर्भावपूर्वक खोटी माहिती पुरविल्याबद्दल शास्ती. . . ५५

९०. ज्यासाठी अन्यथा तरतूद केलेली नाही अशा अपराधाबद्दल शास्ती. . . ५५

९१. काही अपराध करण्यापासून परावृत्त होण्यासाठी प्रतिभूति मागणे. . ५६

९२. **( वगळण्यात आले )** . . . ५६

९३. चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल प्रतिभूति मागणे. . . . ५६

| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| | **प्रकरण सात - चालू** | |
| ९४. | अज्ञान व्यक्तींच्या बाबतीत बंधपत्रे करून देणे. | ५६ |
| ९५. | त्रासदायक रीतीने झडती घेणे किंवा अटक करणे याबद्दल शास्ती. | ५६ |
| ९६. | त्रासदायक रीतीने विलंब लावल्याबद्दल शास्ती. | ५७ |
| ९७. | अटक केलेल्या व्यक्तींनी पळून जावे यासाठी अपप्रेरणा दिल्याबद्दल शास्ती. | ५७ |
| ९८. | सरकारजमा होण्यास पात्र असलेल्या वस्तू. | ५७ |
| ९९. | सरकारजमा होण्यास पात्र असलेल्या वस्तू खरोखरीच्या मालकांस परत करणे. | ५८ |
| १००. | सरकारजमा करण्याच्या वेळी अनुसरावयाची कार्यपद्धती. | ५८ |
| १०१. | सरकारजमा केली जाण्यास पात्र असलेली वस्तू विकण्याविषयी किंवा नष्ट करण्याविषयी आदेश देण्याचा जिल्हाधिकारी, वगैरे यांचा अधिकार. | ५८ |
| १०२. | मादक द्रव्य वापरण्याची विनंती करणारी जाहिरात किंवा मजकूर असलेले कोणतेही प्रकाशन सरकारजमा करणे. | ५९ |
| १०३. | काही बाबतीत अपराध करण्यात आला आहे असे गृहीत धरणे. | ५९ |
| १०३-क. | ( **वगळण्यात आले** ) | ६० |
| १०४. | अपराध आपसात मिटवणे. | ६० |
| १०४-क. | मुंबई अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९३८ व फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, याच्या कलम ५६२ च्या तरतुदी या अधिनियमाखालील अपराध केल्याबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आलेल्या व्यक्तीस लागू नसणे. | ६० |
| | **प्रकरण आठ** | |
| | **उत्पादन शुल्के** | |
| १०५. | उत्पादन शुल्के. | ६१ |
| १०६. | उत्पादन शुल्क वसूल करण्याची रीत. | ६२ |
| १०७. | ( **वगळण्यात आले** ) | ६३ |
| १०७-क. | कलम २४-क मध्ये नमूद केलेल्या पदार्थांचा साठा जाहीर करणे; हिशेब ठेवणे व विवरणे सादर करणे. | ६३ |
| १०७-ख. | माहिती मिळविण्याचा व उत्पादन शुल्कयोग्य पदार्थांची झडती घेण्याचा व ते जप्त करण्याचा अधिकार. | ६३ |
| १०८. | शुल्क दिल्यावाचून कोणतेही मादक द्रव्य, वगैरे आयात करण्याबद्दल शास्ती | ६४ |
| १०९. | ताडीची झाडे छेदण्याबद्दल शुल्क. | ६४ |
| ११०. | शुल्क कोणी द्यावे. | ६५ |
| १११. | झाडांच्या मालकास त्याने दिलेले शुल्क वसूल करण्यासाठी सहाय्य मिळण्याचा हक्क. | ६५ |
| ११२. | शासनाच्या मालकीच्या झाडांपासून ताडी काढण्याचा विशेषाधिकार. | ६५ |
| ११३. | [**वगळण्यात आले** ] | ६५ |
| ११४. | शुल्क, वगैरे वसूल करणे. | ६५ |
| | **प्रकरण नऊ** | |
| | **अधिकाऱ्याचे अधिकार, कर्तव्ये व कार्यपद्धती** | |
| ११५. | वाढीव दंड बसविण्याचा दंडाधिकाऱ्याचा अधिकार. | ६६ |
| ११६. | दंडाधिकाऱ्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती. | ६६ |

कलमे पृष्ठ

प्रकरण नऊ—चालू


११६-क. सहअपराध्यास माफी देणे. . . ६६
११७. तपास, अटक, झडत्या, वगैरे कशा कराव्या. . . ६६
११८. फौजदारी प्रक्रिया संहितेची दखलपात्र अपराधांच्या संबंधातील कार्यपद्धती लागू असणे. ६७
११९. विवक्षित अपराध जामीन घेण्यास अयोग्य असणे. . . ६७
१२०. प्रवेश करण्याचा व तपासणी करण्याचा अधिकार. . . ६७
१२१. संवेष्टने, वगैरे उघडण्याचा अधिकार. . . ६८
१२२. लायसन हजर करण्यास भाग पाडण्याचा अधिकार. . . ६८
१२३. अपराध्यास अटक करणे व निषिद्ध पदार्थ जप्त करणे. . . ६९
१२४. माहिती मिळविण्याचा अधिकार. . . ७०
१२५. मादक द्रव्ये, वगैरे जप्त करण्याचा अधिकार. . . ७०
१२६. अधिपत्रावाचून अटक करणे. . . ७०
१२७. नाव सांगण्यात कसूर करणाऱ्या अपराध्यास अटक. . . ७१
१२८. अधिपत्रे काढणे. . . ७१
१२८-क. विवक्षित तरतुदी विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थास लागू असणे. . . ७२
१२९. दारूबंदी अधिकाऱ्यास अपराधांचा तपास करण्यासाठी अधिकार देता येईल. . . ७२
१२९-क. व्यक्तींची वैद्यकीय तपासणी, वगैरे करविण्यासाठी त्यांना भाग पाडण्याचा अधिकार. ७३
१२९-ख. नोंदविलेल्या वैद्यक व्यवसायी, इत्यादी यांनी दिलेले दस्तऐवज किंवा प्रतिवृत्ते, वगैरे पुरावा असणे. ७४
१३०. अटक केलेली व्यक्ती व जप्त केलेल्या वस्तू पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे पाठविणे. ७४
१३१. दारूबंदी अधिकाऱ्याने जामिनावर सोडणे. . . ७४
१३२. जप्त केलेल्या वस्तू. . . ७५
१३३. शासनाच्या अधिकाऱ्यांचे व स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे सहाय्य करण्याचे कर्तव्य. ७५
१३४. अपराध झाल्याचे कळविणे. . . ७५
१३५. जमीन मालकांनी व इतर व्यक्तींनी माहिती कळविणे. . . ७६
१३६. **( वगळण्यात आले )** . . ७६


प्रकरण दहा

## अपिले व पुनरीक्षण


१३७. अपिले. . . ७६
१३८. पुनरीक्षण. . . ७७


प्रकरण अकरा

## संकीर्ण


१३९. लायसन, वगैरे यांच्या बाबतीत राज्य शासनाचे सर्वसाधारण अधिकार. . . ७७
१४०. सार्वजनिक जागी मादक द्रव्ये, वगैरे यांचे सेवन करणे किंवा ती वापरणे यांस मनाई करण्याचा, त्यांचे विनियमन करण्याचा किंवा त्यावर नियंत्रण ठेवण्याचा राज्य शासनाचा अधिकार. ८०

कलमे पृष्ठ

प्रकरण अकरा—चालू

१४१. जादा पोलिसांची नेमणूक करणे. . . . . . . ८०
१४२. जेथे मादक द्रव्य किंवा भांग विकली जाते ती ठिकाणे काही बाबतीत बंद करण्याचे जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार. . . . . . . . ८१
१४३. राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार. . . . . . . ८१
१४४. आयुक्ताचा विनियम करण्याचा अधिकार. . . . . . . ८६
१४५. या अधिनियमान्वये काम करणारे अधिकारी व व्यक्ती लोकसेवक असणे. . . ८७
१४६. कारवाई करण्यास मनाई. . . . . . . . . ८७
१४६-क. अधिकाऱ्यांविरुद्ध करावयाच्या खटल्यांची किंवा दाव्यांची मुदत. . . . . ८७
१४६-ख. अधिनियमाच्या तरतुदी शासनाला लागू नसणे. . . . . ८८
१४७. या अधिनियमाच्या तरतुदी शुल्क सीमांत ओलांडून केलेल्या आयातीस किंवा निर्यातीस लागू नसणे. ८८
१४८. निरसन आणि सुधारणा. . . . . . . . . ८८
१४९. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ हा राज्याच्या इतर प्रदेशात अमलात आल्याचा परिणाम म्हणून इतर अधिनियमांचे निरसन व व्यावृत्ती. ८९

अनुसूची एक-क . . . . . . . . ९०
अनुसूची एक. . . . . . . . . ९१
अनुसूची दोन. . . . . . . . . ९२
अनुसूची तीन. . . . . . . . . ९३

# सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५[1]
# [मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९]*

[२० मे १९४९]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :-

विधि अनुकूलन आदेश, १९५०.
सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २८.
सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४.
सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०.
मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.
सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२.
सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२.
महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.
सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६.
सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.
सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२. (१४-१-१९७४) †
सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०. (२३-१०-१९८१) ‡
सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९. (६-१-१९९७) †£
सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८. (१८-५-१९९८) †
सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.

**मुंबई [2] [राज्यात] दारूबंदीच्या धोरणाचे प्रचालन करणे, ते अमलात आणणे व त्याची अंमलबजावणी करणे या संबंधीचा कायदा तसेच अबकारी कायदा हे सुधारण्याबाबत व एकत्रित करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** दारूबंदीच्या धोरणाचे प्रचालन करणे, ते अमलात आणणे व त्याची अंमलबजावणी करणे या संबंधीचा कायदा सुधारणे व एकत्रित करणे इष्ट आहे; तसेच ज्याअर्थी, मुंबई [2] [राज्यातील] अबकारी कायदा त्याच कारणाकरिता सुधारणे व एकत्रित करणे आणि यात यापुढे दिलेल्या काही इतर गोष्टींसाठी तरतूद करणे आवश्यक आहे; **त्याअर्थी**, याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :—

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी सन १९४८ चे मुंबई सरकारचे राजपत्र, भाग ५, पृष्ठ ६५५ (इंग्रजी) पहा.

[2] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ४, याअन्वये "प्रांतात" आणि "प्रांतातील" या मजकुराऐवजी अनुक्रमे "राज्यात" व "राज्यातील" हा मजकूर दाखल करण्यात आला.

* सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी हा अधिनियम मुंबई राज्याच्या ज्या क्षेत्रास लागू नव्हता त्या क्षेत्रास तो लागू करण्यात आला आहे. (सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम २ पहा).

† अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवतो.

‡ सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम ५ अन्वये १९८१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ निरसित करण्यात आला.

†£ सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ४८ अन्वये १९९६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ निरसित करण्यात आला.

## प्रकरण एक

# प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ असे म्हणावे.

[१][(२) तो संपूर्ण [२][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.]

*(३) तो [३][राज्य] शासन, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जो दिनांक [५][विनिर्दिष्ट] करील त्या दिनांकास [४][पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात समाविष्ट असलेल्या क्षेत्रात] अमलात येईल.

[५][तसेच, उक्त अधिनियम, मुंबई दारूबंदी (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९५९ अन्वये राज्याच्या ज्या क्षेत्रास लागू करण्यात आला असेल त्या क्षेत्रात ते शासन तत्सम अधिसूचनेद्वारे नेमील अशा इतर दिनांकास तो अमलात येईल ; (१९५९ चा मुंबई १२.)

परंतु, चांदा जिल्ह्यातील हातभट्ट्या असलेल्या क्षेत्राची परिस्थिती, त्या क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तींची सर्वसाधारण मागासलेली स्थिती आणि तेथे दारूबंदीस सुरुवात करण्यापूर्वी योग्य पार्श्वभूमि तयार करण्याची गरज लक्षात घेऊन, राज्य शासनास जर योग्य वाटेल तर, त्या क्षेत्रात हा अधिनियम अमलात आणण्यासाठी वेगळा दिनांक ठरविता येईल.

**स्पष्टीकरण**—या पोट-कलमातील "चांदा जिल्ह्यातील हातभट्ट्या असलेले क्षेत्र " याचा अर्थ अनुसूची एक-क मध्ये विनिर्दिष्ट केलेले चांदा जिल्ह्याचे क्षेत्र असा होतो].

‡ [६][(४) पोट-कलम (३) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने हा अधिनियम अमलात आल्यावर मुंबई दारूबंदी (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९५९ अन्वये हा अधिनियम ज्या कोणत्याही क्षेत्रास लागू करण्यात आला असेल अशा क्षेत्रात, दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अमलात असलेले व या अधिनियमान्वये करण्यात आले असतील किंवा काढण्यात आले असतील किंवा केल्याचे किंवा काढण्यात आले आहेत असे समजण्यात येत असतील असे सर्व नियम, विनियम, आदेश व अधिसूचना उक्त क्षेत्रासमुद्धा लागू करण्यात येतील आणि त्या क्षेत्रात अमलात येतील]. (१९५९ चा मुंबई १२.)

व्याख्या. **२.** विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास या अधिनियमात,—

(१) " प्राधिकारपत्र " याचा अर्थ, कलम ४५ अन्वये धार्मिक विधीसाठी दारुचा उपयोग करण्याकरिता दिलेले प्राधिकारपत्र असा आहे.

---

[१] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ५ (अ) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०, अन्वये " मुंबई राज्यास " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधी अनुकूलन आदेश, १९५०, अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ५ (ब) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या, कलम ५ (ब) (दोन) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या, कलम ५ (क) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

* पोट-कलम (३) यात कोणतेही रूपभेद होणार नाहीत. महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० पहा.

‡ पोट-कलम (४) यात कोणतेही रूपभेद होणार नाहीत. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० पहा.

(२) ''बाटलीत भरणे'' याचा अर्थ, त्याचे व्याकरणदृष्ट्या होणारे फेरफार धरून विकण्यासाठी कोणताही पदार्थ पिंपातून किंवा इतर भांड्यातून काढून तो बाटली, बरणी, कुपी, घट होतो किंवा तत्सम पात्रे यात भरणे, असा समजावा—मग त्यासाठी माल तयार करण्याचा कोणत्याही प्रक्रियेचा उपयोग केला असो व नसो ; '' बाटलीत भरणे '' या शब्दप्रयोगात '' पुन्हा बाटलीत भरणे '' याचा समावेश होतो ;

[१][ * * * * * ]

[२][ (४) '' जिल्हाधिकारी '' यामध्ये, या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याचे सर्व किंवा कोणतेही अधिकार चालविण्यासाठी किंवा जिल्हाधिकाऱ्याची सर्व किंवा कोणतेही कर्तव्ये किंवा कामे पार पाडण्यासाठी राज्य शासनाने नेमलेला अधिकारी याचा समावेश होतो ; ]

[३][ (५) '' आयुक्त '' याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ३ अन्वये, आयुक्त, दारूबंदी व उत्पादन शुल्क म्हणून नेमण्यात आलेला अधिकारी असा आहे आणि त्यामध्ये राज्य शासन या अधिनियमाखालील आयुक्ताचे सर्व किंवा कोणतेही अधिकार ज्याला देईल अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होईल ; ]

(६) '' समिती '' [४][किंवा मंडळ] याचा अर्थ, कलम ७ अन्वये [५][राज्य] शासनाने [६][नेमलेली समिती किंवा मंडळ] असा आहे ;

(७) '' दारूचा गुत्ता '' याचा अर्थ, जी कोणतीही जागा एखाद्या व्यक्तीच्या मालकीची असेल किंवा तिचा तो भोगवटा करीत असेल, वापर करीत असेल, ती ताब्यात ठेवीत असेल किंवा तिच्यावर देखरेख ठेवीत असेल किंवा तिची व्यवस्था पाहत असेल किंवा तिच्यावर नियंत्रण ठेवीत असेल आणि जीत तिचा वापर केल्याबद्दल किंवा तिच्यात दारू पिण्याची सोय केल्याबद्दल आकार घेऊन किंवा अन्य कोणत्याही प्रकारे अ व्यक्तीच्या फायद्यासाठी किंवा कमाईसाठी दारू पिण्याची किंवा कोणतेही मादक औषधिद्रव्य सेवन करण्या परवानगी दिली असेल अशी जागा, असा आहे; व त्यात या अधिनियमांन्वये दिलेल्या लायसनवाचून एकापेक्षा अधिक व्यक्तीकडून दारू पिण्याकरिता किंवा कोणतेही मादक औषधिद्रव्य सेवन करण्याकरिता जिचा वारंवार उपयोग करण्यात येतो त्या क्लबच्या जागेचा किंवा कोणत्याही इतर जागेचा समावेश होतो ;

(८) '' देशी दारू '' यात भारतात उत्पादन केलेल्या, किंवा तयार केलेल्या सर्व प्रकारच्या दारूचा समावेश होतो ;

[७][ (९) '' लागवड करणे '' याचा अर्थ, बी लावून रोपटे वाढविणे, असा आहे ; आणि त्यात, रोपट्याची वाढ होत असताना त्याची जोपासना करणे किंवा रक्षण करणे यांचा समावेश होतो ; ]

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (अ) अन्वये खंड (३) हा वगळण्यात आला.

[२] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ६ (अ) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ अनुसूची अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (५) दाखल करण्यात आला.

[४] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] विधि अनुकूलन आदेश, १९५०, अन्वये ''प्रांतिक'' या मजकुरऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (ब) अन्वये '' नेमलेल्या समितीपैकी कोणतीही समिती '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २ (क) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

(१०) " विप्रकृत " याचा अर्थ मनुष्याच्या सेवनास अयोग्य करण्याकरिता ज्यावर विहित केलेली क्रिया केली आहे असा आहे ;

[१][ (१०-क) " विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ " याचा अर्थ, विप्रकृत मद्यसार [२][किंवा विप्रकृत मद्यार्क] वापरून केलेला कोणताही सिद्धपदार्थ असा आहे ; व तीत असे मद्यसार किंवा मद्यार्क यापासून तयार केलेले लाखरोगण, फ्रेंच पॉलिश व वॉर्निश यांचा समावेश होतो ; ]

[३][ * * * * * ]

(१२) " पिणे " याचा अर्थ, त्याचे व्याकरणदृष्ट्या होणारे फेरफार धरून, दारू पिणे किंवा कोणतेही मादक औषधिद्रव्ये सेवन करणे असा आहे ;

(१३) " उत्पादनशुल्कयोग्य पदार्थ " याचा अर्थ —

(क) मनुष्याने सेवन करण्यासाठी असलेले कोणतेही मद्यार्कयुक्त पेय,

(ख) मादक औषधी [४][किंवा भांग],

(ग) अफू,

[५][ (घ) राज्य शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे उत्पादनशुल्कयोग्य पदार्थ म्हणून जाहीर करील अशी इतर अंमली औषधिद्रव्ये आणि अंमली द्रव्ये असा आहे ; ]

(१४) " उत्पादनशुल्क " व " प्रतिशुल्क " याचा अर्थ, [६][संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची २ मधील नोंद ५१ यात] नमूद केल्याप्रमाणे असलेले, यथास्थिति, उत्पादनशुल्क किंवा प्रतिशुल्क असा आहे ;

(१५) " उत्पादनशुल्क महसूल " याचा अर्थ, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये किंवा मादक द्रव्यासंबंधी त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याच्या तरतुदींअन्वये बसविलेले कोणतेही शुल्क फी, कर किंवा ( न्यायालयाने बसविलेल्या दंडाव्यतिरिक्त इतर ) दंड अथवा आदेशाअन्वये जप्त केलेला किंवा सरकारजमा केलेला माल यापासून मिळालेला किंवा मिळण्याजोगा महसूल असा आहे ;

(१६) " निर्यात करणे " याचा अर्थ ( कलम १४७ व्यतिरिक्त )[७] * * * सीमा शुल्क सरहद्द न ओलांडता इतर रीतीने [८][राज्याबाहेर] नेणे, असा आहे ;

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६, कलम २, अन्वये खंड (१०-क) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (ड) अन्वये " मद्यार्क " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ (ई) अन्वये खंड (११) वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २ (फ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २ (फ) अन्वये खंड (ड) आणि (ई) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५०, याअन्वये " भारत शासन अधिनियम, १९३५, याच्या सातव्या अनुसूचीतील सूची २, बाब ४०, यात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २ (१), अन्वये " डोमिनिअन सरकारने व्याख्या केल्याप्रमाणे असलेले " हा मजकूर वगळण्यात आला.

[८] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ३, अन्वये " दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्याबाहेर " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(१७) " परदेशी दारू " [1][याचा अर्थ, भारताबाहेर उत्पादन केलेली किंवा तयार केलेली सर्व प्रकारची देशी दारू, असा आहे :]

परंतु, [2][राज्य] शासनांस राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, कोणत्याही विशिष्ट प्रकारची देशी दारू ही या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता परदेशी दारू आहे असे जाहीर करण्याचा अधिकार आहे ;

(१८) " भांग " याचा अर्थ, भांगेच्या ज्या झाडापासून मादक औषधिद्रव्ये तयार करता येतात ते भारतातील कोणत्याही प्रकारचे भांगेचे झाड, असा आहे ;

(१९) " हॉटेल लायसन " याचा अर्थ, कलम ३५ अन्वये दिलेले लायसन असा आहे ;

[3][ (१९-क) " कुटुंब " याचा अर्थ, एकाच घरातील व्यक्ती म्हणून एकत्र राहणाऱ्या आणि जेवण घेणाऱ्या व्यक्तींचा गट असा आहे, परंतु तीत त्यांच्या नोकरांचा समावेश होत नाही ; ]

(२०) " आयात करणे " याचा अर्थ, [4]* * * * सीमा शुल्क सरहद्द न ओलांडता इतर रीतीने [5][राज्यात] आणणे, असा आहे (कलम १४७ मध्ये याचा अर्थ या व्याख्येप्रमाणे होत नाही) ;

(२१) "अंतरिम परवाना" याचा अर्थ, कलम ४७ अन्वये दिलेला परवाना असा आहे ;

(२२) "मादक द्रव्य" याचा अर्थ, कोणतीही दारू, मादक औषधिद्रव्य, अफू किंवा [2][राज्य] शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे मादक द्रव्य म्हणून जाहीर करील असा कोणताही इतर पदार्थ, असा आहे ;

(२३) "मादक औषधिद्रव्य" याचा अर्थ—

(क) भारतातील भांगेच्या झाडाची (कॅनॅबिस सॅटिव्हा एल) पाने, बारीक देठ व फुले किंवा फळे येणारी बोंडे, यात भांग, सिद्धी किंवा गांजा या सर्व प्रकारांचा समावेश होतो;

(ख) चरस याचा अर्थ संवेष्टन व परिवहन यांसाठी आवश्यक असलेल्या क्रियेव्यतिरिक्त इतर कोणत्याही क्रिया ज्यावर करण्यात आलेल्या नाहीत अशी भारतातील भांगेच्या झाडापासून मिळणारी राळ;

(ग) वरीलपैकी कोणत्याही प्रकारच्या मादक औषधिद्रव्याचे उदासीन पदार्थ घालून किंवा त्याशिवाय तयार केलेले कोणतेही मिश्रण किंवा त्यापासून तयार केलेले कोणतेही पेय; [6]* * *

[7][ (घ) राज्य शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता मादक औषधिद्रव्य म्हणून जाहीर करील असे कोणतेही इतर मादक किंवा अमली औषधिद्रव्य किंवा पदार्थ, व त्यापासून तयार केलेला प्रत्येक पदार्थ किंवा मिश्रण, असे औषधिद्रव्य, पदार्थ, तयार केलेला पदार्थ किंवा मिश्रण हे अपायकारक औषधिद्रव्य अधिनियम, १९३०, कलम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे
१९३० चा २. अफू , कोका पान किंवा तयार केलेले औषधिद्रव्य असता कामा नये;] असा आहे ;

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (ग) अन्वये "या संज्ञेत समुद्रमार्गाने, हवाई मार्गाने किंवा खुष्कीच्या मार्गाने भारतात आयात केलेल्या सर्व प्रकारच्या दारूचा समावेश होतो" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (ह) अन्वये खंड (१९-क) समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २ (१) अन्वये "डोमिनिअन सरकारने व्याख्या केल्याप्रमाणे असलेले" हा मजकूर वगळण्यात आला.

[5] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ३, या अन्वये "दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २ (२) अन्वये "आणि" हा मजकूर वगळण्यात आला.

[7] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) अन्वये मूळ खंड आणि त्या खंडाचे परंतुक या ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

(२४) " दारू " यात—

(क) [1][मद्यसार], [2][विप्रकृत मद्यसार,] वाईन, बीअर, ताडी आणि मद्यार्काचे बनलेले किंवा मद्यार्क असलेले सर्व प्रवाही पदार्थ ; आणि

(ख) [3][राज्य] शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता दारू म्हणून जाहीर करील असा कोणताही इतर मादक पदार्थ, यांचा समावेश होतो ;

(२५) "तयार करणे" यात—

(क) ज्या क्रियेने— मग ती स्वाभाविक असो वा कृत्रिम असो—कोणतीही दारू किंवा मादक औषधिद्रव्य यांचे उत्पादन केले जाते किंवा ती तयार केली जाते किंवा तिचे मिश्रण केले जाते ती प्रत्येक क्रिया व तसेच पुन्हा गाळणे [4][आणि दारू किंवा मादक औषधिद्रव्य शुद्ध करण्यासाठी, स्वादयुक्त करण्यासाठी किंवा तिला रंग देण्यासाठी] उपयोगात आणलेली प्रत्येक क्रिया, यांचा समावेश होतो; परंतु तीत खाजगी सेवनासाठी कायदेशीररीत्या जवळ बाळगलेली दारू किंवा मादक औषधिद्रव्य यांस स्वादयुक्त करण्याच्या किंवा त्यांचे मिश्रण करण्याच्या किंवा त्यांना रंग आणण्याच्या क्रियेचा समावेश होत नाही; आणि

(ख) झाडापासून ताडी तयार करण्याचा व काढण्याच्या प्रत्येक क्रियाचा समावेश होतो ;

(२६) "वैद्यकीय मंडळ" याचा अर्थ, कलम ८ अन्वये रचना केलेले मंडळ असा आहे ;

(२७) "मोहाचे फूल" यात, मोहाच्या झाडाच्या फळाचा किंवा बीचा समावेश होत नाही;

(२८) "काकवी" याचा अर्थ, गूळ किंवा साखर तयार करण्याच्या अखेरच्या अवस्थेत [5][उत्पन्न झालेला जड, काळसर रंगाचा,] ज्यामध्ये आंबवता येण्याजोगी द्रव्यरूप किंवा तरंगणारी साखर आहे. [6][असा चिकट द्रव्य पदार्थ,] असा आहे ; [7][आणि तीत अशा द्रव्य पदार्थाच्या घन स्वरूपातील पदार्थाचा व तसेच ज्यायोगे अशा द्रव्य पदार्थाचे किंवा त्याच्या धन स्वरूपातील पदार्थाचे स्वरूप मूलतः बदलणार नाही असा कोणताही पदार्थ त्या द्रव्य पदार्थात किंवा त्या धन स्वरूपातील पदार्थात घालून बनवलेल्या कोणत्याही पदार्थाचा समावेश होतो ;] [8][तसेच उसापासून तयार केलेल्या व काळा गूळ (गूळ), कुजका गहू (गूळ),

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (आय) अन्वये "वाईनचा अर्क" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २ (२) अन्वये "मिथिलेटेड स्पिरीट" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] विधि अनुकूलन आदेश, १९५०, अन्वये "प्रांतिक" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (जे) अन्वये "दारू शुद्ध करण्यासाठी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या, कलम २ (के) (१) अन्वये " निथळून निघालेला जड, काळसर रंगाचा, गाळवजा " या मजकुराऐवजी, "उत्पन्न झालेला जड, काळसर रंगाचा" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (के) (१) अन्वये " असा पाक " या मजकुराऐवजी "असा चिकट द्रव्यपदार्थ " हा मजकुर दाखल करण्यात आला.

[7] वरील अधिनियमाच्या कलम २ (के) (२) अन्वये " आणि तीत ज्याच्या योगाने अशा पाकाचे स्वरूप मूळातः बदलणार नाही असे कोणतेही द्रव्य पाकातघालून " या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[8] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २ अन्वये " पदार्थाचा समावेश होतो; " या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

राब किंवा कुजका राब या नावाने ओळखण्यात येणाऱ्या आणि ते पदार्थ कोणत्याही रंगाचे असले तरी पुढील घटकांचा समावेश असलेल्या साखरयुक्त पदार्थांचा देखील यात समावेश होतो,

(एक) डेक्ट्रोज व लेव्हूलोज मिश्रित साखर (इन्व्हर्ट) म्हणून म्हटली जाणारी ९० टक्क्यांपेक्षा कमी असेल इतकी एकूण साखर आणि ६० टक्क्यांपेक्षा कमी असेल इतकी उसाची साखर ; किंवा

(दोन) पाण्यामध्ये २ टक्क्यांपेक्षा जास्त प्रमाणात अद्राव्य असलेली कोणतीही बाह्य वस्तू ; किंवा

(तीन) एकूण ६ टक्क्यांपेक्षा जास्त असेल अशी राख ; किंवा

(चार) हायड्रोक्लोरिक आम्लामध्ये (एचसीएल) ०.५ टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात अद्राव्य असलेली राख ; किंवा

(पाच) १० टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात आर्द्रता ; किंवा

(सहा) ७० पीपीएम (पार्टस् पर मिलियन) पेक्षा अधिक प्रमाणात संहत असलेले सल्फर डायऑक्साइड ;]

परंतु तीत,[1][राज्य] शासन, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जो कोणताही पदार्थ या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता काकवी नसल्याचे जाहीर करील त्याचा समावेश होणार नाही ;

१९५१ चा मुंबई २२. १८९८ चा ५.

(२९) '' पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी '' या शब्दप्रयोगांत —

(क) बृहन्मुंबईत, [2][मुंबई पोलीस अधिनियम, १९५१,] याच्या तरतुदीन्वये ज्याची तरतूद केली आहे असा पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी ; आणि

(ख) इतरत्र * फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, यात व्याख्या केल्याप्रमाणे पोलीस ठाण्याचा प्रभारी यांचा समावेश होतो ;

(३०) '' अफू '' यासंज्ञेचा अर्थ —

(क) खसखशीच्या (पॅपॅव्हर सॉम्निफेरम एल्.) झाडाची बोंडे [3][मग ती आपल्या मूळ स्वरूपात असोत किंवा कापलेली किंवा चुरा केलेली असोत किंवा त्यांची भुकटी केलेली असो आणि त्यांपासून रस काढून घेण्यात आला असो वा नसो ;]

(ख) संवेष्टन व परिवहन यांसाठी आवश्यक असलेल्या क्रियेव्यतिरिक्त इतर कोणतीही क्रिया ज्यावर करण्यात आलेली नाही असा स्वाभाविकपणे जमलेला अशा बोंडांचा रस ; आणि

(ग) वरीलपैकी कोणत्याही प्रकारच्या अफूचे गुणविरहित पदार्थ घालून किंवा त्याशिवाय तयार केलेले कोणतेही मिश्रण असा आहे ;

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये '' प्रांतिक '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ कलम ६ (ब) अन्वये ''मुंबई शहर पोलीस अधिनियम, १९०२ '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (एल) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

२. परंतु यात शेकडा ०.२ पेक्षा अधिक प्रमाणात मॉर्फीन नसलेल्या अशा कोणत्याही पदार्थाचा किंवा घातक औषधीद्रव्य अधिनियम, १९३०, कलम २ यात व्याख्या केल्याप्रमाणे तयार केलेल्या औषधिद्रव्याचा समावेश होत नाही.

१*       *       *       *       *

(३२) " परवाना " याचा अर्थ, २[या अधिनियमाच्या तरतुदींन्वये] दिलेला परवाना, असा समजावा व " परवानाधारक " या शब्दप्रयोगाचा अर्थ त्याप्रमाणे लावण्यात यावा ;

(३३) " पोलीस ठाणे " याचा अर्थ, बृहन्मुंबई ३[मुंबई पोलीस अधिनियम, १९५१] याच्या तरतुदीन्वये ज्याची तरतूद केली आहे असा पोलीस विभाग, व इतरत्र *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, याच्या प्रयोजनांकरिता पोलीस ठाणे म्हणून जाहीर केलेले कोणतेही ठिकाण असा आहे ; १९५१ चा मुंबई २२. १८९८ चा ५.

(३४) " विहित " याचा अर्थ या अधिनियमान्वये केलेले नियम किंवा विनियम किंवा तदन्वये दिलेले आदेश यांनी विहित केलेले असा आहे ;

(३५) " दारूबंदी अधिकारी " यात, ४[आयुक्त], जिल्हाधिकारी किंवा या अधिनियमाच्या तरतुदीन्वये कोणतेही अधिकार चालविण्यासाठी किंवा कोणतीही कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी नेमण्यात आलेला कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती यांचा समावेश होतो ;

५[तसेच, तीत ज्याच्याकडे कोणतेही असे अधिकार निहित करण्यात आले असतील आणि कोणतीही अशी कामे किंवा कर्तव्ये सोपवून देण्यात आली असतील असा कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती यांचा, आणि समितीच्या, मंडळाच्या किंवा वैद्यक मंडळाच्या कोणत्याही सदस्याचा समावेश होतो ;]

६[ (३६) " राज्य " याचा अर्थ, ७[महाराष्ट्र राज्य], असा आहे, व तीत महाराष्ट्र राज्याशी संबद्ध असलेल्या क्षेत्रीय जलधीच्या हद्दीतील जागेचा समावेश होतो ;]

८[ (३७) " शुद्ध करणे " यासंज्ञेत, ज्या क्रियेने दारू शुद्ध करण्यात येते किंवा साफ करण्यात येते अशा प्रत्येक क्रियेचा समावेश होतो ;]

९[ (३८) " नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी " याचा अर्थ वैद्यकीय व्यवसाय करण्यासंबंधी त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये ज्यास राज्यात, कोणत्याही वैद्यकीय पद्धतीनुसार व्यवसाय करण्याचा हक्क आहे अशी व्यक्ती असा आहे, व तीत दंत वैद्य अधिनियम, १९४८, यात व्याख्या केल्याप्रमाणे नोंदलेले दंतवैद्य आणि †मुंबई पशु वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५३ अन्वये किंवा राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही तत्सम कायद्यान्वये नोंदलेला पशुवैद्यक व्यवसायी यांचा समावेश होतो ;] १९४८ चा १६ १९५३ चा मुंबई ६८.

---

१ सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (एम) अन्वये खंड (३१) वगळण्यात आले.

२ सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २ (४) अन्वये " कलम ४०, ४१, ४६ किंवा ४७ अन्वये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ६ (ब), अन्वये "मुंबई शहर पोलीस अधिनियम, १९०२ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३, अनुसूची अन्वये "संचालक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (एन) अन्वये "तसेच तीत समितीच्या किंवा वैद्यक मंडळाच्या कोणत्याही सदस्यांचा समावेश होतो " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ६ (क) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

७ महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०, अन्वये "मुंबई राज्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८ सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (ओ) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

९ सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ६ (ड) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

† आता महाराष्ट्र पशु वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९७१ (१९७१चा महाराष्ट्र ४४) पहा.

(३९) " विनियम" याचा अर्थ या अधिनियमान्वये केलेले विनियम असा आहे;

(४०) "नियम" याचा अर्थ या अधिनियमान्वये केलेले नियम असा आहे;

(४१) " विकणे " या शब्दप्रयोगाचे व्याकरणदृष्ट्या होणारे फेरफार धरून त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(क) कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करणे—मग असे हस्तांतरण कोणताही मोबदला घेऊन किंवा न घेता केलेले असो;

(ख) एकमेकांच्या सोईसाठी कोणत्याही प्रकारे पुरविणे किंवा वाटप करणे; आणि

(ग) एखाद्या क्लबने आपल्या सदस्यांस किंमत किंवा कोणतीही फी किंवा वर्गणी घेऊन कोणत्याही प्रकारे पुरविणे; परंतु, त्या शब्दप्रयोगात [1]* * * * सीमाशुल्क सरहद्दीपलीकडे निर्यात करण्यासाठी अफू विकण्याचा समावेश होत नाही;

" विकत घेणे " याचा अर्थ, त्याचे व्याकरणदृष्ट्या होणारे फेरफार धरून, त्याप्रमाणे लावण्यात येईल.

[2]* * * * * * *

(४३) " मद्यसार " याचा अर्थ, मद्यार्क असलेली व गाळून तयार केलेली कोणतीही दारू (मग ती विप्रकृत केलेली असो वा नसो) असा आहे;

(४४) " गोड ताडी किंवा नीरा " याचा अर्थ, नारळीच्या, शिंदीच्या, खजुरीच्या किंवा कोणत्याही प्रकारच्या ताडाच्या झाडापासून आंबू नये म्हणून विहित केलेल्या रीतीने क्रिया केलेल्या पात्रात काढलेला न आंबवलेला रस, असा आहे ;

[3][(४५) राज्याच्या संबंधात " क्षेत्रीय जलधी " याचा अर्थ, दिनांक २२ मार्च १९५६ रोजीची भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एस. आर. ओ. ६६९ यामध्ये या बाबतीत प्रसिद्ध केलेल्या राष्ट्रपतींच्या उद्घोषणेनुसार, समुचित मूळ रेषेपासून मोजलेल्या सहा सागरी मैलांच्या अंतरातील किंवा राष्ट्रपतींकडून यानंतर वेळोवेळी ठरविण्यात येईल अशा इतर अंतरांच्या आत असलेला समुद्राचा कोणताही खुला भाग, असा आहे ;]

(४६) " ताडी " याचा अर्थ, नारळीच्या, शिंदीच्या, खजुरीच्या किंवा कोणत्याही प्रकारच्या ताडाच्या झाडापासून काढलेला, आंबवलेला किंवा न आंबवलेला रस, असा आहे आणि तीत गोड ताडी किंवा नीरा यांचा समावेश होतो;

(४७) " छेदणे " याचा अर्थ, झाडातून रस बाहेर गळावा म्हणून त्याचा कोणताही भाग कापणे किंवा कोणतेही साधन वापरणे, असा आहे;

[4][(४७-**क**) " प्रवासी " याचा अर्थ, जी भारताचा नागरिक नसेल व भारताबाहेरील कोणत्याही देशात जी जन्मली असेल किंवा वाढली असेल किंवा जिचा तेथे अधिवास असेल परंतु जी भारतात प्रवास करण्यासाठी थोड्या दिवसांकरिता आली असेल अशी व्यक्ती, असा आहे ;

(४७-**ख**) " प्रवाशाचा परवाना " याचा अर्थ कलम ४६-**क** अन्वये दिलेला परवाना असा आहे ;]

---

[1] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २ (१) अन्वये " डोमिनिअन सरकारने व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या—" हा मजकूर वगळण्यात आला.

[2] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २ (पी) अन्वये खंड (४२) वगळण्यात आला.

[3] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ६ (ई) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[4] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम २ अन्वये कलमे (४७-क) व (४७-ख) समाविष्ट करण्यात आली.

(४८) " व्यापार व आयात लायसन" याचा अर्थ कलम ३३ अन्वये दिलेले लायसन असा आहे ;

(४९) " परिवहन करणे "याचा अर्थ [१][राज्यात] एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे, असा आहे ;

(५०) " विक्रेत्याचे लायसन " याचा अर्थ कलम ३४ अन्वये दिलेले लायसन असा आहे ;

(५१) " अभ्यागताचा परवाना " याचा अर्थ कलम ४६ अन्वये दिलेला परवाना, असा आहे ; १८९८ चा ५.

[२][(५२) * फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, † मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९३३ किंवा मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ यासंबंधी केलेल्या कोणत्याही उल्लेखात, राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या अनुक्रमे तत्सम अशा कोणत्याही कायद्यासंबंधी केलेल्या उल्लेखाचा समावेश होतो.] १९३३ चा मुंबई ६. १९५१ चा मुंबई २२

---

## प्रकरण दोन

## आस्थापना

[४][आयुक्त] दारुबंदी व उत्पादनशुल्क.

३. [३][राज्य] शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे [४][आयुक्त, दारूबंदी व उत्पादन शुल्क] या नावाचा एक अधिकारी नेमता येईल. असा अधिकारी [३][राज्य] शासनाच्या नियंत्रणास अधीन राहून व [३][राज्य] शासन वेळोवेळी जे सर्वसाधारण किंवा विशेष आदेश देईल त्यास अधीन राहून; या अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा तदनुसार सोपविलेल्या अधिकारांचा वापर करील आणि तदन्वये किंवा तदनुसार सोपविलेली कर्तव्ये व कामे पार पाडील. तसेच तो या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या बाबतीत देखरेख ठेवील व त्याच्या तरतुदी सामान्यतः पार पाडील :

[५][परंतु, महाराष्ट्र संचालक, दारूबंदी व उत्पादनशुल्क (पदनामातील बदल) अधिनियम, १९७३ याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी, संचालक, दारूबंदी व उत्पादनशुल्क याचे पद धारण करणारी व्यक्ती ही राज्याचा, आयुक्त, दारूबंदी व उत्पादनशुल्क असेल आणि राज्य शासन अन्यथा निदेश देईपर्यंत ती ते पद धारण करील.] १९७३ चा महाराष्ट्र ५२

जिल्हाधिकारी.

४. (१) जिल्हाधिकारी [६][आपल्या अधिकारक्षेत्राच्या] हद्दीत या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये किंवा त्यानुसार दिलेल्या अधिकारांचा वापर करील व कर्तव्ये व कामे पार पाडील.

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता मुंबईचा जिल्हाधिकारी यासहित सर्व जिल्हाधिकारी [७][आयुक्तास] दुय्यम असतील.

---

[१] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ३ याअन्वये " दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६ (फ) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ अन्वये " मद्यनिषेध उत्पादन-शुल्क संचालक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३, अनुसूची अन्वये हे परंतुक बदली दाखल करण्यात आले.

[६] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ८(अ) अन्वये " मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ अन्वये ज्या अधिकार क्षेत्रासाठी त्यास कलेक्टर म्हणून नेमले असेल त्या अधिकार क्षेत्राच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, च्या अनुसूचीअन्वये " संचालकास " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

† आता मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई ३) पहा.

(३) [१][राज्य] शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाद्वारे किंवा अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यास [२][नेमून देण्यात आलेल्या अधिकारांपैकी सर्व किंवा कोणतेही अधिकार आणि नेमून दिलेल्या कर्तव्यांपैकी व कामांपैकी सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये व कामे] कोणत्याही जिल्ह्यात किंवा कोणत्याही ठिकाणी चालविण्यासाठी किंवा पार पाडण्यासाठी [३] * * * जिल्हाधिकाऱ्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस नेमता येईल. अशा व्यक्तीवर [४][आयुक्ताच्या] व [१][राज्य] शासनाच्या नियंत्रणाखेरीज [१][राज्य] शासन वेळोवेळी आणखी जे कोणतेही नियंत्रण निर्दिष्ट करील ते नियंत्रण राहील.

५. [५][आयुक्तास] व जिल्हाधिकाऱ्यांस या अधिनियमाच्या तरतुदी पार पाडण्यास सहाय्य करण्याकरिता [१][राज्य] शासनास आवश्यक वाटतील असे दुय्यम अधिकारी त्यांच्या पदनामासह नेमता येतील हा अधिनियम किंवा तदनुसार केलेले नियम किंवा विनियम किंवा तदनुसार दिलेले आदेश या अन्वये जे अधिकार व जी कर्तव्ये व कामे असतील त्यापैकी आवश्यक वाटतील असे अधिकार, कर्तव्ये व कामे [१][राज्य] शासन अशा अधिकाऱ्यांस नेमून देईल. दुय्यम अधिकारी.

६. (१) [१][राज्य] शासनास, पोलीस विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा कोणत्याही इतर विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे, व्यक्तिशः किंवा त्याच्या पदाच्या नात्याने, हा अधिनियम किंवा तदनुसार केलेले नियम किंवा विनियम किंवा तदनुसार दिलेले आदेश या अन्वये जे अधिकार, कर्तव्ये व कामे असतील त्यापैकी आवश्यक वाटतील असे अधिकार व कर्तव्ये सोपविता येतील व आवश्यक वाटतील अशी कामे करण्याविषयी त्यास निदेश देता येईल, आणि कोणतेही असे अधिकारी त्यानंतर आपल्या मुख्य पदास आनुषंगिक असे जे अधिकार, कर्तव्ये व कामे असतील त्याखेरीज आणखी उक्त अधिकार वापरतील व उक्त कर्तव्ये व कामे पार पाडतील. या अधिनियमान्वये असलेले अधिकार व कर्तव्ये [६][पोलीस विभागाच्या आणि] इतर विभागांच्या अधिकाऱ्यांकडे सोपविणे.

---

[१]. विधि अनुकूलन आदेश, १९५० याअन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ८ (ब) (२) अन्वये " नेमून दिलेले सर्व अधिकार व दिलेली सर्व कर्तव्ये व कामे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ८ (ब) (१) अन्वये " जमीन महसुलाच्या " हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ च्या अनुसूचीअन्वये " संचालकाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, याच्या अनुसूचीअन्वये " संचालकास " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) तसेच [१][राज्य] शासनास, [२] * * * *
कोणत्याही व्यक्तीकडे हा अधिनियम किंवा तद्नुसार केलेले नियम किंवा विनियम किंवा तद्नुसार दिलेले आदेश या अन्वये जे अधिकार, कर्तव्ये व कामे असतील त्यापैकी आवश्यक वाटतील असे अधिकार व कर्तव्ये सोपविता येतील व आवश्यक वाटतील अशी कामे पार पाडण्याविषयी निदेश देता येईल. अशा व्यक्तींना [१][राज्य] शासनास योग्य वाटतील ती पदनामे देता येतील.

तज्ञ मंडळ. [३][६ क. [४][ (१) (क) मद्यार्क असलेला कोणताही औषधीय किंवा प्रसाधनीय सिद्धपदार्थ, किंवा

(ख) मद्यार्क असलेला कोणताही पूर्तीप्रतिबंधक सिद्धपदार्थ किंवा द्रावण, किंवा

(ग) मद्यार्क असलेला कोणताही स्वाद आणणारा अर्क, सत्त्व किंवा सरबत [५][मादक दारू म्हणून वापरण्यासाठी योग्य आहे किंवा नाही हे ठरविणे राज्य शासनास शक्य व्हावे म्हणून राज्य शासन एक तज्ञ मंडळ स्थापन करील.]

(२) पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेल्या तज्ञ मंडळात विहित करण्यात येतील अशा पात्रता असलेले कमीत कमी [६][पाच] सदस्य असतील. अशा रीतीने नेमलेले सदस्य राज्य शासनाची मर्जी असेल तोपर्यंत पद धारण करतील.

(३) मंडळाचे कामकाज पार पाडण्यासाठी [७][तीन सदस्य] हजर असले म्हणजे गणपूर्ती होईल ;

(४) मंडळाच्या सदस्याची कोणतीही रिकामी झालेली जागा शक्य तितक्या लवकर भरण्यात येईल :

परंतु, अशी कोणतीही जागा रिकामी झाली असेल त्या मुदतीत, विद्यमान सदस्यांना जणू कोणतीही जागा रिकामी झाली नव्हती असे समजून काम करता येईल.

(५) मंडळाच्या कामासंबंधीची कार्यपद्धती विहित करण्यात येईल अशी असेल.

[८][(६) पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेला कोणताही पदार्थ हा मादक दारू म्हणून वापरण्यास योग्य आहे किंवा नाही या प्रश्नावर व तसेच राज्य शासनाने याच्याकडे पाठविलेल्या प्रश्नाशी आनुषंगिक असणाऱ्या कोणत्याही बाबीविषयी राज्य शासनाला सल्ला देणे हे मंडळाचे कर्तव्य असेल. असा सल्ला मिळाल्यावर, राज्य शासन असा कोणताही पदार्थ मादक दारू म्हणून वापरण्यास योग्य आहे किंवा नाही हे ठरविल आणि राज्य शासनाने, तो पदार्थ अशा रीतीने वापरण्यास योग्य आहे असे ठरविल्यावर, जोपर्यंत त्याविरूद्ध सिद्ध करण्यात आले नसेल तोपर्यंत असा पदार्थ मादक दारू म्हणून वापरण्यास योग्य आहे असे गृहीत धरण्यात येईल.]

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९६२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३ (अ) अन्वये " वेतन न घेता काम करणाऱ्या किंवा अन्य प्रकारे काम करणाऱ्या " हे शब्द वगळण्यात आले.

[३] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ३ अन्वये कलम ६-क समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६, कलम ३ (१) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम (१), दाखल करण्यात आले.

[५] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ४ (अ) अन्वये " कैफ आणणारी दारू म्हणून वापरण्यास योग्य आहे किंवा नाही हे ठरविण्याकरिता राज्य सरकार तज्ञ मंडळ स्थापन करील." या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) अन्वये " तीनापेक्षा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ४ (क) अन्वये " दोन सदस्य " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ड) अन्वये मूळ पोट-कलम (६) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[१][ (७) पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेला कोणताही पदार्थ हा कैफ आणणारी दारू म्हणून वापरण्यास योग्य आहे असे उपरोक्तप्रमाणे राज्य शासनाकडून ठरविण्यात येईपर्यंत असा प्रत्येक पदार्थ अशा रीतीने वापरण्यास अयोग्य आहे असे मानण्यात येईल.] ]

७. (१) या अधिनियमाच्या तरतुदी पार पाडण्याच्या कामी अधिकाऱ्यांना सल्ला देण्याकरिता आणि सहाय्य करण्याकरिता [२][राज्य] शासनास [३][इतर मंडळे आणि समित्या] नेमता येतील. [३][इतर मंडळे आणि समित्या.]

(२) अशी [३][इतर मंडळे आणि समित्या] [४][विहित करण्यात येतील] अशी कामे पार पाडतील.

(३) अशा [३][इतर मंडळांची आणि समित्यांची] रचना व त्यांच्या कामकाजाची कार्यपद्धती विहित करण्यात येईल अशी असेल.

(४) अशा [३][इतर मंडळांच्या आणि समित्यांच्या] सदस्यांना विहित करण्यात येईल अशी फी व भत्ते देण्यात येतील असा निदेश देण्याचा [२][राज्य] शासनास निदेश देता येईल.

८. (१) [२][राज्य] शासनास, त्यास योग्य वाटतील अशा क्षेत्रांकरिता व त्यास योग्य वाटतील, असे सदस्य असलेल्या एका किंवा अनेक वैद्यक मंडळाची [५][किंवा त्यांच्या तालिकांची] स्थापना करण्याचा अधिकार असेल. वैद्यक मंडळे.

(२) अशा रीतीने स्थापन केलेले वैद्यक मंडळ [६][किंवा त्यांच्या तालिका] [७][विहित करण्यात आलेली] कामे पार पाडतील.

(३) वैद्यक मंडळाच्या [६][किंवा त्यांच्या तालिकेच्या] कामकाजाची कार्यपद्धती विहित करण्यात येईल अशी असेल.

(४) वैद्यक मंडळाच्या [६][किंवा त्यांच्या तालिकेच्या] सदस्यांना विहित करण्यात येईल अशी फी व भत्ते मिळण्याचा हक्क असेल.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ४ (ई) अन्वये पोट-कलम (७) दाखल करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, " प्रांतिक " या मजकुरांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ५ (अ) अन्वये " समिती ", " समित्या ", " समित्यांनी ", " समित्यांची " आणि समित्यांच्या " या मजकुराऐवजी अनुक्रमे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) अन्वये " या अधिनियमाच्या उपबंधांन्वये किंवा तदनुसार तरतूद करण्यात आली असेल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ६ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) व (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) अन्वये " ह्या अधिनियमान्वये किंवा नुसार ज्या विषयी तरतूद करण्यात आली असेल अशी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

दारूबंदी अधिकाऱ्यांवर व इतर अधिकाऱ्यांवर [२][आयुक्ताचे] नियंत्रण.

९. सर्व दारूबंदी अधिकारी आणि पोलीस व इतर विभागांचे अधिकारी यासह सर्व अधिकारी हे, या अधिनियमाच्या तरतुदी किंवा, तद्नुसार केलेले नियम किंवा विनियम किंवा तद्नुसार दिलेले आदेश या अन्वये असलेले आपले अधिकार चालविताना व आपली कर्तव्ये व कामे पार पाडताना [१][राज्य] शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, [२][आयुक्ताच्या] हाताखाली व नियंत्रणाखाली असतील ; व त्यांस [२][आयुक्त] वेळोवेळी जे आदेश देईल ते पाळणे बंधनकारक असेल.

प्रत्यायोजन.

१०. (१) [१][राज्य] शासनास, या अधिनियमाअन्वये त्यास त्याचे चालविता येतील असे कोणतेही अधिकार [२][आयुक्त] किंवा त्यास योग्य वाटेल अशा इतर अधिकाऱ्यांकडे प्रत्यायोजित करता येतील.

(२) [२][आयुक्तास] किंवा या अधिनियमाअन्वये नेमलेल्या किंवा अधिकार असलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्यास दिलेले अधिकार; हे त्यास, [१][राज्य] शासनाच्या नियंत्रणास व निदेशांस अधीन राहून, आपल्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील.

## प्रकरण तीन

## मनाई

मादक द्रव्य तयार करणे, वगैरे यांस या अधिनियमाच्या तरतुदी, नियम, वगैरे यांस अनुसरून परवानगी देणे.

११. या प्रकरणाच्या पुढील तरतुदींमध्ये काहीही असले तरी, या अधिनियमाच्या तरतुदीन्वये [३][किंवा] तद्नुसार केलेले नियम, विनियम किंवा तद्नुसार दिलेला आदेश या अन्वये तरतूद केलेल्या रीतीने त्या मर्यादेपर्यंत अथवा तद्नुसार दिलेले लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र याच्या अटींस व शर्तीस अनुसरून, कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग यांची आयात करणे, निर्यात करणे, किंवा तिचे परिवहन करणे किंवा ती तयार करणे, [४][तीं बाटल्यांत भरणे,] विकणे, खरेदी करणे, जवळ बाळगणे, वापरणे किंवा सेवन करणे [५][अथवा भांगेची लागवड करणे किंवा ती गोळा करणे] अथवा कोणतेही ताडी देणारे झाड छेदणे किंवा छेदणीस परवानगी देणे किंवा अशा झाडापासून ताडी काढणे किंवा काढण्यास परवानगी देणे हे कायदेशीर असेल.

दारू तयार करण्यास व दारूची भट्टी किंवा दारू गाळण्याचा कारखाना बांधण्यास किंवा चालविण्यास मनाई.

१२. कोणतीही व्यक्ती—

(क) दारू तयार करणार नाही ;

(ख) कोणतीही दारूची भट्टी किंवा दारू गाळण्याचा कारखाना बांधणार किंवा चालविणार नाही ;

(ग) दारू आयात करणार नाही, निर्यात करणार नाही, तिचे परिवहन करणार नाही किंवा ती जवळ बाळगणार नाही ; अथवा

(घ) दारू विकणार नाही किंवा विकत घेणार नाही.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ अनुसूची अन्वये " संचालकाचे ", " संचालकाच्या ", " संचालक ", आणि " संचालकास " या मजकुराऐवजी " आयुक्ताचे ", " आयुक्ताच्या ", " आयुक्त ", " आयुक्तास " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ४ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ४ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

१३. कोणतीही व्यक्ती—

दारूची विक्री, वगैरे करण्यास मनाई.

(क) कोणत्याही प्रकारची दारू विकण्यासाठी बाटलीत भरणार नाही ;

(ख) दारूचे सेवन करणार नाही किंवा ती वापरणार नाही ; अथवा

(ग) कोणत्याही प्रकारची दारू तयार करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे साहित्य, दारू गाळण्याची भट्टी, भांडी, साधने किंवा उपकरणे वापरणार नाही, ठेवणार नाही, किंवा आपल्याजवळ बाळगणार नाही.

१४. कोणतीही व्यक्ती—

मादक औषधिद्रव्ये निर्यात करणे, आयात करणे, त्याचे परिवहन करणे ते विकणे, तयार करणे, वगैरे यास मनाई.

(क) कोणतेही मादक औषधिद्रव्य निर्यात करणार नाही, आयात करणार नाही, त्याचे परिवहन करणार नाही किंवा ते जवळ बाळगणार नाही.

(ख) भांगेची लागवड करणार नाही, किंवा ती गोळा करणार नाही.

[१] * * * * *

(ग) कोणतेही मादक औषधिद्रव्य तयार करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य, दारू गाळण्याची भट्टी, भांडी, साधने किंवा उपकरणे वापरणार नाही, ठेवणार नाही, किंवा आपल्याजवळ बाळगणार नाही.

(घ) कोणतेही मादक औषधिद्रव्य विकणार नाही किंवा विकत घेणार नाही ;

(ङ) कोणत्याही मादक औषधिद्रव्याचे सेवन करणार नाही किंवा ते वापरणार नाही ; अथवा

(च) कोणतेही मादक औषधिद्रव्य तयार करणार नाही.

१५. कोणतीही व्यक्ती—

गोड ताडीची आयात, निर्यात, परिवहन, विक्री वगैरेस मनाई.

(क) गोड ताडी किंवा नीरा आयात करणार नाही, निर्यात करणार नाही, तिचे परिवहन करणार नाही किंवा ती जवळ बाळगणार नाही ;

(ख) गोड ताडी किंवा नीरा विकण्यासाठी बाटलीत भरणार नाही ; अथवा

(ग) गोड ताडी किंवा नीरा विकणार नाही किंवा विकत घेणार नाही.

१६. कोणतीही व्यक्ती—

ताडी देणारी झाडे छेदण्यास व त्यापासून ताडी काढण्यास मनाई.

(क) आपल्या मालकीचे किंवा आपल्या कब्जात असलेले कोणतेही ताडी देणारे झाड छेदणार नाही किंवा ते छेदण्याची परवानगी देणार नाही ; अथवा

(ख) आपल्या मालकीच्या किंवा आपल्या कब्जात असलेल्या कोणत्याही झाडापासून ताडी काढणार नाही किंवा त्यापासून ताडी काढण्याची परवानगी देणार नाही.

१७. कोणतीही व्यक्ती—

अफू जवळ बाळगणे, वगैरे यास मनाई.

(क) अफू जवळ बाळगणार नाही ;

(ख) अफूचे परिवहन करणार नाही ;

(ग) अफूची आयात करणार नाही किंवा निर्यात करणार नाही;

(घ) अफू विकणार नाही किंवा विकत घेणार नाही ; अथवा

(ङ) अफूचे सेवन करणार नाही किंवा ती वापरणार नाही.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८ अन्वये " किंवा ज्यापासून कोणतीही मादक औषधी तयार करण्यात येईल असा अशा झाडाचा कोणताही भाग काढून घेता कामा नये " हा मजकूर वगळण्यात आला.

²[अज्ञान व्यक्तींना] मादक द्रव्य विकण्यास मनाई.

१८. लायसन दिलेल्या कोणत्याही विक्रेत्याने तसेच अशा लायसन दिलेल्या विक्रेत्याच्या नोकरीत असलेली किंवा अशा लायसन दिलेल्या विक्रेत्याच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने त्याच्या वतीने काम करणारी कोणतीही व्यक्ती ¹[कोणत्याही अज्ञान व्यक्तींना] कोणतेही मादक द्रव्य विकणार नाही किंवा देणार नाही. मग असे मादक द्रव्य अशा व्यक्तीने किंवा इतर व्यक्तीने सेवन करण्यासाठी, तसेच ते अशा लायसन दिलेल्या विक्रेत्याच्या जागेत किंवा जागेच्या बाहेर सेवन करण्यासाठी विकण्यात किंवा देण्यात येवो.

१९. [ताडी विकण्यास मनाई] हे कलम सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम १० अन्वये वगळण्यात आले.

चरसाचे उत्पादन करणे, वगैरे यास मनाई.

२०. कोणतीही व्यक्ती खालील गोष्टी करणार नाही:—

(क) चरसाचे उत्पादन करणे;

(ख) तो तयार करणे;

(ग) तो जवळ बाळगणे;

(घ) त्याची निर्यात करणे;

(ङ) त्याची आयात करणे;

(च) त्याचे परिवहन करणे;

(छ) तो विकत घेणे;

(ज) तो विकणे;

(झ) त्याचे सेवन करणे; किंवा

(ञ) तो वापरणे.

विप्रकृत केलेल्या मद्यसारात बदल करणे.

२१. कोणतीही व्यक्ती—

(क) कोणतेही विप्रकृत केलेले मद्यसार मादक पेय म्हणून किंवा पोटात घ्यावयाचे औषध म्हणून किंवा कोणत्याही इतर प्रकारचे मनुष्याने सेवन करण्यासाठी वापरता यावे या हेतूने त्यात पाणी मिसळून किंवा कोणत्याही पद्धतीने, बदल करणार नाही किंवा बदल करण्याचा प्रयत्न करणार नाही; किंवा

(ख) विप्रकृत केलेल्या ज्या मद्यसाराच्या बाबतीत असा बदल करण्यात आला आहे किंवा बदल करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे असे त्यास माहीत असेल किंवा असे त्यास सकारण वाटत असेल असे कोणतेही विप्रकृत मद्यसार जवळ बाळगणार नाही.

विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थात बदल करणे.

³[२१-क. कोणतीही व्यक्ती—

(क) कोणताही विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ मादक दारू म्हणून मनुष्याने सेवन करण्यासाठी वापरता यावी या हेतूने त्यात पाणी मिसळून किंवा कोणत्याही पद्धतीने, बदल करणार नाही किंवा बदल करण्याचा प्रयत्न करणार नाही; किंवा

(ख) ज्या विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थाच्याबाबतीत असा बदल करण्यात आला आहे किंवा बदल करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे असे त्यास माहीत असेल किंवा असे त्यास सकारण वाटत असेल असा कोणताही विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ जवळ बाळगणार नाही.]

---

¹ सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९ (अ) अन्वये " बाह्यत: एकवीस वर्षांखाली असलेल्या कोणत्याही इसमास " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

² वरील अधिनियमाच्या कलम ९ (ब) अन्वये " मुलांस " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

³ सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६, कलम ४ अन्वये कलम २१-क समाविष्ट करण्यात आले.

२२. कोणतीही व्यक्ती—

(क) कोणतीही जागा दारूचा गुत्ता म्हणून उघडणार नाही किंवा ठेवणार नाही किंवा वापरणार नाही; अथवा

(ख) दारूचा गुत्ता म्हणून उघडण्यात किंवा ठेवण्यात किंवा वापरण्यात आलेल्या कोणत्याही जागेवर देखरेख ठेवणार नाही, तिची व्यवस्था पहाणार नाही किंवा तिच्यावर नियंत्रण ठेवणार नाही किंवा तिच्यातील धंदा चालविण्यास कोणत्याही रीतीने सहाय्य करणार नाही.

कोणतीही जागा दारूचा गुत्ता म्हणून वापरण्यासाठी परवानगी देण्यास मनाई.

[१][२२-क. (१) नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीव्यतिरिक्त कोणतीही इतर व्यक्ती कोणत्याही मादक दारूसाठी कोणतेही औषधोपचाराचे औषधपत्र देणार नाही.

(२) एखाद्या व्यक्तीला औषधपत्र द्यायचे असेल तर त्या व्यक्तीची काळजीपूर्वक तपासणी केल्यानंतर, त्या व्यक्तीने अशा मादक दारूचा वापर करणे आवश्यक असल्याचे व त्यांपासून त्या व्यक्तीला एखाद्या परिचित दुखण्यापासून आराम मिळेल असे नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीला सद्भावनापूर्वक वाटत असल्याखेरीज असा कोणताही वैद्यक व्यवसायी अशी मादक दारू औषधपत्रात उपचार म्हणून सुचविणार नाही.

(३) नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी, मादक दारूसाठी त्याने दिलेल्या प्रत्येक औषधपत्रात, ज्यास ते देण्यात आले असेल त्या व्यक्तीचे नाव व पत्ता, औषधपत्र देण्याचा दिनांक, तिचा उपयोग करण्याबाबत सूचना, कोणत्या प्रमाणात व किती वेळा घ्यावयाचे ते नमूद करील आणि तो अशा औषधपत्राची एक प्रत, ती देण्याच्या दिनांकापासून एक वर्षापर्यंत जपून ठेवील. अशा रीतीने जपून ठेवलेल्या प्रतीवर, त्याने ज्या कारणांकरिता किंवा आजाराकरिता मादक दारू औषधपत्रांत लिहून दिली असेल ते कारण किंवा तो आजार नमूद करील.]

नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीने मादक दारूसाठी औषधोपचाराचे औषधपत्र देण्यास मनाई.

२३. कोणतीही व्यक्ती—

(क) कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग [३][** **] वापरण्याची विनंती करणार नाही [४][किंवा] असे द्रव्य किंवा भांग देऊ करणार नाही; अथवा

[५] * * * * *

(ग) जनतेतील कोणत्याही व्यक्तीस किंवा एखाद्या वर्गातील व्यक्तीस किंवा सर्वसामान्य लोकांस या अधिनियमाखालील कोणताही अपराध करण्यास किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचा किंवा विनियमाचा किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचा भंग करण्यास किंवा तदन्वये दिलेले कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र याच्या कोणत्याही शर्तीचा भंग करण्यास चिथावणी किंवा उत्तेजन देण्याच्या हेतूने कोणतेही कृत्य करणार नाही.

[२][मादक द्रव्य किंवा भांग वापरण्याची विनंती करण्यास अथवा जनतेतील एखाद्या व्यक्तीस अपराध करण्यास चिथावणी किंवा उत्तेजन देण्याच्या हेतूने कोणतेही कृत्य करण्यास मनाई.]

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ११ अन्वये कलम २२-क समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ५ (३) अन्वये मूळ समास टीपेऐवजी ही समास टीपे दाखल करण्यात आली.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५ (१) अन्वये " यांची शिफारस करता ", हा मजकूर वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ५ (२) अन्वये खंड (ख) वगळण्यात आला.

मादक द्रव्य, वगैरे यासंबंधीच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यास मनाई.

२४.(१) कोणतीही व्यक्ती—

(क) ज्याद्वारे कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग [१][** **] वापरण्याची विनंती करण्यात येत आहे किंवा असे द्रव्य किंवा भांग देऊ करण्यात येत आहे, अथवा ;

(ख) ज्याद्वारे कोणत्याही व्यक्तीस किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तीस किंवा सर्वसामान्य लोकांस या अधिनियमाखालील अपराध करण्यास किंवा तद्न्वये केलेला कोणताही नियम किंवा विनियम किंवा तद्न्वये दिलेला कोणताही आदेश यांच्या तरतुदींचा भंग करण्यास किंवा ते टाळण्यास किंवा तद्न्वये दिलेले कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र याच्या कोणत्याही शर्तीचा भंग करण्यास किंवा त्या टाळण्यास हेतुपूर्वक उत्तेजन किंवा चिथावणी देण्यात येत आहे;

अशी कोणतीही जाहिरात किंवा इतर मजकूर कोणत्याही वर्तमानपत्रात, वृत्तपत्रात, पुस्तकांत, पत्रकात, पुस्तिकेत किंवा कोणत्याही इतर स्वतंत्र किंवा नियतकालिक प्रकाशनात छापणार नाही किंवा प्रसिद्ध करणार नाही अथवा अशी जाहिरात अन्यथा प्रदर्शित करणार नाही किंवा वाटणार नाही अथवा असा मजकूर प्रदर्शित करणार नाही किंवा प्रसृत करणार नाही.

(२) पोट-कलम (३) मध्ये जी तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, या कलमातील कोणतीही तरतूद पुढील गोष्टीस लागू होणार नाही :—

(क) [२][आयुक्ताने] याबाबत सर्वसाधारणत: किंवा विशेषत: मान्यता दिलेल्या सूची किंवा किंमतीच्या याद्या;

(ख) [३][राज्याबाहेर] छापलेले व प्रसिद्ध केलेले कोणतेही वर्तमानपत्र, वार्तापत्र, पुस्तक, पत्रक, पुस्तिका किंवा इतर प्रकाशन यात असलेली कोणतीही जाहिरात किंवा इतर मजकूर ;

(ग) [४][राज्य] शासन, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापूर्वी [५][राज्यात] छापलेल्या किंवा प्रसिद्ध केलेल्या कोणत्याही वर्तमानपत्रात असलेली कोणतीही जाहिरात किंवा इतर मजकूर ; आणि

(घ) [४][राज्य] शासन, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे या कलमाच्या कक्षेतून सर्वसाधारणत: किंवा विशेषत: वगळील अशी कोणतीही इतर जाहिरात किंवा मजकूर.

(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही असले तरी,—

(क) ज्याद्वारे कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग [६][****] वापरण्याची विनंती करण्यात येत आहे किंवा असे द्रव्य किंवा भांग देऊ करण्यात येत आहे ; अथवा

(ख) ज्याद्वारे कोणत्याही व्यक्तीस किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तीस किंवा सर्वसामान्य लोकांस या अधिनियमाखालील कोणताही अपराध करण्यास किंवा तद्न्वये केलेला कोणताही नियम किंवा विनियम किंवा तद्न्वये दिलेला कोणताही आदेश यांच्या तरतुदींचा भंग करण्यास किंवा ते टाळण्यास किंवा तद्न्वये दिलेले कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र याच्या कोणत्याही शर्तीचा भंग करण्यास किंवा त्या टाळण्यास हेतुपूर्वक उत्तेजन किंवा चिथावणी देण्यात येत आहे;

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ६, अन्वये " यांची शिफारस करण्यात येत आहे " हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन १९७३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२ कलम ३, अनुसूचीअन्वये " संचालकाने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ३ अन्वये " दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्याबाहेर " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ३, अन्वये " दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ६ अन्वये " यांची शिफारस करण्यात येत आहे " हा मजकूर वगळण्यात आला.

अशी कोणतीही जाहिरात किंवा मजकूर ज्यात आहे असे [१][राज्याबाहेर], छापलेले व प्रसिद्ध केलेले कोणतेही वर्तमानपत्र, वार्तापत्र, पुस्तक, पत्रक, पुस्तिका किंवा इतर प्रकाशन यांचा [२][राज्यात] प्रसार, बाटप करण्यास किंवा त्याची विक्री करण्यास, [३][राज्य] शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे मनाई करता येईल.

[४][**२४-क.** या प्रकरणातील कोणतीही तरतूद पुढील पदार्थास लागू होते असे मानण्यात येणार नाही. हे प्रकरण [५][काही पदार्थास] लागू नसणे.

(१) मादक दारू म्हणून वापरण्यास अयोग्य असा मद्यार्क असलेला कोणताही प्रसाधनीय सिद्धपदार्थ ;

(२) मादक दारू म्हणून वापरण्यास अयोग्य असा मद्यार्क असलेला कोणताही औषधीय सिद्धपदार्थ ;

[६][(३) मादक दारू म्हणून वापरण्यास अयोग्य असा मद्यार्क असलेला कोणताही प्रतिपूर्तिक सिद्धपदार्थ किंवा द्रावण ;

(४) मादक दारू म्हणून वापरण्यास अयोग्य असा मद्यार्क असलेला कोणताही स्वाद आणणारा अर्क, सत्व किंवा सरबत :]

परंतु, [७][असा पदार्थ] कलम **५९-क** मध्ये दिलेल्या वर्णनाशी जुळता असेल व त्यात दिलेल्या पदार्थाबरहुकूम तयार केलेला असेल:

परंतु आणखी असे की, कोणताही [७][असा पदार्थ] तयार करण्यासाठी कोणतीही दारू किंवा मद्यार्क कलम **३१-क** अन्वये दिलेल्या लायसनवाचून खरेदी करणार नाही, जवळ बाळगणार नाही किंवा वापरणार नाही.]

[८][**स्पष्टीकरण.**––या कलमातील कोणत्याही तरतुदीवरून, कोणत्याही व्यक्तीस मद्यार्क असलेला कोणत्याही प्रसाधनीय किंवा प्रतिपूर्तिक सिद्धपदार्थ किंवा द्रावण पिण्यास अधिकार मिळतो असा त्या तरतुदींचा अर्थ लावता येणार नाही ; आणि याद्वारे अशी तरतूद करण्यात येत आहे की, कोणत्याही व्यक्तीस कोणताही असा सिद्धपदार्थ पिता येणार नाही.]

---

[१] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ३, अन्वये " दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्याबाहेर " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३, अन्वये " दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ७ अन्वये कलम २४-क समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६, कलम ५ (३) अन्वये " विवक्षित प्रसाधनीय व औषधीय सिद्धपदार्थास " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ५ (१) अन्वये खंड (३) आणि (४) समाविष्ट करण्यात आले.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ५ (२) अन्वये " असे सिद्धपदार्थ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम १२ अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

## प्रकरण चार

### नियंत्रण, विनियमन व सूट

सिद्धपदार्थास सूट देणे.

२५. परिमाणानुसार विनिर्दिष्ट केलेल्या शेकडा प्रमाणापेक्षा अधिक नसेल इतका मद्यार्क असलेला कोणत्याही सिद्धपदार्थास या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींपासून किंवा तद्न्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा विनियमांच्या किंवा तद्न्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या तरतुदींपासून सूट देण्यात येईल असा राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनाद्वारे [1][राज्य] शासनास निदेश देता येईल.

मादक द्रव्यांसाठी भट्ट्या व वखारी.

२६. [2][राज्य शासनास]—

(क) [1][राज्य] शासनास ज्या शर्ती घालणे योग्य वाटेल त्या शर्तीवर या अधिनियमाअन्वये दिलेल्या लायसनास अनुसरून ज्या भट्टीत मद्यसार तयार करता येईल अशी भट्टी स्थापन करता येईल ;

(ख) स्थापन केलेली कोणतीही भट्टी बंद करता येईल ;

(ग) दारूची भट्टी व आसवनी बांधण्यासाठी व चालविण्यासाठी [1][राज्य] शासनास ज्या शर्ती घालणे योग्य वाटेल अशा त्या शर्तीवर लायसन देता येईल ;

(घ) जी मध्ये शुल्क न देता कोणतीही दारू [3][मादक द्रव्य] भांग, मोहाची फुले किंवा काकवी ठेवता येईल अशी वखार स्थापन करता येईल किंवा तिच्यासाठी लायसन देता येईल ; आणि

(ङ) अशा रीतीने स्थापन केलेली कोणतीही वखार बंद करता येईल.

वखार, वगैरे यातून [4][मादक द्रव्य], किंवा भांग काढून न नेणे.

२७. पास असल्यावाचून आणि या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये जे कोणतेही शुल्क बसवण्यात आले असेल ते दिल्यावाचून किंवा ते देण्याबद्दल बंधपत्र लिहून दिल्यावाचून कोणतेही [3][मादक द्रव्य] भांग, मोहांची फुले किंवा काकवी या अधिनियमाअन्वये स्थापन केलेल्या किंवा लायसन दिलेल्या कोणत्याही दारूच्या भट्टीतून, वखारीतून किंवा साठवण्याच्या इतर जागेतून काढून नेता येणार नाही.

आयात, वगैरेसाठी पास.

२८. (१) [1][राज्य] शासनास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही प्रकारचे [3][मादक द्रव्य], किंवा भांग यांची आयात, निर्यात किंवा परिवहन करण्यास पास देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यास किंवा कोणत्याही इतर अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल.

(२) असे पास सर्वसाधारणतः ठराविक मुदतीसाठी व ठराविक प्रकारचे [3][मादक द्रव्य] किंवा भांग यासाठी अथवा विशेष किंवा विनिर्दिष्ट केलेल्या प्रसंगासाठी व पाठविलेल्या विशिष्ट मालासाठी फक्त देता येतील.

(३) अशा प्रत्येक पासात पुढील गोष्टी विनिर्दिष्ट करण्यात येतील—

(क) [3][ मादक द्रव्य ] किंवा भांग यांची आयात, निर्यात किंवा परिवहन करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नाव ;

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम १३ (२) अन्वये " संचालकास " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १३ (१) अन्वये " दारू, मादक औषधी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १३ (३) अन्वये " मादक औषधी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ख) ज्या मुदतीपर्यंत पास अंमलात राहील ती मुदत ;

(ग) ज्यासाठी पास देण्यात आला आहे त्या [१][ मादक द्रव्याचे ] किंवा भांगेचे परिमाण व वर्णन ; आणि

(घ) [१][ मादक द्रव्य ] किंवा भांग याची आयात-निर्यात किंवा परिवहन ज्या ठिकाणाहून व ज्या ठिकाणी करावयाचे असेल ती ठिकाणे आणि दहा मैलांपेक्षा अधिक अंतरावर असेलल्या ठिकाणांच्या बाबतीत ती ज्या मार्गाने न्यावयाची असतील तो मार्ग.

[२][**२९.** (क) रेल्वे प्रशासनाद्वारे किंवा कोणत्याही जहाजाद्वारे किंवा बोटीद्वारे खुष्कीच्या मार्गाने किंवा हवाई मार्गाने पाठविण्यात येणारा माल म्हणून कोणताही मादक पदार्थ, भांग विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ, मोहाची फुले किंवा थेट वाहतूक, किंवा थेट वाहतूक.

(ख) पाठविण्याचा माल म्हणून नसताना अन्य प्रकारे केलेली कोणतीही मादक पदार्थ, भांग विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ, मोहाची फुले किंवा काकवी यांची थेट वाहतूक, विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन असेल.]

**३०.** [ औद्योगिक किंवा वैद्यकीय प्रयोजनांकरिता विप्रकृत किंवा शुद्ध केलेले मद्यसार व मद्यार्क जवळ बाळगण्यासाठी लायसन ] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम १५ अन्वये हे कलम वगळण्यात आले.

[३][**३१.** राज्य शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन, कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेस मग ती शासनाच्या व्यवस्थेखाली असो वा नसो—खरोखरीच वैद्यकीय, शास्त्रीय, औद्योगिक किंवा शैक्षणिक प्रयोजनांकरिता कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग किंवा ज्यात मादक द्रव्य किंवा भांग असेल असा कोणताही पदार्थ, तयार करण्यासाठी, विकण्यासाठी, विकत घेण्यासाठी, जवळ बाळगण्यासाठी, सेवन करण्यासाठी किंवा वापरण्यासाठी लायसन देण्यास एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल : खरोखरीच्या वैद्यकीय किंवा इतर प्रयोजनांकरिता लायसन.

परंतु, जेव्हा कोणत्याही व्यक्तीने कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग किंवा ज्यात असे अधिक मादक द्रव्य किंवा भांग असेल असा कोणताही पदार्थ खऱ्याखुऱ्या वैद्यकीय प्रयोजनासाठी, या कलमान्वये तो विकण्यास, लायसन देण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून मिळवला असेल तेव्हा, अशा व्यक्तीस तो जवळ बाळगण्यासाठी, खरेदी करण्यासाठी, सेवन करण्यासाठी, किंवा वापरण्यासाठी लायसन मिळण्याची आवश्यकता असणार नाही :

परंतु आणखी असे की, विहित करण्यात येईल त्या प्रमाणाच्या मर्यादेपर्यंत विप्रकृत मद्यसार जवळ बाळगण्यासाठी लायसनची आवश्यकता असणार नाही. ]

[४][**३१-क.** राज्य शासनास नियम करून किंवा लेखी आदेश देऊन, [५][ कलम २४-क मध्ये नमूद केलेला कोणताही पदार्थ ] तयार करण्याकरिता कोणत्याही प्रकारची दारू किंवा मद्यार्क खरेदी करण्यासाठी, जवळ बाळगण्यासाठी किंवा वापरण्यासाठी विहित करण्यात येतील अशा शर्तीवर लायसन देण्यास एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल. ] [६][ कलम २४-क मध्ये नमूद केलेले पदार्थ ] तयार करण्याकरिता, दारू खरेदी करणे वगैरे-साठी लायसन.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम १३ (१) अन्वये " दारू, मादक औषधी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १४ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १६ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ९ अन्वये कलम ३१-क समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६, कलम ६ (१) अन्वये " कलम २४-अ लागू असलेला कोणताही सिद्धपदार्थ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ६ (२) अन्वये " उल्लेख केलेले सिद्धपदार्थ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४][नीरेसाठी] झाड छेदण्याचे लायसन.

**३२.** [१][राज्य] शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन, [२][नीरा म्हणून विकण्याकरिता किंवा, सेवन करण्याकरिता अथवा गूळ किंवा मादक नसलेला कोणताही इतर पदार्थ तयार करण्याकरिता कोणतीही ताडाची झाडे छेदण्यासाठी] [३][आणि त्यापासून रस काढण्यासाठी] लायसन देण्यास एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल ;

[५][आणि असे लायसन देण्यात आल्यावर, ज्या व्यक्तीच्या मालकीची ती झाडे आहेत किंवा ती जिच्या ताब्यात आहेत अशा व्यक्तीस, ती झाडे छेदण्यासाठी किंवा त्यापासून ताडी काढून घेण्यासाठी परवानगी देता येईल.]

व्यापार व आयात लायसन.

**३३.** [१][राज्य] शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन, कोणत्याही प्रकारची [६][परदेशी दारू] आयात करण्याचा व ती घाऊक विकण्याचा ज्यांचा इरादा आहे अशा व्यक्तींस व्यापार व आयात लायसन देण्यास एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल.

विक्रेत्याचे लायसन.

**३४.** (१) [१][राज्य] शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन, [७][परदेशी दारू विकण्यासाठी] विक्रेत्याचे लायसन देण्यास एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल.

(२) विक्रेत्याचे लायसन पुढील शर्तींवर देण्यात येईल :—

(एक) लायसनदाराजवळ असलेला परदेशी दारूचा साठा ( दुकानात विकण्यासाठी परवानगी दिलेल्या साठ्याव्यतिरिक्त ) त्याच्याकडून शासनाने मान्य केलेल्या [८][गोदामात] ठेवण्यात येईल ;

[९] * * * * *

(तीन) माल गोदामात ठेवणे व त्यावर पर्यवेक्षण ठेवणे या गोष्टीस आनुषंगिक असलेले सर्व भाडे, खर्च व आकार लायसनदार देईल;

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम १० (१) अन्वये " मूळ किंवा " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " खजुराची झाडे छेदण्यासाठी " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम १७ (अ) अन्वये " किंवा त्यापासून रस काढण्यासाठी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम १० (२) अन्वये " ताडी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम १७ (क) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १८ अन्वये " दारू, मादक औषधि किंवा भांग " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम १९ (अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम १९ (ब) (१) अन्वये " वखारीत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम १९ (ब) (२) अन्वये हा खंड वगळण्यात आला.

[१][ (चार) [२][आयुक्त] लादील अशा शर्तींना अधीन राहून लायसनदारास आपल्या परदेशी दारूच्या साठ्यातील कोणताही भाग, राज्यात परदेशी दारूचे लायसन धारण करणाऱ्या व्यक्तींना किंवा रसायनी औषधे विकणाऱ्यांना, अल्पोहारगृहांना, भोजनालयांना आणि क्लबांना किंवा राज्याबाहेरील कोणत्याही व्यक्तींना विकता येईल ;

(पाच) परवाने व प्राधिकारपत्रे धारण करणाऱ्या व्यक्ती यांनाच फक्त परदेशी दारू विकण्याची लायसनदारास परवानगी देण्यात येईल ;]

(सहा) किरकोळ विक्रीसाठी वेळोवेळी आवश्यक असेल तेवढीच दारू आपल्या दुकानात ठेवण्याचा लायसनदारास हक्क असेल ;

(सात) [२][आयुक्त] किंवा त्याने याबाबत प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी जे अनुदेश देईल त्यास अनुसरून लायसनदार आपले हिशेब ठेवील व [३][परदेशी दारूचा] विनियोग करील.

**३५.** (१) [४][राज्य] शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन, या अधिनियमान्वये दिलेले परवाने धारण करणाऱ्या व्यक्तींना परदेशी दारू विकण्यासाठी हॉटेलच्या व्यवस्थापकांना लायसन देण्यास एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल : हॉटेल लायसन.

परंतु, परवाने धारण करण्यास लायक अशा पुरेशा संख्येइतक्या व्यक्ती सामान्यत: अशा हॉटेलमध्ये जेवण घेतात अशी [४][राज्य] शासनाची खात्री झाली पाहिजे.

(२) अशी लायसने पुढील शर्तीवर देण्यात येतील :—

(एक) जे परवाना-धारक त्या हॉटेलमध्ये [५][ राहात असतील किंवा जेवण घेत असतील ] त्यांनाच [६] * * * * दारू विकण्यात येईल ;

(दोन) जनतेतील कोणत्याही व्यक्तीस हॉटेलच्या ज्या कोणत्याही खोलीत प्रवेश मिळू शकतो तीत, विकण्यात आलेल्या दारूचे सेवन करण्याची परवानगी देण्यात येणार नाही ;

(तीन) हॉटेलच्या जागेत परवाने देण्यासाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी [७][किंवा हॉटेलात परदेशी दारू देणे किंवा ती सेवन करणे यावर देखरेख ठेवण्यासाठी] उत्पादनशुल्क आस्थापनेतील कोणत्याही अधिकाऱ्याचा जो कोणताही खर्च झाला असेल तो हॉटेल लायसन धारक देतील.

**३६.** [हॉटेलांना विशेष आयात लायसन देणे] हे कलम १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २१ अन्वये वगळण्यात आले.

**३७.** [आगगाडीतील जेवणाच्या डब्याचे लायसन] हे कलम १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २१ अन्वये वगळण्यात आले.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम १९ (ब) (३) अन्वये मूळ खंडाऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ ; अनुसूची अन्वये " संचालक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम १९ (ब) (४) अन्वये " मालाची " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम १२ (२) अन्वये " राहणाऱ्यास " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १२ (१) अन्वये " सीलबंद बाटलीतून " हा मजकूर वगळण्यात आला.

[७] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २० अन्वये " त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी " या मजकुरानंतर हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

नौवहन कंपनीस ४[व जहाजाच्या प्रमुखास] लायसन देणे.

३८. १[राज्य] शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन कोणत्याही नौवहन कंपनीस प्रत्येक जहाजाकरिता २[किंवा कोणत्याही नौकाधिपतीस] अशा जहाजावर परदेशी दारू विकण्यासाठी ३[आणि परदेशी दारू वापरण्यास किंवा सेवन करण्यास परवानगी देण्यासाठी विहित करण्यात येतील अशा शर्तीवर] लायसन देण्यास एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल.

६ **

६ * *

युद्धनौका, सेनानौका, ७[सेनादलाची भोजनालये व आहारगृहे] यांत परदेशी दारू वापरण्याची किंवा सेवन करण्याची परवानगी.

३९. १[राज्य] शासनास, ५[सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीवर—

(क) ८[सेनादलाची] भोजनालये व आहारगृहे यातील सेनादलातील व्यक्तींस, आणि

(ख) युद्धनौका व सेनानौका यांच्या नाविकगणास व त्यांवरील सेनादलातील व्यक्तींस —

(एक) परदेशी दारू विकण्याची,

(दोन) अशी दारू खरेदी करण्याची, वापरण्याची किंवा तिचे सेवन करण्याची, परवानगी देता येईल.]

परवाने.

४०. (१) १[राज्य] शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन, परदेशी दारू वापरण्यासाठी किंवा तिचे सेवन करण्यासाठी पुढील शर्तीवर व्यक्तीस परवाने देण्यात एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल :—

(क) अशी व्यक्ती अज्ञान नसावी ;

९ * * * * *

---

१ विधि अनुकूल आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम १४ (१) अन्वये " प्रत्येक जहाजाकरिता " या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम १४ (२) अन्वये " अशी दारू अशा जहाजावरील फक्त खऱ्याखुऱ्या उतारुंनाच विकण्यात येईल या शर्तीवर " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम १४ (३) अन्वये " जहांज कंपन्यांना " या मजकुरानंतर हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

५ वरील अधिनियमाच्या कलम १५ (१) अन्वये " सरकारी गॅझेटात " या मजकुराने सुरू होणाऱ्या " अल्पाहारगृहे " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ वरील अधिनियमाच्या कलम १५ (२) अन्वये " मालाच्या बोटी ", हा मजकूर वगळण्यात आला.

७ वरील अधिनियमाच्या कलम १५ (२) अन्वये " लष्करी आणि आरमारी भोजनगृहे व कॅन्टीन " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८ सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २२ अन्वये " भोजनालये व आहारगृहे " या मजकुरापूर्वी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

९ सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम १६ (१) अन्वये खंड (ख) वगळण्यात आला.

(ग) (एक) ज़ेथे सर्वसाधारणंतः अशी दारू वापरण्यात येते किंवा तिचे सेवन करण्यात येते अशा भारताबाहेरील कोणत्याही देशात अशी व्यक्ती जन्मलेली व वाढलेली होती किंवा तिचा अशा देशात अधिवास होता ; अथवा

१९३९ चा १६. (दोन) परदेशी व्यक्तींच्या नोंदणीबाबत अधिनियम, १९३९ अन्वये परदेशी व्यक्तींच्या नोंदवहीत अशा व्यक्तीचे नाव दाखल झालेले आहे व तिचा [२][भारतात] अधिवास नाही :

परंतु, उप-खंड (एक) किंवा (दोन) यात वर्णन केलेली व्यक्ती ही पुढे सांगितलेल्या प्रकारची असली पाहिजे, म्हणजे :—

(क-१) अशी व्यक्ती भारतात तात्पुरती राहत असली पाहिजे व तसे राहण्याचा तिचा इरादा असला पाहिजे व भारताबाहेरील कोणत्याही देशात एकमेव व कायमचे घर करण्याचा तिचा ठाम व निश्चित हेतू असला पाहिजे ; आणि

(ख-१) अशी व्यक्ती सामान्यतः दारू वापरीत असली पाहिजे किंवा तिचे सेवन करीत असली पाहिजे.

[३] * * * * *

(३) असे परवाने विहित करण्यात येतील अशा परिमाणापुरते देण्यात येतील.

[४][ (४) कोणत्याही बाबतीत पोट-कलम (१), खंड (क) किंवा खंड (ग) यांअन्वये घालून दिलेल्या शर्ती पुऱ्या झाल्या आहेत किंवा नाहीत याविषयी कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, राज्य शासन त्याचा निर्णय देईल व राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.]

[५] * * * * *

[६][४०-क. (१) राज्य शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन, जिला आपली प्रकृती चांगली ठेवण्यासाठी परदेशी दारूची आवश्यकता असेल अशा कोणत्याही व्यक्तीस अशी दारू वापरण्यासाठी तिचे सेवन करण्यासाठी आरोग्य परवाना देण्यास एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल : आरोग्य परवाने.

परंतु, कोणताही असा परवाना एखाद्या अज्ञान व्यक्तीस देण्यात येणार नाही.

(२) असा परवाना, विहित करण्यात येईल इतक्या परिमाणापुरता व विहित करण्यात येतील अशा आणखी शर्तीवर देण्यात येईल.

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम १६ (१) अन्वये खंड (ख) वगळण्यात आला.

[२] विधि अनुकूल आदेश, १९५० अन्वये " भारताची वसाहत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २३ अन्वये पोट-कलम (२) वगळण्यात आले.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम १६ (२) अन्वये पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १६ (३) अन्वये हे स्पष्टीकरण वगळण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १७ अन्वये कलमे ४०-क आणि ४०-ख दाखल करण्यात आली.

निकडीचे परवाने.

**४०-ख.** (१) राज्य शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन, कोणत्याही व्यक्तीस, तिच्या स्वतःच्या उपयोगासाठी किंवा सेवनासाठी कोणत्याही कुटुंबप्रमुखास, निकडीच्या प्रसंगी त्याच्या कुटुंबातील व्यक्तीने औषध म्हणून वापरण्यासाठी ब्रँडी, रम किंवा शँपेन किंवा इतर कोणत्याही प्रकारची दारू वापरण्यासाठी किंवा तिचे सेवन करण्यासाठी निकडीचे परवाने देण्यास एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल :

परंतु, या कलमान्वये परवाना देण्यात आलेल्या व्यक्तीस [१][विहित करण्यात येईल त्या अटींना अधीन राहून] ज्या दारूसंबंधी परवाना देण्यात आला असेल अशी दारू निकडीच्या प्रसंगी औषधे म्हणून वापरणे ज्यास आवश्यक असेल अशा कोणत्याही इतर व्यक्तीस ती वापरण्यास किंवा तिचे सेवन करण्यास परवानगी देता येईल :

परंतु आणखी असे की, कोणत्याही एका वेळी एका कुटुंबातील एकापेक्षा अधिक व्यक्तींस असा परवाना देण्यात येणार नाही.

[२] * * * * *

(३) असे परवाने, विहित करण्यात येईल अशा परिमाणापुरते व विहित करण्यात येतील अशा आणखी शर्तीवर देण्यात येतील.

[२] * * * * *

परकीय राज्यातील राजे वगैरे यांना खास परवाने.

**४१.** [३][ राज्य] शासनास, पुढील [४][कोणत्याही व्यक्तीस] परदेशी दारू वापरण्यासाठी किंवा तिचे सेवन करण्यासाठी खास परवाने देता येतील :—

(क) परकीय राज्याचा राजा किंवा प्रमुख ;

(ख) परकीय राज्याचा राजदूत, राजनैतिक दूत अथवा वाणिज्यदूत, परकीय वाणिज्यदूत किंवा व्यापार, वाणिज्य किंवा इतर प्रतिनिधी ;

(ग) खंड (क) किंवा (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीने नेमलेल्या कर्मचारी वर्गातील व्यक्ती किंवा त्याच्या नोकरीत असलेली व्यक्ती : परंतु, अशी व्यक्ती परकीय राज्याची नागरिक असली पाहिजे ; [५] * * * *

[६][ (ग-१) परकीय राज्याचा सदस्य ;

(ग-२) ज्या आंतरराष्ट्रीय संघटनांना संयुक्त राष्ट्र (विशेषाधिकार आणि उन्मुक्ती) अधिनियम, १९४७ अन्वये किंवा त्यानुसार वेळोवेळी विशेषाधिकार आणि उन्मुक्ती देण्यात येतात त्या कोणत्याही आंतरराष्ट्रीय संघटनेचा प्रतिनिधी किंवा अधिकारी ; आणि]

१९४७ चा ४६.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २४ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २४ (ब) अन्वये पोट-कलम (२) आणि स्पष्टीकरण वगळण्यात आले.

[३] विधि अनुकूल आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम १८ अन्वये " परकीय राज्याच्या राजकर्त्यांना " या मजकुराने सुरू होणारा व " एन्व्हांय किंवा कौंसिल " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २५ (अ) अन्वये " आणि " हा मजकूर वगळण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २५ (ब), अन्वये " खंड (ग-१) आणि (ग-२) " दाखल करण्यात आले.

(घ) खंड (क), (ख) [1][(ग), (ग-१) किंवा (ग-२)] यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीची पत्नी किंवा तिच्यावर अवलंबून असलेला तिचा कोणताही नातेवाईक.

४२. [परवान्यांचे हस्तांतरण करता येणार नाही.] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २६ अन्वये वगळण्यात आले.

[2][४३. (१) कलम ४०-ख व्यतिरिक्त या अधिनियमाच्या कोणत्याही इतर तरतुदींअन्वये दिलेला परवाना धारण करणारी कोणतीही व्यक्ती सार्वजनिक जागेत किंवा जेथे लोकांस प्रवेश मिळू शकतो अशा हॉटेलातील किंवा संस्थेतील खोलीत दारू पिणार नाही.

विवक्षित परवाने धारण करणाऱ्या व्यक्तींनी परदेशी दारू वापरणे किंवा तिचे सेवन करणे याचे विनियमन.

(२) कलम ४०-**ख** अन्वये दिलेल्या परवाना धारण करणारी कोणतीही व्यक्ती आपल्यापाशी असलेल्या दारूपैकी कोणत्याही दारूचा उपयोग करण्याची अथवा तिचे सेवन करण्याची कोणत्याही इतर व्यक्तीस परवानगी देणार नाही.

[3][ (३) कलम ४०, ४१, ४६, ४६-**क** किंवा ४७ अन्वये दिलेला परवाना धारण करीत असलेल्या व्यक्तीस तिला परवान्यान्वये जी परदेशी दारू बाळगता येते अशा दारूपैकी कोणत्याही दारूचा उपयोग करण्यासाठी किंवा तिचे सेवन करण्यासाठी, त्या कलमांपैकी कोणत्याही कलमान्वये परवाना धारण करणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीस परवानगी देता येईल.

(४) कलम ४०, ४१, ४६, ४६-**क** किंवा ४७ अन्वये दिलेला परवाना धारण करीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही समारंभाच्या किंवा इतर प्रसंगी किंवा ज्या ठिकाणी ( तिच्या कुटुंबातील व्यक्ती किंवा तिचे नोकर नसणारे ) उपरोक्त परवान्यांपैकी कोणताही परवाना धारण न करणाऱ्या व्यक्ती उपस्थित असतील अशा सभेत सेवन करण्यास कोणतीही दारू देणार नाही.] ]

४४. (१) [4][राज्य] शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन [5][परवाने धारण करणाऱ्या आपल्या सदस्यांना] परदेशी दारू विकण्यासाठी [4][राज्य] शासनाने याबाबत मान्य केलेल्या क्लबांस लायसन [6][देता येईल किंवा ते देण्यास एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल.]

क्लब यांना लायसन.

(२) अशी लायसने पुढील शर्तींवर देण्यात येतील :—

[7] * * * * * *

(ख) क्लबाच्या ज्या कोणत्याही खोलीत लोकांस प्रवेश मिळू शकतो त्या खोलीत ज्याच्या जवळ परवाना नाही अशी कोणतीही व्यक्ती हजर असेल त्यावेळी कोणताही परवाना धारण करणाऱ्या व्यक्तीस तेथे, कोणत्याही प्रकारची दारू देणार नाही ;

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २५ (क) अन्वये " किंवा (क) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २० अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[3] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २७ अन्वये मूळ पोट-कलम (३) ऐवजी पोट-कलमे (३) व (४) दाखल करण्यात आली.

[4] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २८ (अ) अन्वये " लेखी आदेश देऊन " या मजकुरानंतर हा मजकूर जादा दाखल करण्यात आले.

[6] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २१ अन्वये " देण्यास अधिकृत करता येईल अथवा लायसन्से देता येईल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २८ (ब), (१) अन्वये खंड (क) वगळण्यात आला.

(ग) परवाना धारण करणाऱ्या कोणत्याही सदस्याने [१][लेखी] प्राधिकृत केल्यास क्लबास अशा सदस्याच्या वतीने अनुज्ञात परिमाणाइतकी दारू साठविता येईल. [१]* * * *

[२]* * * * *

[३]* * * * *

धार्मिक विधीसाठी प्राधिकारपत्र देणे.

४५. (१) [४][राज्य] शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन धार्मिक विधीसाठी दारूचा उपयोग करण्याकरिता कोणत्याही व्यक्तीस प्राधिकारपत्र देण्यास एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल :

परंतु, अशी व्यक्ती ज्या समाजातील आहे त्या समाजाच्या धार्मिक तत्त्वांनुसार अशा दारूचा उपयोग करणे आवश्यक आहे अशी प्राधिकृत अधिकाऱ्याची खात्री झाली पाहिजे.

[५][(२) प्राधिकारपत्रांसाठी अर्ज करणारी व्यक्ती ही ज्या समाजातील असेल त्या समाजातील ज्या व्यक्तींना राज्य शासनाने याबाबत मान्यता दिली असेल अशा व्यक्तीच्या शिफारशीवरून या कलमाअन्वये प्राधिकारपत्र देण्यात येईल].

[६]* * * * *

(४) धार्मिक विधीसाठी कोणत्याही व्यक्तीस दारूचा उपयोग करणे आवश्यक आहे किंवा कसे याविषयी कोणताही विवाद उद्भवल्यास अशा व्यक्तीस [७][आयुक्ताकडे] अर्ज करता येईल. [७][आयुक्त] [८]* * * संक्षिप्तरीत्या चौकशी करून धार्मिक विधीसाठी अशा व्यक्तीस दारूचा उपयोग करणे आवश्यक आहे किंवा कसे याविषयी निर्णय देईल.

(५) पोट-कलम (४) अन्वये [७][आयुक्ताने] दिलेला निर्णय अंतिम असेल.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २८ (ब ) (२) अन्वये " अधिकृत केल्यास " या मजकुरांपूर्वी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला, आणि याअन्वये शेवटी असलेला " आणि " हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २८ (ब) (१) अन्वये खंड (घ) वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २८ (ब) (३) अन्वये स्पष्टीकरण वगळण्यात आले.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुरांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २९ (अ) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २९ (ब) अन्वये पोट-कलम (३) वगळण्यात आले.

[७] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ अनुसूचीन्वये " संचालकाकडे " आणि " संचालकाने " या मजकुरांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २९ (क) अन्वये " विहित केलेल्या रीतीने " हा मजकूर वगळण्यात आला.

[१][४६. (१) राज्य शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन, जी व्यक्ती,— अभ्यागताचे परवाने.

(क) (एक) परदेशी नागरिक असेल किंवा भारताचा नागरिक असून भारताच्या ज्या भागात मद्यार्कयुक्त दारू सेवन करण्यास कायद्याने साधारणतः बंदी करण्यात आली नसेल अशा भागात रहात असेल ; किंवा

(दोन) परदेशी नागरिक असेल किंवा भारताचा नागरिक असेल आणि भारताच्या ज्या भागात मद्यार्कयुक्त दारू सेवन करण्यास कायद्याने बंदी करण्यात आली असेल त्या भागात रहात असेल परंतु असे मद्य, परवाना किंवा इतर प्राधिकारपत्र मिळवून सेवन करीत असेल ; आणि

(ख) एक आठवड्याहून अधिक नसलेल्या मुदतीसाठी राज्यास भेट देत असेल,—

अशा व्यक्तीस परदेशी दारू विकत घेण्यासाठी, ती ताब्यात ठेवण्यासाठी, ती वापरण्यासाठी आणि तिचे सेवन करण्यासाठी अभ्यागताचे परवाने देण्यास एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल.

(२) असे परवाने कोणत्याही एका वेळी सामान्यतः एका आठवड्याहून अधिक मुदतीकरिता देण्यात येणार नाहीत ; परंतु असा परवाना कोणत्याही एका वेळी जास्तीत जास्त एक आठवड्याच्या आणखी मुदतीसाठी वेळोवेळी वाढविता येईल ; मात्र अशी एकूण मुदत एक महिन्यापेक्षा अधिक असणार नाही.]

[२][४६-क. (१) राज्य शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन, प्रवासी व्यक्तीस परदेशी दारू सेवन करण्याकरिता, वापरण्याकरिता व विकत घेण्याकरिता [४][एखादा प्रवाशाचा परवाना] देण्यास एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल. [३][प्रवाशाचा परवाना.]

(२) प्रवाशाचा परवाना हा, ज्या मुदतीसाठी प्रवाशाचा [५][राज्यात] राहण्याचा इरादा असेल त्या मुदतीसाठी देण्यात येईल ; परंतु असा परवाना कोणत्याही बाबतीत एक महिन्याहून अधिक मुदतीसाठी देण्यात येणार नाही.

(३) असे परवाने [६][आयुक्त] याबाबत [७][ठरवील] अशा ठिकाणी मिळतील.]

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३० अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ४६ दाखल करण्यात आले.

[२] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम ४ अन्वये कलम ४६-क जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३१ (क) अन्वये " प्रवाशांचे परवाने " या समासटीपेऐवजी ही समासटीप दाखल करण्यात आली.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३१ (अ) अन्वये " प्रवाशांचे परवाने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ३ अन्वये " दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ अनुसूची अन्वये " संचालक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३१ (ब) अन्वये " जाहीर करील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अंतरिम परवाने.

४७. (१) कलम [१][४०, ४०-क व ४१] यांत काहीही अंतर्भूत असले तरी, [२][राज्य] शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन, उक्त तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींअन्वये परवान्यासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तींना अंतरिम परवाने देण्यास [३][एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल].

(२) असे अंतरिम परवाने दोन महिन्यापेक्षा अधिक मुदतीसाठी देण्यात येणार नाहीत.

[८][मादक औषधिद्रव्ये [९][किंवा अफू] सेवन करण्यास किंवा वापरण्यास [१०][परवाने.]]

४८. (१) [२][राज्य] शासनास, नियम करून किंवा लेखी आदेश देऊन, विहित करण्यात येईल इतक्या परिमाणात [४][मादक औषधिद्रव्य] [५][किंवा अफू] [६][सेवन करण्याकरिता किंवा वापरण्याकरिता] [७][परवाने] देण्यासाठी एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल.

(२) [७][असे परवाने] वैद्यक मंडळाने प्रमाणपत्र दिल्यावर दिले जातील.

परवाने अहस्तांतरणीय असणे.

[११][**४८-क.** कलम ४०, ४०-क, ४०-ख, ४१, ४६, ४६-क, ४७ किंवा ४८ अन्वये मंजूर केलेले परवाने अहस्तांतरणीय असतील.]

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २२ (१) अन्वये " ४० आणि ४१ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २२ (२) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये " भांगचे पदार्थ " मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३२ (ब) अन्वये " मादक औषधि " या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २३ (१) अन्वये " विकण्याचे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३२ (अ) अन्वये " लैसेन्से " आणि " अशी लैसेन्से " या मजकुराऐवजी अनुक्रमे " परवाने " " असे परवाने " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २३ (२) अन्वये मूळ समास टीपेऐवजी ही समास टीप दाखल करण्यात आली.

[९] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३२ (क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[११] वरील अधिनियमाच्या कलम ३३ अन्वये कलम ४८-क जादा दाखल करण्यात आले.

[१][४९. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला, कोणतेही मादक द्रव्य, भांग किंवा ताडी यांची आयात करण्याचा, निर्यात करण्याचा, वाहतूक करण्याचा, निर्मिती करण्याचा, ती बाटलीत भरण्याचा, त्यांची विक्री करण्याचा, खरेदी करण्याचा, ती जवळ बाळगण्याचा किंवा त्यांचा वापर करण्याचा अनन्य अधिकार किंवा विशेषाधिकार असेल आणि या अधिनियमान्वये किंवा त्याखाली तयार केलेल्या कोणत्याही नियमान्वये किंवा आदेशान्वये, कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही अशा प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या कोणत्याही लायसनसाठी, परवान्यासाठी, पासासाठी, प्राधिकारपत्रासाठी किंवा अन्य परवानगीसाठी कोणतीही फी आकारण्यात आणि वसूल करण्यात आली असेल त्या बाबतीत, अशा फी मध्ये राज्य शासनाकडून किंवा त्याच्या वतीने त्या व्यक्तीला असा अधिकार किंवा विशेषाधिकार दिल्याबद्दलच्या भाड्याचा किंवा मोबदल्याचा समावेश होत असल्याचे मानण्यात येईल.]

शासनाचा मादक द्रव्ये, इत्यादी आयात करण्याचा अनन्य विशेषाधिकार आणि आकारल्या जाणाऱ्या फीमध्ये संबंधित व्यक्तीला असा विशेषाधिकार देण्याबद्दलच्या भाड्याचा किंवा मोबदल्याचा समावेश असणे.

५०. [अफू वखारीत ठेवणे.] हे कलम सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ कलम ३४ अन्वये वगळण्यात आले.

५१. [वखारीत ठेवलेले मादक द्रव्य किंवा भांग यांची विक्री वगैरे यांसाठी नियम.] हे कलम सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३४ अन्वये वगळण्यात आले.

५२. या अधिनियमात काहीही असले तरी, [२][राज्य] शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास कोणतेही मादक द्रव्य, भांग किंवा मोहाची फुले किंवा काकवी आयात करणे, निर्यात करणे, त्यांचे परिवहन करणे, ती जवळ बाळगणे, विकणे, विकत घेणे, त्यांची लागवड करणे, ती गोळा करणे, तयार करणे, [३][बाटलीत भरणे,] त्यांचे सेवन करणे व ती वापरणे यांसाठी अथवा ताडी देणारे कोणतेही झाड छेदण्यासाठी किंवा अशा झाडापासून ताडी काढण्यासाठी या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अन्वये ज्या बाबतीत खास तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत कोणतीही लायसने, परवाने किंवा पास देता येतील आणि त्याने तसे करणे हे कायदेशीर असेल.

काही बाबतीत लायसने, परवाने व पास देण्याचा प्राधिकृत अधिकाऱ्याचा अधिकार.

५३. या अधिनियमाअन्वये दिलेली सर्व लायसने, परवाने, पास किंवा प्राधिकारपत्रे ही विहित करण्यात येईल अशा नमुन्याप्रमाणे असतील. तसेच तीत या अधिनियमान्वये ज्या कोणत्याही शर्तीची तरतूद करण्यात आली असेल त्याशिवाय आणखी किंवा त्यात फेरफार करून किंवा त्यांच्याऐवजी विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन असतील आणि ती विहित करण्यात येईल अशी फी दिल्यानंतर देण्यात येतील :

लायसने, वगैरे यासंबंधी सर्वसाधारण शर्ती.

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम २ अन्वये कलम ४९ समाविष्ट करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३५ अन्वये " तयार करणे " या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, असे प्रत्येक लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र [१][यांसाठी जो अर्ज करील] त्याने आपण अशा लायसनच्या, परवान्याच्या, पासाच्या किंवा प्राधिकारपत्राच्या सर्व शर्तींचे व या अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करू याबद्दल हमी दिली असेल, आणि अशा शर्तींचे व तरतुदींचे तो पालन करील याबद्दल [२][* * *.*] असे लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र देण्यास प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याचे मत झाले तरच त्यास असे लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र देण्यात येईल.

विवक्षित लायसनदारांनी मापे, वगैरे ठेवणे.

[३][**५३-क.** या अधिनियमान्वये मंजूर केलेल्या लायसनअन्वये जी कोणी व्यक्ती, कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग तयार करील किंवा विकील अशी प्रत्येक व्यक्ती,—

(क) मादक द्रव्याची किंवा भांगेची तीव्रता किंवा प्रत यांची पारख करण्यासाठी, जिल्हाधिकारी विहित करील अशी वजने व मापे आणि उपकरणे स्वत: जवळ ठेवण्यास आणि ती सुस्थितीत राखण्यास, आणि

(ख) या बाबतीत योग्य रीतीने अधिकार दिलेल्या कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्याने मागणी केली असता, त्याच्या ताब्यात असलेले कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग यांची दारूबंदी अधिकाऱ्यास आवश्यक वाटेल त्या रीतीने मोजणी करण्यास, तोलण्यास किंवा पारख करण्यास किंवा ती मोजण्याची, तोलण्याची किंवा त्याची पारख करण्याची व्यवस्था करण्यास,

बांधलेली असेल.]

लायसने व परवाने रद्द करण्याचा किंवा तहकूब करण्याचा अधिकार.

**५४.** (१) (क) या अधिनियमाअन्वये दिलेले कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीने द्यावयाची कोणतीही फी किंवा शुल्क योग्य रीतीने दिले नाही तर ;

(ख) ज्या कारणासाठी असे लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र देण्यात आले ते कारण नाहीसे झाले तर ;

(ग) असे लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीने किंवा त्याच्या नोकराने किंवा त्याच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने त्याच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने असे लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र याच्या कोणत्याही अटीचा किंवा शर्तीचा किंवा ते धारण करणाऱ्या व्यक्तीने पूर्वी जे कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण केले होते त्याच्या कोणत्याही अटीचा किंवा शर्तीचा भंग केला तर ;

(घ) असे लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीस किंवा तिच्या नोकरीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा त्याच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने त्याच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस या अधिनियमाखालील कोणताही अपराध केल्याबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले असेल किंवा ते धारण करणाऱ्या व्यक्तीस कोणत्याही दखलपात्र व जामीन घेण्यास अयोग्य असा, कोणताही अपराध केल्याबद्दल किंवा [४][घातक औषधिद्रव्य अधिनियम, १९३० किंवा औषधिद्रव्य अधिनियम, १९४० किंवा मुंबई औषधिद्रव्य (नियंत्रण) अधिनियम, १९५२] किंवा भारतीय पण्यचिन्ह अधिनियम, १८८९ याखालील अपराध केल्याबद्दल अथवा भारतीय दंड संहिता, कलमे ४८२ ते ४८९ (दोन्ही धरून) याअन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणताही अपराध केल्याबद्दल अथवा समुद्र सीमाशुल्क अधिनियम, १८७८, कलम १६७ च्या अनुसूचीतील अनुच्छेद ८ अन्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध केल्याबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले तर ;

१९३० चा २. १९४० चा २३. १९५२ मुंबई २९. १८८९ चा ४. १८६० चा ४५. १८७८ चा ८.

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३६ अन्वये " जो धारण करील त्याने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २४ अन्वये " आणि ज्यामुळे या अधिनियमाचे उद्देश व कारणे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या निष्फळ अथवा निरर्थक होतील असे कोणतेही कृत्य करणार नाही याबद्दल " हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३७ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३८ (अ) (२) अन्वये " अपायकारक औषधि अधिनियम, १९३० " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(ङ) असे लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र जाणूनबुजून खोटी कारणे देऊन किंवा लबाडीने प्राप्त केले असेल तर,--]

[२][-असे कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्यास कारणे लेखी नमूद करून असे कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र रद्द करता येईल किंवा तहकूब करता येईल.]

(२) कोणत्याही व्यक्तीने धारण केलेले लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र पोट-कलम (१) अन्वये रद्द करण्यात येईल तेव्हा, उपरोक्त प्राधिकाऱ्यास या अधिनियमाअन्वये अशा व्यक्तींस दिलेले किंवा दिले आहे असे समजण्यात येणारे कोणतेही इतर लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र रद्द करता येईल.

[३][(३) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, कारणे लेखी नमूद करून कोणतेही लायसन परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र रद्द करता येईल किंवा तहकूब करता येईल.]

**५५.** लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कलम ५४ अन्वये ते रद्द केल्याबद्दल किंवा तहकूब केल्याबद्दल कोणतीही भरपाई मिळण्याचा किंवा त्याबाबत दिलेली कोणतीही फी किंवा अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क असणार नाही.

लायसने, वगैरे धारण करणाऱ्या व्यक्तीस ते रद्द केल्याबद्दल किंवा तहकूब केल्याबद्दल भरपाई मिळण्याचा किंवा फी परत मिळण्याचा हक्क असणार नाही.

**५६.** (१) कलम ५४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी [४][एखादे लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र] रद्द करण्यात यावे असे ते देणाऱ्या प्राधिकाऱ्यास वाटेल तेव्हा, त्यास,--

इतर कारणांसाठी रद्द करणे.

(क) तसे करण्याचा आपला इरादा आहे याविषयी कमीत कमी पंधरा दिवसांची जी लेखी नोटीस देण्यात येईल तिची मुदत संपल्यानंतर ; अथवा

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ३८ (अ) (३) अन्वये हा नवीन खंड दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३८ (अ) (१) अन्वये " संचालकास किंवा याबाबत अधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास असे कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा अधिकारपत्र रद्द करण्याचा किंवा तहकूब करण्याचा अधिकार आहे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३८ (ब) अन्वये मूळ पोट-कलमा ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३९ (अ) (१) अन्वये " लैसन्स " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ (ख) तसे करण्याबद्दल आपली कारणे नोटीस न देता नमूद करून ताबडतोब ],

[२][ असे लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र] रद्द करता येईल.

[३][ (२) पोट-कलम (१) अन्वये लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र रद्द करण्यात आल्यास, अशा लायसनच्या, परवान्याच्या, पासाच्या किंवा प्राधिकारपत्राच्या मुदतीपैकी न संपलेल्या मुदतीच्या प्रमाणातील त्याच्या फीचा भाग आणि अशा लायसनच्या, परवान्याच्या, पासाच्या किंवा प्राधिकारपत्राच्या संबंधातील ते धारण करणारांने ठेवलेली अनामत रक्कम ही, त्याजकडून राज्य शासनास येणे असलेली रक्कम वजा केल्यानंतर त्यास परत करण्यात येईल. ]

लायसन जप्त करणे.

५७. कोणत्याही इतर कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, लायसन धारण करणाऱ्या व्यक्तीने द्यावयाचे कोणतेही शुल्क किंवा फी देण्यात कसूर केल्यामुळे ते लायसन त्या कलमाअन्वये रद्द होण्यास पात्र होईल तेव्हा, असे लायसन देणाऱ्या प्राधिकाऱ्यास ते जप्त करण्याचा व त्याअन्वये चालणारा धंदा आपल्या व्यवस्थेखाली घेण्याचा अधिकार आहे आणि अशा व्यवस्थेपासून झालेल्या नफ्याची रक्कम ही, अशा जप्तीबद्दल व व्यवस्थेबद्दल झालेला सर्व खर्च भागविण्यात आल्यानंतर, थकबाकीच्या ज्या रकमेसाठी असे लायसन जप्त करण्यात आले ती रक्कम आणि अशा लायसनच्या बाकीच्या मुदतीत त्याबद्दल द्यावयाची रक्कम त्यांच्यापेक्षा कमी असेल तर, अशी कमी पडणारी रक्कम, जणू ती या अधिनियमाच्या कोणत्याही एका तरतुदीअन्वये द्यावयाचे शुल्क किंवा फी आहे असे समजून, लायसनदाराकडून वसूल करण्यात येईल ; परंतु अशी नफ्याची रक्कम लायसनअन्वये द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक झाल्यास, अशा कोणत्याही फायद्याची रक्कम मिळण्याचा लायसनदारास हक्क असणार नाही.

लायसनअन्वये असलेला हक्क, स्वामित्वहक्क किंवा हितसंबंध आदेशिकेची बजावणी करताना विकला जाण्यास किंवा जप्त केला जाण्यास पात्र नसणे.

५८. त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, अधिनियमाअन्वये दिलेले कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र यातील कोणताही हक्क, स्वामित्वहक्क किंवा हितसंबंध कोणत्याही दिवाणी न्यायालयाने किंवा कोणत्याही इतर न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही आदेशिकेची बजावणी करताना विकता येणार नाही, हस्तांतरित करता येणार नाही किंवा जप्त करता येणार नाही.

उत्पादन, वगैरेवर देखरेख ठेवणे.

[४][**५८-क.** राज्य शासनास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, कोणतेही मादक द्रव्य, विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ, भांग, मोहाची फुले किंवा काकवी यांचे उत्पादन, आयात, निर्यात, परिवहन, साठा, विक्री, खरेदी, वापर, ती गोळा करणे किंवा त्यांची लागवड करणे हे राज्य शासनास ज्यांची नेमणूक करणे योग्य वाटेल अशा दारूबंदी व उत्पादन शुल्क कर्मचारीवर्गाच्या किंवा पोलीस

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, याचे कलम ३९ (अ) (३) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३९ (अ) (२) अन्वये " लैसेन्स " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३९ (ब) अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४० अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

कर्मचारीवर्गाच्या देखरेखीखाली करण्यात येईल ; आणि असे मादक द्रव्य, विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ, भांग, मोहाची फुले किंवा काकवी यांचे उत्पादन, आयात, निर्यात, परिवहन, साठा, विक्री, खरेदी, वापर किंवा ती गोळा करणाऱ्या किंवा त्यांची लागवड करणाऱ्या व्यक्तीकडून अशा कर्मचारीवर्गाचा खर्च देण्यात येईल :

परंतु, राज्य शासनास व्यक्तींच्या किंवा संस्थेच्या कोणत्याही वर्गास अशा कर्मचारीवर्गाच्या खर्चाची संपूर्ण रक्कम किंवा त्याचा भाग देण्यापासून सूट देता येईल. ]

लायसन धारण करणाऱ्या व्यक्तीस [३][किंवा मालकास] साठ्याची विल्हेवाट लावण्याविषयी फर्माविण्याचा [१][आयुक्ताचा] अधिकार.

५९. (१) कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र ज्या मुदतीपर्यंत अमलात असेल ती मुदत संपली नाही तरीही [१][ आयुक्तास ] ते धारण करणाऱ्या व्यक्तीला आदेश देऊन, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी मादक द्रव्य, [२][ विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ ] किंवा भांग किंवा मोहाची फुले यांचा त्याच्यापाशी जो साठा असेल त्याची विल्हेवाट लावण्याविषयी निदेश देण्याचा अधिकार आहे.

[४][ (१-क) तसेच [१][ आयुक्तास ], कोणतेही मादक द्रव्य, [२][ विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ ], भांग किंवा मोहाची फुले याच्या साठ्याचा जो मालक असेल व जो त्यासाठी कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करीत असेल त्याला आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी अशा साठ्याची विल्हेवाट लावण्याविषयी निदेश देता येईल ; आणि मालक अशा निदेशाचे पालन करील.]

(२) अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकानंतर, मादक द्रव्य, [२][ विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ ], भांग किंवा मोहाची फुले यांचा विल्हेवाट न लावता शिल्लक राहिलेला कोणताही साठा, तो ज्यात असेल त्या पात्रांसह किंवा संवेष्टनासह, [१][ आयुक्ताच्या ], आदेशावरून [५][ राज्य शासनाकडे ] जमा करता येईल. कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र रद्द केल्यानंतर किंवा त्याची मुदत संपल्यानंतर [१][ आयुक्तास ] असाही निदेश देता येईल की, लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीपाशी कोणतेही मादक द्रव्य, [२][ विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ ], भांग किंवा मोहाची

---

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२ कलम ३ अनुसूची अन्वये "संचालकास", "संचालकाच्या", "संचालकाचा" या मजकुराऐवजी अनुक्रमे "आयुक्तास", "आयुक्ताच्या", "आयुक्तास" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ४१ (अ) अन्वये " मादक द्रव्य " या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २६ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २६ (१) अन्वये पोट-कलम (१-क) समाविष्ट करण्यात आले.

[५] विधि अनुकूल आदेश, १९५० अन्वये " बादशाहाकडे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

फुले यांचा शिल्लक राहिलेला कोणताही साठा, तो ज्यात असेल त्या पात्रासह किंवा संवेष्टनासह [१][ राज्य शासनाकडे ] जमा करण्यात यावा.

(३) पोट-कलम (२) अन्वये सरकारजमा केलेल्या वस्तू विकण्यात आल्या तर, [२][ आयुक्तास ] योग्य वाटल्यास, अशा वस्तू विकून आलेली सबंध रक्कम किंवा तिचा कोणताही भाग त्याच्या मालकास देण्यात यावा असा आदेश देता येईल.

[३][ (४) पोट-कलमे (१), (१-क), (२) किंवा (३) अन्वयेचा कोणताही निदेश किंवा आदेश हा, अशा निदेशामुळे किंवा आदेशामुळे ज्या व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल अशा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली असल्याशिवाय आणि [२][ आयुक्ताने ] दिलेल्या निदेशाबद्दलच्या किंवा केलेल्या आदेशाबद्दलच्या कारणांची लेखी नोंद केलेली असल्याशिवाय, देता येणार नाही. ]

---

## [४][ प्रकरण चार-क

## [५][ कलम २४-क मध्ये नमूद केलेल्या पदार्थांचा ] मादक दारू म्हणून उपयोग करण्यास प्रतिबंध करण्याकरिता त्यावर नियंत्रण ठेवणे व त्याचे विनियमन करणे.

कलम २४-क मध्ये नमूद केलेल्या पदार्थांच्या उत्पादनावर नियंत्रण.

[६][ **५९-कक.** कलम २४-**क** मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही पदार्थाचे लायसन असल्याशिवाय उत्पादन, निर्यात किंवा आयात करता येणार नाही ; असे लायसन, या बाबतींत केलेल्या कोणत्याही नियमाच्या तरतुदींना अधीन राहून राज्य शासन लेखी आदेशाद्वारे याबाबतीत प्राधिकृत करील त्या अधिकाऱ्याकडून मंजूर करण्यात येईल :

परंतु, विहित करण्यात येईल अशा प्रमाणाच्या मर्यादेपर्यंत पदार्थाची आयात किंवा निर्यात करण्यासाठी अशा कोणत्याही लायसनची आवश्यकता असणार नाही.]

[७][कलम २४-क मध्ये नमूद केलेले पदार्थ तयार करणे.]

**५९-क.** (१) कलम २४-क मध्ये नमूद केलेला कोणताही पदार्थ तयार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, तो तयार करण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदीन्वये खरेदी केलेली किंवा जवळ बाळगलेली कोणत्याही प्रकारची दारू विकता येणार नाही, वापरता येणार नाही किंवा तिची विल्हेवाट लावता येणार नाही ; परंतु अशा व्यक्तीस, अशी दारू तिच्यापासून जे पदार्थ तयार करण्याचा तिला अधिकार मिळाला असेल त्या पदार्थाचे घटकद्रव्य म्हणून विकता येईल, वापरता येईल किंवा तिची विल्हेवाट लावता येईल. कलम २४-**क**, मध्ये नमूद केलेले कोणतेही पदार्थ तयार करण्याच्या कामी, त्यात असलेली मूलद्रव्ये काढण्याकरिता किंवा ती विरघळविण्याकरिता व तो पदार्थ टिकविण्याकरिता आवश्यक असेल त्या परिमाणापेक्षा अधिक परिमाणात मद्यार्क वापरता येणार नाही :

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " बादशाहाकडे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३, अनुसूची अन्वये " संचालकास ", " संचालकाच्या ", " संचालकाने " या मजकुराऐवजी अनुक्रमे " आयुक्तास ", " आयुक्ताच्या ", " आयुक्ताने " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ४१ (ब) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २७ अन्वये प्रकरण ४-क दाखल करण्यात आले.

[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६, कलम ७ अन्वये " वैद्यकीय आणि प्रसाधनीय सिद्धपदार्थ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ४२ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[७] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६, याचे कलम ८ (२) अन्वये ही समास टीप दाखल करण्यात आली.

परंतु, कलम २४-क मध्ये नमूद केलेला कोणताही पदार्थ तयार करताना आंबवण्याच्या क्रियेने मद्यार्क निर्माण होत असेल त्या बाबतीत, अशा मद्यार्काचे प्रमाण [१][त्याच्या आकारमानाच्या] शेकडा १२ टक्क्यांहून अधिक असणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती,—

(क) [२][ कलम २४-**क** मध्ये नमूद केलेला कोणताही पदार्थ ] मादक पेय म्हणून वापरण्यासाठी जाणूनबुजून विकणार नाही, अथवा

(ख) असा कोणताही पदार्थ अशा कारणासाठी वापरण्याचा, खरेदी करणाऱ्याचा इरादा आहे असे ज्या परिस्थितीवरून त्यास वाजवी रीतीने अनुमान करता येईल त्या परिस्थितीत तो त्यास विकणार नाही.

[३][कलम २४-क मध्ये नमूद केलेल्या पदार्थांचे पृथक्करण.]

**५९-ख.** [४][ (१) ] कलम २४-**क** मध्ये नमूद केलेला कोणताही पदार्थ कलम ५९-**क** मध्ये दिलेल्या वर्णनाशी जुळता नाही व त्यात दिलेल्या मर्यादांबरहुकूम तयार केलेला नाही असे [५][आयुक्तास] सकारण वाटेल तेव्हा, तो अशा पदार्थाचे पृथक्करण करून घेईल ; आणि असे पृथक्करण केल्यानंतर,असा पदार्थ अशा रीतीने वर सांगितल्याप्रमाणे दिलेल्या वर्णनाशी जुळता नाही व त्यात दिलेल्या मर्यादांबरहुकूम तयार केलेला नाही असे [५][आयुक्तास] आढळून आले तर, त्याने असा पदार्थ तयार करणाऱ्या व्यक्तीस किंवा ज्याने तो आयात केल्याचे [६][किंवा प्राप्त केल्याचे] त्यास माहीत असेल किंवा तसे केल्याचे त्यास वाटत असेल अशा व्यक्तीस उक्त पदार्थाच्या बाबतीत ती मादक दारू आहे असे समजून उपाययोजना का करण्यात येऊ नये याविषयी कारण दाखविण्यासाठी कमीतकमी १५ दिवसांची नोटीस देईल. अशी नोटीस [५][आयुक्त] ठरवील त्याप्रमाणे जातीने देऊन किंवा नोंदणीकृत डाकेने पाठवून बजावण्यात येईल. तसेच, अशा नोटीशीत, अशा व्यक्तीस ज्यावेळी, ज्या ठिकाणी व ज्या अधिकाऱ्यासमोर हजर राहण्याविषयी फर्माविण्यात येईल ती वेळ, ते ठिकाण व त्या अधिकाऱ्याचे नाव विनिर्दिष्ट करण्यात येईल.

[७][ (१-**क**) जर अशा व्यक्तीने, उक्तपदार्थ कलम ५९-**क** मध्ये दिलेल्या वर्णनाशी जुळता आहे व त्यात दिलेल्या मर्यादांबरहुकूम तयार केलेला आहे असे [५][आयुक्ताची] खात्री होईल अशा रीतीने दाखविण्यात कसूर केली तर, [५][आयुक्तास,] राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, अशा पदार्थाच्या बाबतीत ती मादक दारू आहे असे समजून विल्हेवाट लावण्यात यावी आणि त्यानंतर दारूसंबंधी या अधिनियमाच्या तरतुदी उक्त पदार्थास लागू होतील. ]

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ४३ अन्वये " शेकडा बारा टक्क्याहून " या मजकुरापूर्वी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६, कलम ८ (१) अन्वये " कलम २४-अ ज्यास लागू असेल असा पदार्थ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ९ अन्वये ही समास टीप दाखल करण्यात आली.

[४] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम ५ अन्वये कलम ५९-ख यास त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[५] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ अनुसूची अन्वये " संचालक " या मजकुराऐवजी हा मजकूर (त्याच्या व्याकरणिक रूप भेदांसह ) दाखल करण्यात आला.

[६] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ४४ (१) अन्वये " आयात केल्याचे " या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ४४ (२) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[१][ (२) पोट-कलम (१) अन्वये [२][आयुक्त] कलम २४-**क** मध्ये नमूद केलेल्या पदार्थाचे पृथक्करण करवील [३][किंवा उक्त पोट-कलमान्वये नोटीस देईल] तेव्हा, त्याने असा पदार्थ तयार करणाऱ्या व्यक्तीस किंवा जिने तो आयात केल्याचे [४][किंवा प्राप्त केल्याचे] त्यास माहीत असेल किंवा तसे केल्याचे त्यास वाटत असेल अशा व्यक्तीस, आदेश देऊन, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत किंवा अशा पृथक्करणाचा निकाल माहीत होईपर्यंत व [५][त्यास तो [२][आयुक्ताकडून] लेखी कळविण्यात येईपर्यंत, यापैकी जी मुदत कमी असेल त्या मुदतीत, किंवा, यथास्थिति, अशी तयार करणारी किंवा इतर व्यक्ती, उक्त पदार्थ, कलम ५९-**क** मध्ये दिलेल्या वर्णनाशी जुळता आहे किंवा त्यात दिलेल्या मर्यादांबरहुकूम तयार केला आहे अशी [२][आयुक्ताची] खात्री करून देईपर्यंत] असा पदार्थ त्याने विकू नये, वाटू नये किंवा अन्य प्रकारे त्याची व्यवस्था लावू नये म्हणून किंवा [२][आयुक्ताच्या] आगाऊ परवानगीवाचून कोणत्याही ठिकाणाहून तो काढून नेऊ नये म्हणून फर्मावित येईल ; आणि त्यानंतर असा पदार्थ तयार करणारा किंवा अशा व्यक्ती उक्त मुदतीत अशा आदेशाचे पालन करील. ]

---

## [६][ प्रकरण चार-ख.

### विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थांचा मादक दारू म्हणून उपयोग करण्यास प्रतिबंध करण्यासाठी विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थांवर नियंत्रण ठेवणे आणि त्याचे विनियमन करणे.

विहित केलेल्या मर्यादेहून अधिक प्रमाणात विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ जवळ ठेवण्यास प्रतिबंध आणि विहित केलेल्या मर्यादेहून अधिक प्रमाणात ते ठेवल्यास त्याचे विनियमन.

**५९-ग.** (१) कोणतीही व्यक्ती, त्या बाबतीत राज्य शासनाने अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने मंजूर केलेल्या परवान्यान्वये असेल त्याव्यतिरिक्त, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील, त्यापेक्षा अधिक प्रमाणात, विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ आपल्या ताब्यात ठेवणार नाही.

---

[१] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम ५ अन्वये पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३, अनुसूची अन्वये " संचालक " या मजकुराऐवजी हा मजकूर (त्याच्या व्याकरणिक रुपभेदांसह) दाखल करण्यात आला.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ४४ (३) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४४ (१) अन्वये " आयात केल्याचे " या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ४४ (३) अन्वये " त्यास ती कळविण्यात येईपर्यंत, यापैकी जी मुदत कमी असेल त्या मुदतीत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ४५ अन्वये नवीन प्रकरण ४-ख समाविष्ट करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) अन्वये विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ जवळ बाळगण्याचे प्रमाण विनिर्दिष्ट करताना खऱ्याखुऱ्या, घरगुती आणि इतर प्रयोजनांकरिता असा सिद्धपदार्थ निर्वेधपणे जवळ बाळगण्याची गरज लक्षात घेण्यात येईल, आणि—

(एक) निरनिराळ्या स्थानिक क्षेत्रासाठी,

(दोन) व्यक्तींच्या निरनिराळ्या वर्गांसाठी, आणि

(तीन) निरनिराळ्या प्रसंगांसाठी,

निरनिराळ्या मर्यादा ठरविण्यात येतील.

**५९-घ.** (१) कोणतीही व्यक्ती,— विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ तयार करणे वगैरेवर विनियमन.

(क) लायसनअन्वयेच्या अधिकारान्वये आणि लायसनातील अटी आणि शर्ती यानुसार असेल त्याव्यतिरिक्त, कोणताही विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ तयार करणार नाही, त्याची विक्री करणार नाही किंवा विक्रीसाठी तो बाटलीत भरणार नाही,

(ख) एखाद्या पासावरून दिलेल्या अधिकारान्वये आणि पासाच्या अटी आणि शर्तीनुसार असेल त्या व्यतिरिक्त कलम ५९-ग, पोट-कलम (१) अन्वये जवळ बाळगण्यासाठी जी मर्यादा विनिर्दिष्ट करण्यात आली असेल त्याहून अधिक प्रमाणात कोणत्याही विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थाची आयात, निर्यात किंवा त्याचे परिवहन करणार नाही,

(ग) कोणताही विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ पिणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असलेले लायसन किंवा पास हा, राज्य शासनाने त्याबाबतीत लेखी अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून मंजूर करण्यात येईल. ]

---

## प्रकरण पाच

## मोहाची फुले

**६०.** (१) जिल्हाधिकाऱ्याने किंवा याबाबत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेल्या पासावाचून कोणतीही व्यक्ती मोहाच्या फुलांची निर्यात करणार नाही किंवा त्यांची आयात करणार नाही. मोहाच्या फुलांच्या निर्यातीस किंवा आयातीस मनाई.

(२) [१][ जिल्हाधिकाऱ्याने किंवा याबाबत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने ] दिलेले लायसन, परवाना किंवा पास यावाचून आणि असे लायसन, परवाना किंवा पास यातील शर्ती पाळल्यावाचून [२][कोणत्याही व्यक्तीने किंवा कुटुंबप्रमुखाने, त्याच्या स्वतःच्या वतीने किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तींच्या वतीने एकंदर ] विहित करण्यात येईल इतक्या वजनापेक्षा अधिक मोहाची फुले गोळा करणार नाही किंवा त्यांचे परिवहन करणार नाही किंवा ती विकणार नाही किंवा विकत घेणार नाही किंवा ती आपल्याजवळ बाळगणार नाही : मोहाच्या फुलांचे परिवहन, विक्री, वगैरे यांवर नियंत्रण व त्यांचे विनियमन.

परंतु, [३][ राज्य ] शासन, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जाहीर करील अशा क्षेत्रात व अशा मुदतीत ( जिला यात यापुढे माफीची मुदत असे म्हटले आहे ) त्यावर्षी [४][ व त्या क्षेत्रात ] आलेली

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २८ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २८ (१) अन्वये " कोणत्याही इसमाने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूल आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २८ (३) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

मोहाची फुले कोणत्याही परिमाणात गोळा करण्यासाठी, त्याचे परिवहन करण्यासाठी, ती विकण्यासाठी, खरेदी करण्यासाठी किंवा जवळ बाळगण्यासाठी कोणत्याही लायसनची, परवान्याची किंवा पासाची आवश्यकता असणार नाही :

परंतु आणखी असे की, [१][ राज्य ] शासनाने राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, अन्यथा निदेश दिलेला नसल्यास, ज्या क्षेत्राच्या बाबतीत माफीची मुदत नाही किंवा परिवहनाचे वेळी ज्या क्षेत्राच्या बाबतीत माफीची मुदत संपली असेल त्या क्षेत्रातून, मोहाच्या फुलांचे कोणत्याही परिमाणात रेल्वेने परिवहन करण्यासाठी कोणत्याही लायसनची, परवान्याची किंवा पासाची आवश्यकता असणार नाही, परंतु —

(एक) अशी फुले त्यांची ने-आण करताना खाली उतरवून घेवू नये ; आणि

(दोन) ज्या ठिकाणाहून व ज्या ठिकाणाकडे अशा फुलांचे परिवहन करण्यात येत असेल त्या ठिकाणी अशी फुले पाठविण्यात येतील किंवा यथास्थिती, पोचतील त्यावेळी माफीची मुदत चालू असेल.

[२] * * * * *

---

## प्रकरण सहा

### काकवीवर नियंत्रण व तिचे विनियमन

काकवीची निर्यात, वगैरे यावर नियंत्रण.

**६१.** (१) पोट-कलमे (२) व (३) अन्वये अन्यथा जी तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त कोणतीही व्यक्ती कोणत्याही परिमाणात काकवी निर्यात करणार नाही, आयात करणार नाही, तिचे परिवहन करणार नाही, ती विकणार नाही किंवा आपल्याजवळ बाळगणार नाही.

(२) [१][ राज्य ] शासनास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, काकवी आयात करण्यांसाठी, निर्यात करण्यासाठी, विकण्यासाठी किंवा जवळ बाळगण्यासाठी लायसन देण्याकरिता कोणत्याही जिल्हाधिकाऱ्यास [३][ किंवा कोणत्याही इतर अधिकाऱ्यास ] प्राधिकृत करता येईल.

(३) तसेच [१][ राज्य ] शासनास, काकवीचे परिवहन करण्यासाठी परवाने देण्याकरिता कोणत्याही जिल्हाधिकाऱ्यास किंवा कोणत्याही इतर अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल.

कलम ५३ ते ५९ यांच्या तरतुदी कलम ६१ अन्वये दिलेल्या लायसनच्या बाबतीत लागू होणे.

**६२.** कलमे ५३ ते ५९ [४][ (दोन्ही धरून) ] च्या तरतुदी या, शक्य तेथवर कलम ६१ अन्वये दिलेली लायसने किंवा परवाने यांच्या बाबतीत लागू होतील.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ४६ अन्वये हे स्पष्टीकरण वगळण्यात आले.

[३] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २९ (१) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ४७ अन्वये " ५९ " या मजकुरानंतर हा मजकूर दाखल करण्यात आला.

१९५६ चा मुंबई ३८. [1][६३. या अधिनियमाच्या काकवीसंबंधी असलेल्या तरतुदी या मुंबईचा काकवीवरील नियंत्रणाबाबत अधिनियम, १९५६ याच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा दिलेल्या आदेशाच्या तरतुदींच्या जोडीने असतील व त्याच्यामुळे उक्त अधिनियमाच्या तरतुदींचे न्यूनीकरण होणार नाही.]

काकवी बाबतच्या या अधिनियमाच्या तरतुदी या सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८ याच्या तरतुदीच्या जोडीने असतील व त्यामुळे उक्त अधिनियमाच्या तरतुदीचे न्यूनीकरण होणार नाही.

६४. [काकवीचा साठा धारण करणाऱ्या व्यक्तीस तो कोणत्याही अधिकाऱ्यास, व्यक्तीस किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तीस ठराविक किंमतीत विकण्यासाठी निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ३० अन्वये वगळण्यात आले.

---

## प्रकरण सात

### अपराध व शास्ती.

मादक द्रव्ये किंवा भांग यांची बेकायदेशीर-रीत्या आयात करणे, इत्यादीबद्दल शास्ती.

६५. जी कोणी व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा विनियमाचे तदन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही लायसनचे, पासाचे परवान्याचे किंवा प्राधिकारपत्राचे उल्लंघन करून,—

(क) कोणतेही मादक द्रव्य [2][(अफू व्यतिरिक्त)] किंवा भांग आयात करील किंवा निर्यात करील,

(ख) कोणतेही मादक द्रव्य [2][(अफू व्यतिरिक्त)] तयार करील,

(ग) कोणतीही दारूची भट्टी किंवा दारू गाळण्याचा कारखाना बांधील किंवा चालवील,

(घ) दारू बाटलीत भरील,

(ङ) कोणतेही मादक द्रव्य [2][(अफू व्यतिरिक्त)] किंवा भांग विकील किंवा विकत घेईल, अथवा

(च) [3][(अफू व्यतिरिक्त)] कोणतेही मादक द्रव्य तयार करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे साहित्य, दारू गाळण्याची भट्टी, भांडी, साधने किंवा उपकरणे वापरील, ठेवील किंवा आपल्याजवळ बाळगील,

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ४८ अन्वये हे कलम जादा दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४९ (अ) अन्वये खंड (क), (ख) व (ङ) मधील " मादक द्रव्य " या मजकुरानंतर " (अफू व्यतिरिक्त) " हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५९ (ब) अन्वये " (ताडी व्यतिरिक्त इतर)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(छ) भांगेची लागवड करील किंवा तिचा साठा करील,]

[२][त्यास, सिद्धापराध ठरविण्यात आल्यावर, अशा प्रत्येक अपराधाबद्दल तीन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा आणि तसेच द्रव्य दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात तद्विरुद्ध नमूद करावयाच्या विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी,—

(एक) पहिल्या अपराधाबद्दल अशी कैदेची शिक्षा सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

(दोन) दुसऱ्या अपराधाबद्दल, अशी कैदेची शिक्षा नऊ महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड एक हज़ार रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

(तीन) तिसऱ्या किंवा त्या नंतरच्या अपराधाबद्दल, अशी कैदेची शिक्षा एक वर्षापेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही.]

भांगेची बेकायदेशीररीत्या लागवड करणे व ती गोळा करणे आणि इतर गोष्टींबद्दल शास्ती.

६६. [३][(१)] जी कोणी व्यक्ती या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा विनियमाचे किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही लायसनचे, परवान्याचे, पासाचे किंवा प्राधिकारपत्राचे उल्लंघन करून—

[४] * * * * *

(ख) कोणतेही मादक द्रव्य [५][(अफू व्यतिरिक्त)] किंवा भांग सेवन करील, वापरील, जवळ बाळगील किंवा तिचे परिवहन करील,

(ग) कोणतेही ताडी देणारे झाड़ छेदील किंवा छेदण्यास परवानगी देईल,

(घ) कोणत्याही झाडापासून ताडी काढील किंवा ताडी काढण्यास परवानगी देईल, त्यास सिद्धापराध ठरविण्यात आले असता,—

(एक) पहिल्या अपराधाबद्दल सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात नमूद करावयाच्या तद्विरुद्ध विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, अशी कारावासाची शिक्षा तीन महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही;

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ४९ (क) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४९ (ड) अन्वये "त्यास दोषी ठरविण्यात आले असता," या मजकुरापासून ते कलमाअखेरीपर्यंतच्या मजकुराऐवजी हा मज़कूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ९ अन्वये कलम ६६ यास, त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[४] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ५० (अ) (१) अन्वये खंड (क) वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ५० (अ) (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(दोन) दुसऱ्या अपराधाबद्दल दोन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयांच्या निकालपत्रात नमूद करावयाच्या तद्विरुद्ध विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, अशी कारावासाची शिक्षा सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही;

(तीन) तिसऱ्या किंवा त्या नंतरच्या अपराधाबद्दल दोन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयांच्या निकालपत्रात नमूद करावयांच्या तद्विरुद्ध विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, अशी कारावासाची शिक्षा नऊ महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

[१][(२) पोट-कलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून मादक द्रव्य सेवन केल्यामुळे पोट-कलम (१) चा खंड (ख) खालील अपराधाबद्दल असलेल्या कोणत्याही न्यायचौकशीत, आरोपी व्यक्तीने दारूचे सेवन केले आहे असा आरोप करण्यात आला असेल आणि आरोपी व्यक्तीच्या रक्तातील मद्यार्काचे प्रमाण [२][आकारमानातील वजनाने ०.०५ टक्क्यांहून कमी नाही] असे सिद्ध करण्यात आले असेल तर, सेवन केलेली दारू औषधासाठी किंवा प्रसाधनासाठी तयार केलेला पदार्थ किंवा जंतुनाशक पदार्थ किंवा द्रावण किंवा मद्यार्क असलेला सुगंधी अर्क किंवा सरबत होते आणि अशा दारूचे सेवन या अधिनियमाचे किंवा त्याअन्वये केलेले कोणतेही नियम, विनियम किंवा आदेश यांचे उल्लंघन करून करण्यात आले नव्हते हे सिद्ध करण्याचा भार आरोपी व्यक्तीवर असेल आणि न्यायालय अशा पुराव्याच्या अभावी तद्विरुद्ध अनुमान काढील.

(३) पोट-कलम (२) याच्या तरतुदी––

(क) शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने चालविलेल्या किंवा त्यांच्या साहाय्याने चालविण्यात येणाऱ्या किंवा धर्मार्थ असलेल्या कोणत्याही रुग्णालयात, आरोग्य सुधारणा गृहात, शुश्रुषागृहात किंवा दवाखान्यात दाखल करून घेतलेल्या रोग्यांवर उपचार चालू असलेल्या मुदतीत त्यांना देण्यात येणाऱ्या मद्यार्काच्या बाबतीत, किंवा

(ख) विहित करण्यात येईल अशा इतर संस्थेत किंवा अशा परिस्थितीत अशा इतर व्यक्तींना, कोणतीही दारू घेण्यास लागू असणार नाही.]

अफूची बेकायदेशीर-रीत्या आयात करणे, वगैरे बद्दल शास्ती.

[३][**६६-क.** जी कोणी व्यक्ती या अधिनियमाच्या किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या, विनियमाच्या किंवा आदेशाच्या किंवा या अधिनियमान्वये किंवा तदन्वये मंजूर केलेल्या कोणत्याही लायसनच्या, पासाच्या, परवान्याच्या किंवा प्राधिकारपत्राच्या तरतुदींचे उल्लंघन करून, अफूची आयात, निर्यात, परिवहन करील, तिचे सेवन करील, उपयोग करील, ताब्यात ठेवील, तिची विक्री किंवा खरेदी करील त्यास सिद्धापराध ठरविण्यात आले असता अशा प्रत्येक अपराधाबद्दल तीन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा आणि तसेच द्रव्य दंडाची शिक्षासुद्धा होईल :

---

[१] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ९ अन्वये पोट-कलमे (२) आणि (३) जादा दाखल करण्यात आली.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ५० (ब) अन्वये " ०.०५ टक्क्याहून कमी नाही " या मजकुराऐवजी हा मजकूर, दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५१ अन्वये हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले.

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात नमूद करावयाच्या तद्विरुद्ध खास व पुरेशा कारणांच्या अभावी,---

(एक) पहिल्या अपराधाबद्दल, अशी कारावासाची शिक्षा सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही आणि असा द्रव्य दंड पाचशे रुपयांहून कमी असणार नाही;

(दोन) दुसऱ्या अपराधाबद्दल, अशी कारावासाची शिक्षा नऊ महिन्यांपेक्षा कमी असणार नाही आणि द्रव्य दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही;

(तीन) तिसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधाबद्दल, अशी कारावासाची शिक्षा एक वर्षापेक्षा कमी असणार नाही आणि असा द्रव्य दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही.]

विप्रकृत मद्यसारात फेरबदल करणे किंवा फेरबदल करण्याचा प्रयत्न करणे याबद्दल शास्ती.

६७. [१][(१)] जी कोणी व्यक्ती कलम २१ चा भंग करून कोणत्याही विप्रकृत मद्यसारात फेरबदल करील किंवा फेरबदल करण्याचा प्रयत्न करील किंवा ज्या कोणत्याही मद्यसाराबद्दल असा कोणताही फेरबदल केला आहे किंवा फेरबदल करण्याचा प्रयत्न केला आहे असे त्यास माहीत असेल किंवा असे वाटण्यास त्यास कारण असेल असे मद्यसार आपल्याजवळ बाळगील, तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात नमूद करावयाच्या तद्विरुद्ध विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी अशी कारावासाची शिक्षा तीन महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

[२][(२) या कलमान्वयेच्या खटल्यामध्ये तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येत नाही तोपर्यंत, कोणत्याही विप्रकृत मद्यसारात केलेला फेरबदल किंवा फेरबदल करण्याचा प्रयत्न, असे मद्यसार मादक दारू म्हणून मनुष्यास उपयोगात आणता यावे या हेतूने केलेले आहे असे गृहीत धरण्यात येईल.]

विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थात फेरबदल करणे किंवा फेरबदल करण्याचा प्रयत्न करणे याबद्दल शास्ती.

[३][**६७-१क.** [४][(१)] जी कोणी व्यक्ती कलम २१-क चा भंग करून कोणत्याही विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थात फेरबदल करील किंवा फेरबदल करण्याचा प्रयत्न करील किंवा ज्या कोणत्याही अशा सिद्धपदार्थाबद्दल असा कोणताही फेरबदल केला आहे किंवा फेरबदल करण्याचा प्रयत्न केला आहे असे त्यास माहीत असेल किंवा असे वाटण्यास त्यास कारण असेल असा सिद्धपदार्थ जवळ बाळगील, तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात नमूद करावयाच्या तद्विरुद्ध विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, अशी कारावासाची शिक्षा तीन महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ५२ अन्वये कलम ६७ यास, उक्त कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या त्याच कलमान्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६, कलम १० अन्वये हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ५३ अन्वये कलम ६७-१क यास त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[१][ (२) या अधिनियमान्वयेच्या सर्व खटल्यात, तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येणार नाही तोपर्यंत, कोणत्याही विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थात केलेला फेरबदल किंवा फेरबदल करण्याचा प्रयत्न, असा सिद्धपदार्थ मादक दारू म्हणून मनुष्यास उपयोगात आणता यावा या हेतूनेच केलेला आहे असे गृहीत धरण्यात येईल. ]

[२][ **६७-१ख.** जो कोणी,–

औषधोपचाराच्या औषधपत्रासंबंधी असलेल्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

(क) नोंदलेला वैद्यक व्यवसायी नसताना औषधोपचाराच्या औषधपत्रात मादक दारू उपचार म्हणून सुचवील, किंवा

(ख) नोंदलेला वैद्यक व्यवसायी असून–

(एक) कलम २२-क, पोट-कलम (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करून, औषधपत्रात मादक दारू उपचार म्हणून सुचवील, किंवा

(दोन) औषधोपचाराच्या औषधपत्रात मादक दारूबद्दल उक्त कलमान्वये आवश्यक असेल असा तपशील नमूद करण्यात, कोणत्याही वाजवी कारणाशिवाय, कसूर करील, किंवा

(तीन) असे औषधोपचाराचे औषधपत्र, किंवा त्याची एक प्रत, उक्त कलमान्वये ज्या मुदतीपर्यंत राखून ठेवणे आवश्यक असेल त्या मुदतींत, राखून ठेवण्यात कसूर करील,

त्यास सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील. ]

[४][ **६७-क.** (१) जी कोणी व्यक्ती [५][कलम ५९-कक किंवा यथास्थिति कलम ५९-क च्या तरतुदींचे] उल्लंघन करून–

कलम ५९-क च्या तरतुदीचे उल्लंघन करून कलम [३][२४-क मध्ये नमूद केलेले पदार्थ] तयार करण्याबद्दल शास्ती.

[६][ (१-क) कलम २४-क मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही वस्तू तयार करील, त्यांची आयात किंवा निर्यात करील, अथवा]

(क) [७][कलम २४-क मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही पदार्थाचा] घटकद्रव्य म्हणून असेल त्या व्यतिरिक्त इतर रीतीने कोणत्याही प्रकारची दारू विकील, वापरील किंवा तिची विल्हेवाट लावील, अथवा

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ५३ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५४ अन्वये हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६, कलम ११ (३) अन्वये "वैद्यकीय किंवा प्रसाधनीय सिद्धपदार्थ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ३१ अन्वये कलमे ६७-क आणि ६७-ख समाविष्ट करण्यात आली.

[५] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ५५ (अ) (१) अन्वये "कलम ५९-अ च्या उपबंधांचे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ५५ (अ) (२) अन्वये खंड (१-क) समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६, कलम ११ (१) (अ) अन्वये "वैद्यकीय किंवा प्रसाधनीय सिद्धपदार्थ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ख) [1][कलम २४-**क** मध्ये उल्लेख केलेला कोणताही पदार्थ तयार करण्याच्या कामी] त्यात असलेली मूलद्रव्ये काढण्याकरिता किंवा ती विरघळण्याकरिता व असा [2][पदार्थ] टिकविण्याकरिता आवश्यक असेल त्या परिमाणापेक्षा अधिक परिमाणात मद्यार्क वापरील, अथवा

(ग) मादक पेय म्हणून वापरण्यासाठी [3][असा कोणताही पदार्थ] जाणूनबुजून विकील किंवा असा कोणताही पदार्थ अशा कारणासाठी वापरण्याचा, खरेदी करण्याचा इरादा आहे असे ज्या परिस्थितीवरून त्यास वाजवी रीतीने अनुमान करता येईल त्या परिस्थितीत तो विकील,

त्यास, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

(२) या कलमान्वये ज्यास सिद्धापराध ठरविण्यात आले आहे किंवा कलम १०४ अन्वये [4][तडजोड म्हणून] अशा अपराधाबद्दल ज्याने कोणतीही रक्कम भरली आहे अशा कोणत्याही व्यक्तीस, अशा अपराधसिद्धीच्या किंवा रकमा भरल्याच्या दिनांकापासून एक वर्ष मुदतींपर्यंत [5][कलम २४-**क** मध्ये नमूद केलेला कोणताही पदार्थ] तयार करण्याचा, आयात करण्याचा किंवा विकण्याचा हक्क असणार नाही ; आणि जी कोणतीही व्यक्ती या पोट-कलमाचा भंग करून [6][असा कोणताही पदार्थ] आयात करील, तयार करील किंवा विकील, ती, कलम ६५ अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल ज्या शिक्षेची तरतूद केली आहे त्याच शिक्षेस पात्र होईल.

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ५५ (अ) (३) अन्वये "जो कोणताही पदार्थ कैफ आणणारा दारू म्हणून वापरता येईल असा कोणताही पदार्थ तयार करण्याच्या कामी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६, कलमं ११ (१) (ब) अन्वये "सिद्धपदार्थ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ११ (१) (क) अन्वये "कलम २४-अ लागू असलेला कोणताही पदार्थ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ५५ (ब) अन्वये "कलम १०४ अन्वये" या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६, कलम ११ (२) (अ) अन्वये "कलम २४-अ लागू असलेला सिद्धपदार्थ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ११ (२) (ब) अन्वये "असा सिद्धपदार्थ" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

**६७-ख.** [१][(१)] कलम २४-**क** मध्ये नमूद केलेल्या पदार्थांपैकी कोणताही पदार्थ तयार करणाऱ्या व्यक्तीने जर असा पदार्थ कलम ५९-**क** मध्ये दिलेल्या वर्णनाशी जुळता आहे व त्यात दिलेल्या मर्यादाबरहुकूम तयार केला आहे अशी [२][आयुक्ताची] खात्री होईल अशा रीतीने दाखविण्यात कसूर केली तर, असा पदार्थ तयार करण्याकरिता दारू किंवा मद्यार्क खरेदी करण्यासाठी, वापरण्यासाठी किंवा जवळ बाळगण्यासाठी असलेले त्याचे लायसन रद्द करण्यात येईल. [३][पोट-कलम (१) खाली [२][आयुक्ताची] खात्री करून देण्यात किंवा कलम ५९-ख पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या आदेशाचे पालन करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.]

[४][(२) कलम ५९-**ख**, पोट-कलम (२) अन्वये [२][आयुक्ताने] दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन करण्यात जी कोणतीही व्यक्ती कसूर करील, तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.]

[५][**६७-ग.** जी कोणी व्यक्ती– कलमे ५९-ग व ५९-घ यांच्या तरतुदींचे उल्लंघन करून विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ जवळ बाळगणे, वगैरेबद्दल शास्ती.

(क) कलम ५९-**ग** याच्या तरतुदींचे उल्लंघन करून, परवान्यावाचून, त्या कलमान्वये विहित केलेल्या परिमाणापेक्षा अधिक प्रमाणात कोणताही विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ जवळ बाळगील, किंवा

(ख) कलम ५९-**घ** याच्या तरतुदींचे उल्लंघन करून, कोणताही विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ तयार करील, विकील, विक्रीसाठी बाटलीत भरील किंवा त्याची आयात, निर्यात किंवा परिवहन करील, किंवा

(ग) कोणताही विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ प्राशन करील,

तर तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता,–

(एक) पहिल्या अपराधाबद्दल सहा महिन्यापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात तद्विरुद्ध नमूद करण्यात येतील अशा विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, अशी कारावासाची शिक्षा तीन महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही ;

(दोन) दुसऱ्या अपराधाबद्दल दोन वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात तद्विरुद्ध नमूद करण्यात येतील अशा विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, अशी कारावासाची शिक्षा सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही ;

---

[१] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम ६ (१) अन्वये मूळ कलम ६७-ख यास उक्त कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३, अनुसूची अन्वये "संचालक" या मजकुराऐवजी हा मजकूर (त्याच्या व्याकरणिक रुपभेदांसह) दाखल करण्यात आला.

[३] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम ६ (२) अन्वये मूळ समास टीपेऐवजी ही समास टीप दाखल करण्यात आली.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ६ (१) अन्वये पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[५] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ५६ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(तीन) तिसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधांबद्दल, दोन वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात तद्विरुद्ध नमूद करण्यात येतील अशा विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, अशी कारावासाची शिक्षा नऊ महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही.]

दारूचा सार्वजनिक गुत्ता उघडणे, वगैरे याबद्दल शास्ती.

६८. जी कोणी व्यक्ती–

(क) कोणतीही जागा दारूचा सार्वजनिक गुत्ता म्हणून उघडील, ठेवील किंवा वापरील; अथवा

(ख) दारूचा सार्वजनिक गुत्ता म्हणून उघडण्यात, ठेवण्यात किंवा वापरण्यात आलेल्या कोणत्याही जागेवर देखरेख ठेवील, तिची व्यवस्था पाहील किंवा तिच्यावर नियंत्रण ठेवील किंवा तिच्यातील धंदा चालविण्यासाठी कोणत्याही रीतीने सहाय्य करील,

[१][तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, अशा प्रत्येक अपराधादाखल तीन वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा आणि तसेच द्रव्य दंडाची शिक्षादेखील होईल :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात तद्विरुद्ध नमूद करण्यात येतील अशा विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी,—

(एक) पहिल्या अपराधाबद्दल अशी कारावासाची शिक्षा सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही आणि अशी द्रव्य दंडाची रक्कम पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही ;

(दोन) दुसऱ्या अपराधाबद्दल, अशी कारावासाची शिक्षा नऊ महिन्यांपेक्षा कमी असणार नाही आणि अशी द्रव्य दंडाची रक्कम एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही ;

(तीन) तिसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधाबद्दल, अशी कारावासाची शिक्षा एक वर्षापेक्षा कमी असणार नाही आणि अशी द्रव्य दंडाची रक्कम एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही.]

मोहाच्या फुलांची बेकायदेशीर-रीत्या आयात करणे, वगैरे याबद्दल शास्ती.

६९. जी कोणी व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा विनियमाचे किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही लायसनचे, परवान्याचे, पासाचे उल्लंघन करून मोहाच्या फुलांची आयात करील, निर्यात करील, ती [२][गोळा करील,] त्यांचे परिवहन करील, ती विकील, [२][विकत घेईल] किंवा आपल्याजवळ बाळगील तिला सिद्धपराध ठरविण्यात आले असता,—

(एक) पहिल्या अपराधाबद्दल सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात तद्विरुद्ध नमूद करण्यात येतील अशा विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, अशी कारावासाची शिक्षा तीन महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड पांचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही ;

(दोन) दुसऱ्या अपराधाबद्दल दोन वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात तद्विरुद्ध नमूद करण्यात येतील अशी विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, अशी कारावासाची शिक्षा सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही ;

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ५७ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ३२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(तीन) तिसऱ्या व त्यानंतरच्या अपराधाबद्दल दोन वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात तद्विरुद्ध नमूद करण्यात येतील अशा विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, अशी कारावासाची शिक्षा नऊ महिन्यापेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही :

परंतु, आणखी असे की, झाडावर असणाऱ्या किंवा झाडावरून गळून पडून जमिनीवर गोळा न करता राहिलेल्या मोहाच्या फुलांच्या बाबतींत कोणत्याही व्यक्तीस शिक्षा करण्यात येणार नाही.

काकवीची बेकायदेशीररीत्या आयात करणे, वगैरे याबद्दल शास्ती.

७०. जी कोणी व्यक्ती या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा विनियमाचे किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही लायसन्सचे किंवा परवान्याचे उल्लंघन करून काकवीची निर्यात करील, आयात करील, तिचे परिवहन करील, ती विकील किंवा आपल्याजवळ बाळगील, तिला सिद्धपराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

७१. [ठराविक किंमतीपेक्षा अधिक किंमतीस काकवी विकण्याबद्दल शास्ती.] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ३३ अन्वये वगळण्यात आले.

मादक पदार्थ, वगैरे नेण्याबद्दल शास्ती.

[१][७२. जी कोणी व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा विनियमाचे किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा पासाचे उल्लंघन करून या अधिनियमान्वये स्थापन केलेली किंवा लायसन दिलेली कोणतीही दारूची भट्टी, वखार, गोदाम किंवा साठा करण्याची इतर जागा यातून, कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी काढून नेईल, तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.]

या अधिनियमाच्या तरतुदी, वगैरेचे उल्लंघन करून जाहिराती छापणे किंवा प्रसिद्ध करणे याबद्दल शास्ती.

७३. जी कोणी व्यक्ती या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा विनियमाचे किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करून—

(क) ज्याद्वारे कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग वापरण्याची [२]* * * विनंती करण्यात येत आहे किंवा असे द्रव्य किंवा भांग देऊ करण्यात येत आहे, अथवा

(ख) ज्याद्वारे कोणत्याही व्यक्तीस किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तीस किंवा सर्वसामान्य लोकांस या अधिनियमाखालील अपराध करण्यास किंवा तदन्वये केलेला कोणताही नियम किंवा विनियम किंवा तदन्वये दिलेला कोणताही आदेश याच्या तरतुदींचा भंग करण्यास किंवा तदन्वये दिलेले कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र याच्या कोणत्याही शर्तीचा भंग करण्यास किंवा त्या टाळण्यास हेतुपूर्वक उत्तेजन किंवा चिथावणी देण्यात येत आहे;

अशी कोणतीही जाहिरात किंवा इतर मजकूर, कोणत्याही वर्तमानपत्रात, वृत्तपत्रात, पुस्तकात, पत्रकात, पुस्तिकेत किंवा कोणत्याही इतर स्वतंत्र किंवा नियतकालिक प्रकाशनात छापील किंवा प्रसिद्ध करील किंवा अशी जाहिरात किंवा असा मजकूर अन्यथा प्रदर्शित करील किंवा वाटील तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ५८ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.
[२] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ३४ अन्वये "तारीफ करील" हा मजकूर वगळण्यात आला.

मादक द्रव्ये, वगैरे यासंबंधी जाहिराती असलेली वर्तमानपत्रे, वगैरे यांचा प्रसार करणे, वगैरे याबद्दल शास्ती.

**७४.** जी कोणी व्यक्ती, कलम २४, पोट-कलम (३) अन्वये काढलेल्या अधिसूचनेचे उल्लंघन करून—

(क) ज्याद्वारे कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग वापरण्याची [१][* * * ] विनंती करण्यात येत आहे किंवा असे द्रव्य किंवा भांग देऊ करण्यात येत आहे; [२][अथवा]

(ख) ज्याद्वारे कोणत्याही व्यक्तीस किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तीस किंवा सर्वसामान्य लोकांस या अधिनियमाखाली अपराध करण्यास किंवा तदन्वये केलेला कोणताही नियम किंवा विनियम किंवा तदन्वये दिलेला कोणताही आदेश याच्या तरतुदींचा भंग करण्यास तदन्वये दिलेले कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र यांच्या शर्तींचा भंग करण्यास किंवा त्या टाळण्यास हेतुपूर्वक उत्तेजन किंवा चिथावणी देण्यात येत आहे,

अशी कोणतीही जाहिरात किंवा इतर मजकूर असलेले [३][राज्याबाहेर] छापलेले व प्रसिद्ध केलेले कोणतेही वर्तमानपत्र, वृत्तपत्र, पुस्तक, पत्रक,पुस्तिका किंवा इतर प्रकाशन यांचा प्रसार करील, वाटील किंवा विकील, तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

[६]* * *काही कृत्ये करण्यास चिथावणी देणे किंवा उत्तेजन देणे याबद्दल शास्ती.

**७५.** जी कोणी व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा विनियमाचे किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करून—

(क) कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग वापरण्याची [४][* * *] विनंती करील किंवा असे द्रव्य किंवा भांग देऊ करील, अथवा

[५][* * * * * * * * * * * *]

(ग) कोणत्याही व्यक्तीस किंवा एखाद्या वर्गातील व्यक्तीस किंवा सर्वसामान्य लोकांस या अधिनियमाखालील कोणताही अपराध करण्यास किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचा किंवा विनियमाचा किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचा भंग करण्यास किंवा तदन्वये दिलेले कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र याच्या कोणत्याही शर्तींचा भंग करण्यास चिथावणी किंवा उत्तेजन देण्याच्या हेतूने कोणतेही कृत्य करील,

तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ३५ (१) अन्वये "तारीफ करील" हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन वरील अधिनियमाच्या कलम ३५ (२) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ कलम ३ अन्वये "दुसऱ्या राज्यांत घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्याबाहेर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ३६ (१) अन्वये "तारीफ करील" हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३६ (२) अन्वये यांत (ख) वगळण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३६ (३) अन्वये "या अधिनियमाचे उपबंध विफल करणारी" हा मजकूर वगळण्यात आला.

[१][७५-क. जी कोणी व्यक्ती कलम ४३ च्या तरतुदींचे उल्लंघन करून--- कलम ४३ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

(क) एखाद्या सार्वजनिक जागेत किंवा जेथे लोकांस प्रवेश मिळू शकतो अशा हॉटेलातील किंवा परिसंस्थेतील खोलीत दारू प्राशन करील ;

(ख) स्वतःपाशी असलेल्या परदेशी दारूपैकी कोणत्याही दारूचा उपयोग करण्याची अथवा तिचे सेवन करण्याची कोणत्याही इतर व्यक्तीस परवानगी देईल ;

(ग) कलमे ४०, ४१, ४६, ४६-क किंवा ४७ अन्वये परवाना धारण करीत नसतील अशा (त्याच्या कुटुंबातील व्यक्ती किंवा नोकर नसलेल्या) व्यक्ती जेथे हजर असतील अशा कोणत्याही समारंभात किंवा इतर प्रसंगी व्यक्तींच्या कोणत्याही जमावात दारू देईल,

तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, अशा प्रत्येक अपराधाबद्दल सहा महिन्यापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.]

७६. जी कोणी व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा विनियमाचे किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही लायसनच्या, परवान्याच्या किंवा पासाच्या शर्ती उल्लंघन करुन-- मापे, वगैरे ठेवणे यात हयगय केल्याबद्दल शास्ती.

(क) कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग मापण्यासाठी व वजन करण्यासाठी आपल्याजवळ वजने व मापे ठेवण्यात किंवा दारूची तीव्रता तपासण्यासाठी उपकरणे ठेवण्यात किंवा ती सुस्थितीत ठेवण्यात हयगय करील, अथवा

(ख) आपल्याजवळ असलेले कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग मापण्याचे, वजन करण्याचे किंवा तपासण्याचे [२][किंवा मापण्याची, वजन करण्याची किंवा तपासण्याची व्यवस्था करण्याचे] नाकारील, तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, अशा प्रत्येक अपराधाबद्दल दोनशे रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल.

७७. या अधिनियमान्वये दिलेले लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करणारी जी कोणतीही व्यक्ती किंवा अशा व्यक्तीच्या नोकरीत असलेली कोणतीही व्यक्ती किंवा तिच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने तिच्या वतीने काम करणारी कोणतीही व्यक्ती— लायसन-दाराने, वगैरे गैरवर्तन केल्याबद्दल शास्ती.

(क) आपल्याजवळ किंवा आपल्या नियंत्रणाखाली असलेले लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र दारूबंदी अधिकाऱ्याने किंवा योग्यरीत्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याने मागणी केली असता, ते हजर करण्यात कसूर करील तर, अथवा

(ख) या अधिनियमाअन्वये केलेला कोणताही नियम, विनियम किंवा तदन्वये दिलेला कोणताही आदेश याचे उल्लंघन करून कोणतेही कृत्य जाणूनबुजून करील किंवा करण्याचे टाळील तर, अथवा

[३][* * * * * * * * * * * *]

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ५९ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६० अन्वये हा मजकूर जादा दाखल करणयात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ६१ (१) अन्वये खंड (ग) वगळण्यात आला.

तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, अशा प्रत्येक अपराधाबद्दल [1][सहा] महिन्यापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा [2][पाचशे] रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

लायसन दिलेल्या विक्रेत्याने किंवा माल तयार करणाऱ्या व्यक्तीने गैरवर्तन केल्याबद्दल शास्ती.

७८. या अधिनियमान्वये कोणतेही मादक द्रव्य विकण्यासाठी किंवा तयार करण्यासाठी लायसन धारण करणारी जी कोणतीही व्यक्ती किंवा अशा व्यक्तीच्या नोकरीत असलेली कोणतीही व्यक्ती किंवा तिच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने तिच्या वतीने काम करणारी कोणतीही व्यक्ती—

(क) अशा मादक द्रव्यात, ज्यामुळे तिचा प्रत्यक्ष किंवा बाह्य मादक गुण किंवा तीव्रता यात वाढ होईल असे कोणतेही उपद्रवकारक औषधिद्रव्य किंवा कोणतेही विजातीय घटकद्रव्य मिसळील किंवा मिसळण्याची परवानगी देईल अथवा या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये प्रतिषिद्ध असा कोणताही पदार्थ त्यात मिसळील किंवा मिसळण्याची परवानगी देईल किंवा लायसनमध्ये विहित केलेल्या तीव्रतेइतकी दारूची तीव्रता कमी करण्याच्या कारणाव्यतिरिक्त इतर कारणासाठी त्यात पाणी मिसळील किंवा मिसळण्याची परवानगी देईल अथवा पातळ करणारा किंवा रंग आणणारा कोणताही पदार्थ किंवा असे मादक द्रव्य ज्यामुळे दर्जात कमी ठरेल असे कोणतेही घटकद्रव्य–मग असे घटकद्रव्य वर सांगितल्याप्रमाणे प्रतिषिद्ध असो किंवा नसो– मिसळील किंवा मिसळण्याची परवानगी देईल व जेव्हा असे अपमिश्रण भारतीय दंड संहिता, कलम २७२ अन्वये अपमिश्रणाबाबत अपराध होत नसेल तेव्हा, अथवा १८६० चा ४५.

(ख) जी दारू देशी असल्याचे त्यास माहीत आहे किंवा ती तशी आहे असे वाटण्यांस त्यास कारण आहे अशी दारू परदेशी दारू म्हणून विकील किंवा विक्रीसाठी ठेवील किंवा मांडील, अथवा

(ग) कोणत्याही बाटलीचे बूच किंवा देशी दारू असलेली कोणतीही बाटली, पेटी, संवेष्टन किंवा इतर पात्र यावर त्या बाटलीत, पेटीत, संवेष्टनात किंवा इतर पात्रात परदेशी दारू आहे असे वाटावे या इराद्याने निशाणी करील अथवा देशी दारू असलेली कोणतीही बाटली, पेटी, संवेष्टन किंवा इतर पात्र, त्यावर किंवा त्याच्या बुचावर असलेल्या कोणत्याही निशाणीसह, अशा इराद्याने वापरील व जेव्हा असे कृत्य भारतीय दंड संहिता, कलम ४८२ अन्वये कोणत्याही व्यक्तीस फसविण्याच्या इराद्याने किंवा तिचे नुकसान करण्याच्या इराद्याने खोटे व्यापारचिन्ह म्हणून वापरण्याचा अपराध होत नसेल तेव्हा, अथवा १८६० चा ४५.

(घ) ठराविक जातीचे, द्रव्याचे व दर्जाचे नसलेले किंवा इतर पात्रात असलेले असे कोणतेही मादक द्रव्य, त्यावर किंवा त्याच्या बुचावर असलेल्यां कोणत्याही निशाणीसह, अशा बाटलीत, पेटीत, संवेष्टनात किंवा इतर पात्रात परदेशी दारू आहे असे वाटावे या इराद्याने विकील आणि जेव्हा असे कृत्य भारतीय दंड संहिता, कलम ४८६ अन्वये नकली व्यापारचिन्ह ज्यावर आहे असा माल विकण्याचा अपराध होत नसेल तेव्हा, अथवा १८६० चा ४५.

(ङ) खरेदीदाराने मागितलेल्या जातीचे, द्रव्याचे व दर्जाचे नसेल असे कोणतेही मादक द्रव्य विकील किंवा लायसन धारण करणाऱ्या व्यक्तीला तिच्या लायसनच्या अटीप्रमाणे ज्या जातीचे, द्रव्याचे किंवा दर्जाचे मादक द्रव्य विकण्याचा अधिकार नाही असे कोणतेही मादक द्रव्य विक्रीसाठी ठेवील किंवा मांडील, तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, अशा प्रत्येक अपराधाबद्दल सहा महिन्यापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल व एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल.

नोकरांच्या अपराधाबद्दल लायसनदाराची जबाबदारी.

७९. या अधिनियमान्वये दिलेले लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीने, तिच्या नोकरीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये तिच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने तिच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने केलेल्या अपराधाच्याबाबतीत, असा अपराध होऊं नये म्हणून आपण सर्व योग्य व वाजवी उपाययोजना केल्या होत्या असे सिद्ध न केल्यास, असा

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ६१ (ब) अन्वये "तीन" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमान्वये "दोनशे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अपराध जणू तिनेच केला होता असे समजून, त्याबद्दल तिला जबाबदार धरण्यात येईल. तसेच प्रत्यक्ष अपराध करणाऱ्या व्यक्तीलाही त्याबद्दल जबाबदार धरण्यात येईल :

परंतु, द्रव्य दंड भरण्यास कसूर केल्याच्या प्रसंगाव्यतिरिक्त इतर प्रसंगी, प्रत्यक्ष अपराध करणाऱ्या व्यक्तीव्यतिरिक्त इतर क़ोणत्याही व्यक्तीस कारावासाची शिक्षा देता येणार नाही.

कोणत्याही व्यक्तीने दुसऱ्याच्या वतीने मादक द्रव्याची आयात, निर्यात करणे.

८०. (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही इतर व्यक्तीच्या वतीने मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी तयार केली असेल, आयात् केली असेल, निर्यात केली असेल किंवा तिचे परिवहन केले असेल, ती विकली असेल अथवा जवळ बाळगली असेल आणि जेव्हा अशा दुसऱ्या व्यक्तीस, असे तयार करणे, आयात करणे, निर्यात करणे, परिवहन करणे, विकणे अगर जवळ बाळगणे आपल्या वतीने झाले आहे हे माहित असेल अगर तसे त्यास सकारण वाटत असेल तेव्हा, यथास्थिति, असे मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता अशा दुसऱ्या व्यक्तीने तयार केली आहे, आयात केली आहे, निर्यात केली आहे किंवा तिने तिचे परिवहन केले आहे, विक्री केली आहे किंवा आपल्याजवळ बाळगली आहे असे समजले पाहिजे.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही तरतुदींमुळे असे पदार्थ बेकायदेशीररित्या तयार करणे, आयात करणे, निर्यात करणे, त्यांचे परिवहन करणे, विक्री करणे किंवा जवळ बाळगणे याबद्दल, या अधिनियमान्वये कोणत्याही व्यक्तीस जी कोणतीही शिक्षा होऊ शकेल, त्यातून ती मुक्त होणार नाही.

प्रयत्न करणे किंवा अपप्रेरणा देणे याबद्दल शिक्षा.

८१. जी कोणती व्यक्ती, या अधिनियमाखालील अपराध करण्याचा प्रयत्न करील किंवा तो करण्यास अपप्रेरणा देईल, तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, असा प्रयत्न केल्याबद्दल किंवा प्रोत्साहन दिल्याबद्दल मुख्य अपराधाबद्दल जी शिक्षा सांगितली असेल तितकी शिक्षा होईल.

लायसन, परवाना, वगैरे यांचा भंग करणे हा अपराध असणे.

८२. (१) या अधिनियमान्वये दिलेले कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा तिच्या नोकराने किंवा तिच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने तिच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अशा लायसनाच्या, परवान्याच्या, पासाच्या किंवा प्राधिकारपत्राच्या कोणत्याही अटीचा किंवा शर्तीचा भंग केल्यास, तिला दिलेले लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र रद्द होऊन किंवा तहकूब होऊन शिवाय असा कोणताही भंग होऊ न देण्यासाठी आपण सर्व योग्य व वाजवी उपाययोजना केल्या होत्या असे तिने सिद्ध न केले तर, तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) जी कोणती व्यक्ती, अशा रितीने कोणताही भंग करील, ती त्याच शिक्षेस पात्र होईल–मग ती असे कृत्य लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीच्या परवानगीने केलेला असो किंवा परवानगीवाचून केलेला असो.

कट करण्याबद्दल शास्ती.

८३. जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती–

(क) या अधिनियमाखालील कोणताही अपराध स्वतः करण्याचे किंवा तो दुसऱ्या व्यक्तीकडून करविण्याचे, अथवा

(ख) [१][* * * *] लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र याच्या शर्तीचा भंग करण्याचे आपसात ठरवतील तेव्हा, त्यापैकी प्रत्येक व्यक्तीस, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, दोन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ३७ अन्वये "या अधिनियमाचे उपबंध, नियम, विनियम किंवा आदेश मोडण्याचे, किंवा निरर्थक करण्याचे, किंवा" हा मजकूर वगळण्यात आला.

कोणत्याही सार्वजनिक गुत्त्यात दारू पिऊन धुंद झाल्याचे आढळून आल्याबद्दल शास्ती.

८४. जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही दारूच्या सार्वजनिक गुत्त्यात दारू पिऊन धुंद झाल्याचे आढळून येईल किंवा दारू पीत असताना आढळून येईल किंवा दारू पिण्यासाठी तेथे हजर असल्याचे आढळून येईल, तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल. कोणतीही व्यक्ती गुत्त्यात दारू पिण्याचे काम चालू असता तेथे आढळून येईल तर, ती तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत, तेथे दारू पिण्यासाठी हजर होती असे गृहीत धरण्यात येईल.

दारू पिऊन धुंद झाल्याबद्दल व गैरशिस्त वागणुकीबद्दल शास्ती.

८५. [1][ (१) जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही सडकेवर अथवा सार्वजनिक जागी किंवा ज्या कोणत्याही जागी लोकांना प्रवेश मिळू शकतो अथवा परवानगी मिळू शकते अशा जागी दारूच्या नशेत गैरशिस्तीने वागेल तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता,–

(क) पहिल्या अपराधाबद्दल, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाची व एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात तद्विरुद्ध नमूद करण्यात येतील अशा विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी अशी कारावासाची शिक्षा तीन महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही ; आणि

(ख) नंतरच्या अपराधाबद्दल, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाची व तसेच एक हजार रुपये इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात तद्विरुद्ध नमूद करण्यात येतील अशा विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, अशी कारावासाची शिक्षा सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही. ]

[2][ (२) पोट-कलम (१) खालील अपराध केल्याबद्दल चालविलेल्या खटल्यात, तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत, असा अपराध केल्याबद्दल जिच्यावर आरोप ठेवला आहे अशी व्यक्ती औषधी कारणांसाठी नव्हे तर नशा येण्यासाठी दारू प्यायली आहे किंवा कोणत्याही इतर मादक द्रव्याचे तिने सेवन केले आहे असे गृहीत धरण्यात येईल.]

या अधिनियमाखालील अपराध करण्यासाठी कोणतीही जागा वापरण्याची परवानगी देण्याबद्दल शास्ती.

८६. (१) जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही जागेची मालक किंवा तिचा भोगवटा करणारी अगर वापर करणारी किंवा तिच्यावर देखरेख ठेवणारी अगर तिची व्यवस्था पाहणारी किंवा तिच्यावर नियंत्रण ठेवणारी असून, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध इतर कोणत्याही व्यक्तीकडून करण्यासाठी अशा जागेचा वापर करण्याची जाणूनबुजून परवानगी देईल, तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील :

परंतु, न्यायालयाच्या निकालपत्रात तद्विरुद्ध नमूद करण्यात येतील अशा विशेष व पुरेशा कारणांच्या अभावी, अशी कैदेची शिक्षा तीन महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्य दंड पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

---

[1] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम २ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी नवीन पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

[2] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ८८ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

(२) पोट-कलम (१) खालील अपराध केल्याबद्दल जिच्यावर आरोप ठेवला आहे त्या व्यक्तीच्या खास कब्जातील जागेत त्या इतर व्यक्तीने असा अपराध केल्याचे सिद्ध झाल्यास, तो तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत, अशा आरोपित व्यक्तीने केला आहे असे गृहीत धरण्यात येईल.

रसायनी औषधे विकणारी व्यक्ती, औषधे विकणारी व्यक्ती किंवा औषध विक्रेता यांस आपली जागा त्यात दारुचे सेवन करण्यासाठी वापरण्याची परवानगी दिल्याबद्दल शास्ती.

८७. रसायनी औषधे विकणारा, औषधे विकणारा, औषधविक्रेता किंवा दवाखान्याचा व्यवस्थापक अशी जी कोणी व्यक्ती कोणत्याही व्यक्तीस [1][नोंदलेल्या वैद्यक व्यवसायीच्या] चिकित्सापत्रानुसार औषधीय कारणासाठी जी खरोखर औषधीयुक्त केलेली नाही अशा कोणत्याही प्रकारची दारू किंवा कोणतीही मादक औषधी सेवन करण्यास आपल्या धंद्याच्या जागेत परवानगी देईल तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

खोटी चिकित्सापत्रे दिल्याबद्दल शास्ती.

८८. एखादा [1][नोंदलेला वैद्यक व्यवसायी] एखाद्या व्यक्तीस चिकित्सापत्र देईल व अशा व्यक्तीने या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा विनियमाचे किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा या अधिनियमाअन्वये दिलेल्या कोणत्याही लायसनचे, परवान्याचे, पासाचे किंवा प्राधिकारपत्राचे उल्लंघन करून, दारू, मादक द्रव्य किंवा अफू यांचे सेवन करण्यासाठी असे चिकित्सापत्र वापरावे असा त्या व्यवसायीचा इरादा असेल तर, त्यास सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

दुर्भावपूर्वक खोटी माहिति पुरविल्या-बद्दल शास्ती.

८९. जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाअन्वये अधिकारांचा वापर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस दुर्भावपूर्वक व खोटेपणाने माहिती देईल व त्यामुळे कोणत्याही जागेत झडती घेण्यात येईल, कोणताही माल जप्त करण्यात येईल, कोणत्याही व्यक्तीस अटकावून ठेवण्यात येईल किंवा अटक करण्यात येईल तर, त्या व्यक्तीस, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

ज्यासाठी अन्यथा तरतूद केलेली नाही अशा अपराधाबद्दल शास्ती.

९०. जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तदन्वये केलेल्या नियमाचे किंवा विनियमाचे किंवा तदन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा या अधिनियमाअन्वये दिलेल्या कोणत्याही लायसनचे, परवान्याचे, पासाचे किंवा प्राधिकारपत्राचे उल्लंघन करून कोणतेही कृत्य बुद्ध्या केल्याबद्दल किंवा कोणतेही कृत्य हेतुपूर्वक टाळल्याबद्दल दोषी असेल व असे कृत्य करणे किंवा टाळणे हे या अधिनियमाअन्वये अन्यथा अपराध होत नसेल तर, तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा पांचशे रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

---

[1]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १० अन्वये "वैद्यक व्यवसायीच्या", "वैद्यक व्यवसायी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

काही अपराध करण्यापासून परावृत्त होण्यासाठी प्रतिभूती मागणे.

९१. (१) या अधिनियमाअन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केल्याबद्दल कोणत्याही व्यक्तीस सिद्धापराध ठरविण्यात येईल तेव्हा, अशा व्यक्तीला सिद्धापराध ठरविणाऱ्या न्यायालयास तिला शिक्षा देताना, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये शिक्षापात्र असलेला अपराध न्यायालय निदेश देईल अशा जास्तीत जास्त तीन वर्षांच्या मुदतीत त्याने करू नये म्हणून त्याच्या उत्पन्नाच्या प्रमाणात असलेल्या रकमेचे बंधपत्र, जामिनानिशी किंवा जामिनावाचून, करून देण्याविषयी त्याला आदेश देता येईल.

(२) असे बंधपत्र, *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ यांच्या तरतुदींअन्वये तरतूद करण्यात येईल अशा नमुन्याप्रमाणे असेल ; आणि उक्त संहितेच्या तरतुदी, जेथवर लागू होतील तेथवर, अशा बंधपत्रासंबंधी असलेल्या सर्व गोष्टींना जणू असे बंधपत्र शांतता राखण्यासाठी उक्त संहितेच्या कलम १०६ अन्वये करून देण्यास फर्मावले आहे असे समजून लागू होईल. १८९८ चा ५

(३) अपिलात अपराधसिद्धी रद्द झाली तर, अशा रीतीने करून दिलेले बंधपत्र निरर्थक होईल.

९२. [अपराध्यांची जामिनावर सुटका.] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७. कलम २ अन्वये वगळण्यात आले.

चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल प्रतिभूती मागणे.

९३. (१) जेव्हा जेव्हा [१][बृहन्मुंबईत, राज्य शासनाने याबाबत खास अधिकार दिलेला इलाखा-शहर दंडाधिकारी व इतरत्र, जिल्हादंडाधिकारी किंवा उप-विभागीय दंडाधिकारी यांस,] त्यांच्या अधिकार क्षेत्राच्या स्थानिक हद्दीत, कोणतीही व्यक्ती या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध वारंवार करते किंवा करण्याचा प्रयत्न करते किंवा करण्यास अपप्रेरणा देते अशी माहिती मिळेल तेव्हा तेव्हा, अशा व्यक्तीस दंडाधिकारी निदेश देईल अशा जास्तीत जास्त तीन वर्षांच्या मुदतीसाठी चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल जामिनानिशी, बंधपत्र लिहून देण्यास त्यास आदेश का देण्यात येऊ नये याविषयी कारणे दाखविण्यास अशा दंडाधिकाऱ्यास सांगता येईल.

(२) *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ यांच्या तरतुदी, त्या जेथवर लागू असतील तेथवर, पोट-कलम (१) अन्वये केलेल्या कोणत्याही कामकाजाच्या बाबतीत, त्यात उल्लेख केलेले बंधपत्र हे जणू उक्त संहितेचे कलम ११० अन्वये करून देणे आवश्यक असलेले बंधपत्र आहे असे समजून, लागू होतील. १८९८ चा ५

अज्ञान व्यक्तींच्या बाबतीत बंधपत्रे करून देणे.

९४. [२][कलमे ९१ व ९३ अन्वये] बंधपत्र करून देण्यास जिच्या बाबतीत फर्मावले असेल अशी कोणतीही व्यक्ती अज्ञान असल्यास, असे बंधपत्र तिच्या पालकाकडून करण्यात येईल.

त्रासदायक रीतीने झडती घेणे किंवा अटक करणे याबद्दल शास्ती.

९५. या अधिनिमान्वये अधिकारांचा वापर करणारा कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती––

(क) कोणत्याही इमारतीत किंवा घरात किंवा तत्सम राहण्याच्या जागेत दुर्भावपूर्वक प्रवेश करील किंवा करवील किंवा तिची झडती घेईल किंवा घेववील; अथवा

(ख) या अधिनियमान्वये जप्त करण्यास पात्र असलेली कोणतीही वस्तू जप्त करण्याच्या सबबीवर किंवा अशा वस्तूसाठी झडती घेण्याच्या सबबीवर कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता त्रासदायक रीतीने व निष्कारण जप्त करील; अथवा

---

*आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१, कलम ३ व दुसऱ्या अनुसूची अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७, कलम ३ अन्वये "शेवटच्या तीन पूर्ववर्ती कलमान्वये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ग) कोणत्याही व्यक्तीस त्रासदायक रीतीने व निष्कारण अटकावून ठेवील, तिची झडती घेईल किंवा तिला अटक करील; अथवा

(घ) इतर कोणत्याही रीतीने आपल्या कायदेशीर अधिकारांचे दुर्भावपूर्वक अतिक्रमण करून वर्तन करील किंवा आपल्या कायदेशीर अधिकारांचा दुरुपयोग करील;

तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

त्रासदायक रीतीने विलंब लावल्याबद्दल शास्ती.

[1][९६. या अधिनियमाअन्वये अधिकारांचा वापर करणारा जो कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती, या अधिनियमान्वये अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तीस या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये आवश्यक असल्याप्रमाणे दंडाधिकाऱ्याकडे किंवा अगदी नजिकचे पोलीस ठाणे स्वाधीन असलेल्या अधिकाऱ्याकडे पाठविण्यास किंवा या अधिनियमाअन्वये जप्त केलेली कोणतीही वस्तू या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये आवश्यक असल्याप्रमाणे अशा अधिकाऱ्याकडे पाठविण्यास, त्रास देण्याच्या हेतूने आणि आवश्यकता नसतांना विलंब लावील, तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.]

अटक केलेल्या व्यक्तींनी पळून जावे यासाठी अपप्रेरणा दिल्याबद्दल शास्ती.

९७. या अधिनियमान्वये अधिकाराचा वापर करणारा जो कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती—

(क) या अधिनियमान्वये अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तीस बेकायदेशीररीत्या सोडून देईल, अथवा

(ख) या अधिनियमान्वये अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तीस पळून जाण्यास प्रोत्साहन देईल, अथवा

(ग) या अधिनियमाविरुद्ध कोणताही अपराध करण्यास अपप्रेरणा देईल,

त्यास, आणि [2][शासनाचा] किंवा स्थानिक प्राधिकरणाचा जो कोणताही इतर अधिकारी या अधिनियमाविरुद्ध कोणताही अपराध करण्यास अपप्रेरणा देईल, त्यास, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

सरकारजमा होण्यास पात्र असलेल्या वस्तू.

९८. (१) या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध करण्यात येईल तेव्हा—

(क) ज्याच्या बाबतीत अपराध करण्यात आला असेल असे कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले, काकवी, साहित्य, दारु गाळण्याची भट्टी, भांडी, साधने किंवा उपकरणे,

(ख) बेकायदेशीररीत्या जवळ बाळगण्यामुळे होत असलेल्या अपराधाच्या बाबतीत, या अधिनियमाखालील अपराधांशी संबंधित अशा पदार्थाव्यतिरिक्त इतर कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी कायदेशीररीत्या अपराधी व्यक्तीच्या कब्जात असेल तेव्हा, अशा मादक द्रव्याचा, भांगेचा, मोहाच्या फुलांचा किंवा काकवीचा सबंध साठा,

(ग) बेकायदेशीररीत्या आयात, निर्यात किंवा परिवहन करण्यामुळे होत असलेल्या अपराधाच्या बाबतीत जेव्हा अपराधी व्यक्तीने या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तदन्वये केलेल्या नियमाचे किंवा विनियमाचे किंवा तदन्वये दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करून किंवा लायसनच्या, परवान्याच्या, पासाच्या किंवा प्राधिकारपत्राच्या शर्तीचा भंग करून कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी याची आयात, निर्यात किंवा परिवहन करण्याचा प्रयत्न केला असेल तेव्हा, ज्यांच्या बाबतीत अशा व्यक्तीने आयात, निर्यात किंवा परिवहन करण्याचा प्रयत्न केला असेल ती सर्व मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले, किंवा काकवी,

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ६२ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "बादशाहाचा" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

(घ) बेकायदेशीर विक्री करण्यामुळे होत असलेल्या अपराधाच्या बाबतीत, ज्यांच्या बाबतीत अपराध करण्यात आला असेल अशा पदार्थाव्यतिरिक्त इतर कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी कायदेशीररीत्या अपराधी व्यक्तीच्या कब्जात असेल तेव्हा, अशी इतर सर्व मादक द्रव्ये, भांग, मोहाची फुले किंवा काकवी,

ही, न्यायालयाच्या आदेशावरून सरकारजमा केली जातील.

(२) पोट-कलम (१) अन्वये सरकारजमा होण्यास पात्र असलेली, कोणतीही वस्तू ज्यात आढळून आली आहे असे कोणतेही पात्र, संवेष्टन किंवा वेष्टन व अशा पात्रातील संवेष्टनातील किंवा वेष्टनातील इतर वस्तू आणि अशी कोणतीही वस्तू वाहून नेण्याकरिता वापरण्यात आलेली जनावरे, गाड्या, जलयाने किंवा इतर वाहने ही, न्यायालयाच्या आदेशावरून तशाच प्रकारे सरकारजमा होण्यास पात्र असतील.

सरकारजमा होण्यास पात्र असलेल्या वस्तू खरोखरीच्या मालकांस परत करणे.

**९९.** या अधिनियमाखालील अपराधाचा खटला चालू असताना, कोणतीही वस्तू मागील कलमाअन्वये सरकारजमा होण्यास पात्र आहे असा न्यायालयाने निर्णय दिल्यास, त्यास, अशा वस्तूवर हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि आपल्या हक्काच्या समर्थनार्थ तो जो कोणताही साक्षीपुरावा हजर करील तो ऐकून घेतल्यानंतर, अशी वस्तू जप्त करण्याविषयी आदेश देता येईल. तसेच एखादे मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी यांव्यतिरिक्त असलेल्या एखाद्या वस्तूच्या बाबतीत, सरकारजमा करण्याऐवजी न्यायालयास, त्यास योग्य वाटेल इतका द्रव्य दंड भरण्याविषयी अशा मालकास मुभा देता येईल :

परंतु, कोणत्याही जनावराच्या, गाडीच्या, जलयानाच्या, वाहनाच्या किंवा इतर वाहतुकीच्या साधनाच्या मालकाने, गुन्हा घडू नये यासाठी आपण वाजवी काळजी घेतली होती अशी न्यायालयाची खात्री करून दिली तर, असे जनावर, गाडी, जलयान किंवा इतर वाहन सरकारजमा करता येणार नाही.

सरकारजमा करण्याच्या वेळी अनुसरावयाची कार्यपद्धती.

**१००.** या अधिनियमाखाली एखादा अपराध करण्यात आला असेल आणि अपराधी माहीत नसेल किंवा सापडणे शक्य नसेल किंवा या अधिनियमाअन्वये सरकारजमा करण्यास पात्र असलेली कोणतीही वस्तू सापडली असेल किंवा जप्त करण्यात आली असेल तेव्हा [१][आयुक्तास], जिल्हाधिकाऱ्यास किंवा [२][राज्य] शासन याबाबत प्राधिकृत करील अशा कोणत्याही इतर अधिकाऱ्यास, चौकशी करता येईल आणि अशी चौकशी केल्यानंतर, अपराध करण्यात आला आहे अशी त्याची खात्री झाल्यास, त्यास, सापडलेली वस्तू सरकारजमा करण्याविषयी आदेश देता येईल :

परंतु, अशी वस्तू जप्त केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याची मुदत संपण्यापूर्वी किंवा [३][अशा वस्तूवर कोणताही हक्क सांगणारी व्यक्ती असल्यास तिचे म्हणणे] ऐकून घेतल्यावाचून आणि आपल्या हक्काच्या समर्थनार्थ ती जो कोणताही साक्षीपुरावा हजर करील तो ऐकून घेतल्यावाचून, असा कोणताही आदेश देणार नाही.

सरकारजमा केली जाण्यास पात्र असलेली वस्तू विकण्याविषयी किंवा नष्ट करण्याविषयी आदेश देण्याचा जिल्हाधिकारी, वगैरे यांचा अधिकार.

**१०१.** जेव्हा अशी वस्तू त्वरित व स्वाभाविकरीत्या नाश पावण्याजोगी असेल किंवा तिची विक्री करणे मालकाच्या हिताचे आहे असे [१][आयुक्ताचे] जिल्हाधिकाऱ्याचे, [४][न्यायालयाचे] किंवा [२][राज्य] शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याचे मत झाल्यास, त्यास, अशी वस्तू विकण्याविषयी कोणत्याही वेळी निदेश देता येईल ; आणि कलम ९९ किंवा कलम १०० च्या तरतुदी, जेथवर शक्य असेल तेथवर, विक्री करून आलेल्या निव्वळ रकमेच्या बाबतीत लागू होतील :

---

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ अनुसूचीअन्वये "संचालकास किंवा संचालकाचे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ६३ अन्वये "अशा वस्तूवर हक्क सांगणाऱ्या कोणत्याही इसमाचे म्हणणे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१, कलम ३, अनुसूची अन्वये "फौजदारी न्यायाधीशाचे" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[१][ परंतु, कोणतीही वस्तू, त्वरित व स्वाभाविकरीत्या नाश पावण्याजोगी असेल किंवा ती क्षुल्लक किंमतीची असेल त्याबाबतीत, न्यायालयास किंवा संबंधित अधिकाऱ्यास प्रकरणाच्या परिस्थितीचा विचार करता अशी वस्तू नष्ट करण्याचा आदेश देणे इष्ट आहे असे त्यांचे मत झाल्यास, ती नष्ट करण्याविषयी आदेश देता येईल. ]

मादक द्रव्य वापरण्याची [२][विनंती] करणारी जाहिरात किंवा मजकूर असलेले कोणतेही प्रकाशन सरकारजमा करणे.

**१०२.** (१) जेव्हा कोणत्याही ठिकाणी छापलेल्या किंवा प्रसिद्ध केलेल्या कोणत्याही वर्तमानपत्रात वृत्तपत्रात, पुस्तकात, पत्रकात, पुस्तिकेत किंवा इतर प्रकाशनात ज्याद्वारे कोणतेही मादक द्रव्य किंवा [३][ * * * ] भांग वापरण्याची विनंती करण्यात येत आहे किंवा असे द्रव्य किंवा भांग देऊ करण्यात येत आहे अशी कोणतीही जाहिरात किंवा मजकूर असल्याचे [४][ राज्य ] शासनास दिसून येईल तेव्हा, [४][ राज्य ] शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, अशा वर्तमानपत्राची, वृत्तपत्रांची, पुस्तकांची, पुस्तिकेची किंवा इतर प्रकाशनाची प्रत्येक प्रत- मग ते [५][ राज्यात ] किंवा राज्याबाहेर छापलेले किंवा प्रसिद्ध केलेले असो– [६][ सरकारजमा ] करण्यात आली आहे असे जाहीर करता येईल ; आणि त्यानंतर, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास अशा प्रती [५][ राज्यात ] सापडतील तेथे जप्त करता येतील. कोणत्याही दंडाधिकाऱ्यास फौजदाराच्या दर्जाहून कमी दर्जाच्या नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला जेथे अशा अंकाची किंवा अशा कोणत्याही वर्तमानपत्राची, वृत्तपत्राची, पुस्तकाची, पत्रकाची, पुस्तिकेची किंवा इतर प्रकाशनाची कोणतीही प्रत असेल किंवा असल्याचा वाजवी रीतीने संशय येत असेल त्या कोणत्याही जागेत प्रवेश करण्यासाठी व झडती घेण्यासाठी अधिपत्र देऊन, प्राधिकृत करता येईल. या कलमाअन्वये देण्यात आलेले
१८९८ प्रत्येक अधिपत्र, *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ अन्वये झडतीचे अधिपत्र बजाविण्यासाठी ज्या रीतीची
चा ५. तरतूद करण्यात आली आहे त्याच रीतीने बजाविण्यात येईल.

(२) या कलमान्वये [४][ राज्य ] शासनाने दिलेला निर्णय अखेरचा असेल व त्यावर कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही.

काही बाबतीत अपराध करण्यात आला आहे असे गृहीत धरणे.

**१०३.** (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये चालविलेल्या खटल्यात, तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत, आरोपी व्यक्तीने, जे जवळ बाळगण्याबद्दल त्यास समाधानकारक रीतीने कारण दाखविता येत नाही असे कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी याबाबत अथवा [७][ * * * * ] अशी कोणतीही दारू गाळण्याची भट्टी, भांडी, साधने किंवा उपकरणे या बाबत [८][ अथवा कोणतेही मादक द्रव्य तयार करण्यासाठी ज्याच्यावर कोणतीही प्रक्रिया करण्यात आली आहे ] किंवा ज्यापासून एखादे मादक द्रव्य तयार करण्यात आले आहे असे कोणतेही साहित्य याबाबत या अधिनियमाखालील अपराध केला आहे असे अधिक पुराव्यावाचून गृहीत धरण्यात येईल.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ६४ अन्वये मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[२] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ३९ अन्वये "तारीफ" या मजकुराऐवजी हा मजकुर, दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३९ अन्वये "तारीफ" हा मजकूर वगळण्यात आला.

[४] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ३ अन्वये "दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "बादशहाकडे जमा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ६५ (अ) अन्वये "असे मादक द्रव्य तयार करण्यात ज्याचा सामान्यतः उपयोग केला जातो" हा मजकूर वगळण्यात आला.

[८] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम ८ अन्वये हा मजकुर दाखल करण्यात आला.

*आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

[१][ * * * * * ]

**१०३-क.** [ काही नोंदलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रतिवृत्त पुराव्यादाखल असणे ] सन १९५९ मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १२ अन्वये वगळण्यात आले.

अपराध आपसात मिटवणे.

**१०४.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीचे लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्रे रद्द केले जाण्यास किंवा तहकूब केले जाण्यास पात्र असेल किंवा ज्याच्यावर कलमे [२][६९, ७०, ७७, ८२, किंवा] १०८ या खालील अपराध केल्याचा वाजवी संशय असेल किंवा अशा कोणत्याही व्यक्तीकडून, यथास्थिति, अशा रीतीने लायसन वगैरे रद्द करण्याऐवजी किंवा तहकूब करण्याऐवजी किंवा जो अपराध करण्यात आला असेल तो अपराध आपसात मिटविण्यासाठी म्हणून पैशाची रक्कम स्वीकारण्यास [३][ राज्य ] शासनास मंजुरी देता येईल ; आणि ज्या कोणत्याही बाबतीत मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी याव्यतिरिक्त जी कोणतीही इतर मालमत्ता या अधिनियमान्वये सरकारजमा होण्यास पात्र असेल त्या बाबतीत, ती मालमत्ता [३][ राज्य ] शासनाने किंवा [३][ राज्य ] शासन याबाबत प्राधिकृत करील अशा अधिकाऱ्याने अंदाजलेली तिची किंमत देण्यात आल्यावर सोडून देईल :

परंतु, [४][कलम ६९, ७० किंवा] १०८ या खालील अपराध केल्याचा ज्या व्यक्तीवर वाजवी संशय असेल अशी व्यक्ती या अधिनियमान्वये दिलेले लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करीत नसेल किंवा असे लायसन वगैरे धारण करणाऱ्या व्यक्तीच्या नोकरीत नसेल किंवा तिच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने तिच्या वतीने काम करीत नसेल तेव्हा, अशा व्यक्तीकडून अपराध आपसात मिटविण्यासाठी म्हणून द्यावयाची रक्कम पाचशे रुपयांहून अधिक असणार नाही :

[५][ परंतु आणखी असे की, ज्याच्यावर कलम १०८ खाली अपराध केल्याचा वाजवी संशय असेल अशा व्यक्तीच्या बाबतीत, तिच्याकडून अपराध आपसात मिटविण्यासाठी म्हणून जी पैशाची रक्कम तिच्याकडून स्वीकारता येईल ती, या अधिनियमान्वये त्यास शुल्काची किंवा फीची जी रक्कम देणे भाग आहे त्याच्याव्यतिरिक्त असेल. ]

(२) अशा व्यक्तीने, यथास्थिति, अशी पैशाची रक्कम किंवा अशी किंमत किंवा दोन्ही दिल्यानंतर, तिला ती अभिरक्षेत असेल तर, सोडून देण्यात यावी व जप्त केलेली मालमत्ता सुद्धा मुक्त करण्यात यावी ; आणि अशा व्यक्तीविरुद्ध फौजदारी न्यायालयात कोणतेही काम चालविण्यात आले असेल तर, अशा तडजोडीमुळे व त्यांची दोषमुक्ती झाली आहे असे समजण्यात येईल व अशा व्यक्तीविरुद्ध किंवा मालमतेविरुद्ध त्याच गोष्टीसंबंधाने पुढे कोणतेही काम चालविता कामा येणार नाही.

मुंबई अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९३८ व *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ याच्या कलम ५६२ च्या तरतुदी या अधिनियमाखालील अपराध केल्याबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आलेल्या व्यक्तीस लागू नसणे.

[६][**१०४-क.** मुंबई अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९३८ [७][किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या उक्त अधिनियमासारख्या कोणत्याही कायद्यात किंवा अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ हा राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात आणला असल्यास त्या अधिनियमात किंवा] *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ याच्या कलम ५६२ यातील कोणत्याही तरतुदी, या अधिनियमाखालील कोणताही अपराध केल्याबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस लागू होणार नाहीत.]

१९३८ चा मुंबई १९. १९५८ चा २०. १८९८ चा ५.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ६५ (ब) अन्वये पोट-कलम (२) वगळण्यात आले.

[२] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ४० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ४० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ६६ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[६] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७, कलम ४ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

[७] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

*आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

## प्रकरण आठ

## उत्पादन शुल्के

**१०५.** [१][ (१) ] (क) मनुष्याने सेवन करण्याजोगी कोणत्याही प्रकारची मद्यार्कयुक्त दारू, उत्पादन शुल्के
(ख) कोणतेही मादक औषधिद्रव्य [२][किंवा भांग,]

[३][ (ग) अफू ],

(घ) कोणताही इतर उत्पादनशुल्कयोग्य पदार्थ,

यांवर, जेव्हा ते [४][ यथास्थिति, [५][राज्यात] आयात करण्यात येतील.] [४][किंवा [५][राज्यातून] ] निर्यात करण्यात येतील, किंवा [४][ यथास्थिति, [५][राज्यात] किंवा [५][राज्यातून] ] त्याचे परिवहन करण्यात येईल, ते जवळ बाळगण्यात येतील, तयार करण्यात येतील अथवा विकण्यात येतील तेव्हा, सामान्यतः किंवा कोणत्याही विशिष्ट स्थानिक क्षेत्राकरिता, [६][राज्य] शासन विनिर्दिष्ट करील त्या दराने किंवा दरांनी, यथास्थिति, उत्पादनशुल्क किंवा प्रतिशुल्क बसविता येईल :

परंतु, जो कोणताही पदार्थ [७][भारतात] आयात करण्यात आला असेल व अशा आयात करण्याच्या वेळी
१९३४ भारतीय आयात-निर्यात कर अधिनियम, १९३४ किंवा *समुद्र सीमाशुल्क अधिनियम, १८७८ याअन्वये शुल्क
चा देण्यास पात्र असेल अशा कोणत्याही पदार्थावर [८][किंवा मद्यार्क, अफू , भांग किंवा इतर अंमली औषधी किंवा
३२. अंमली द्रव्ये असलेला कोणताही औषधीयुक्त किंवा प्रसाधनीय सिद्धपदार्थ यांवर] अशा रीतीने शुल्क
१८७८
चा ८. बसविण्यात येणार नाही.

[९][**स्पष्टीकरण.**—या कलमान्वये,—

(एक) ज्या जागी सेवनासाठी कोणताही उत्पादनशुल्क योग्य पदार्थ न्यावयाचा असेल त्या जागेप्रमाणे; किंवा

(दोन) अशा पदार्थांच्या निरनिराळ्या तीव्रतेप्रमाणे किंवा गुणाप्रमाणे; किंवा

(तीन) उत्पादकाने किंवा राज्याला निर्यात करणाऱ्या व्यक्तीने विहित प्रधिकरणाकडे लेखी घोषित केलेल्या व त्या प्राधिकरणाने अधिप्रमाणित केलेल्या उत्पादनशुल्कयोग्य पदार्थांच्या उत्पादन मूल्याप्रमाणे, निरनिराळ्या दराने शुल्क बसविता येईल.]

[१०][ * * * * ]

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये कलम १०५ यास पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.
[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ६७ (अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
[३] वरील अधिनियमाच्या कलम ६७ (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ४१ अन्वये "या अधिनियमाच्या विभाग ४ मध्ये समाविष्ट असलेल्या उपबंधांनुसार" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[५] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ३ अन्वये "दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्ररचनेपूर्वीच्या मुंबई राज्यातून","दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[७] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "भारतीय डोमिनियनमध्ये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[८] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ६७ (क) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
[९] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम २ अन्वये मूळ स्पष्टीकरणाऐवजी हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.
[१०] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १४ अन्वये पोट-कलम (२) वगळण्यात आले.
* आता सीमाशुल्क अधिनियम १९६२ (१९६२ चा ५२) पहा.

उत्पादन शुल्क वसूल करण्याची रीत.

**१०६.** कलम १०५ मध्ये उल्लेख केलेली शुल्के ही, याबाबत [१][आयुक्ताने] शुल्क देण्याची जागा व रीत यांचे नियमन करण्यासाठी केलेल्या कोणत्याही विनियमास अधीन राहून, खालील मार्गापैकी कोणत्याही एका किंवा अधिक मार्गांनी वसूल करता येतील :—

(क) आयात केलेल्या उत्पादन शुल्कयोग्य पदार्थांच्या बाबतीत—

(एक) ज्या राज्यात तो आयात करण्यात आला असेल त्या [२][राज्यात] आयात करण्याच्या वेळी किंवा ज्या [३][राज्यातून] किंवा प्रदेशातून तो निर्यात करण्यात आला असेल त्या राज्यात किंवा प्रदेशात निर्यात करण्याच्या वेळी शुल्क देऊन, अथवा

(दोन) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये स्थापन केलेल्या किंवा लायसन दिलेल्या वखारीतून विक्रीकरिता बाहेर काढल्यावर, शुल्क देऊन;

(ख) निर्यात केलेल्या उत्पादन शुल्क योग्य पदार्थाच्या बाबतीत मिर्यात करण्याच्या वेळी ज्या राज्यातून तो निर्यात करण्यात आला असेल त्या [२][राज्यात] अथवा ज्या राज्यात किंवा प्रदेशात तो आयात करण्यात आला असेल त्या [२][राज्यात] किंवा प्रदेशात शुल्क देऊन;

(ग) परिवहन केलेल्या उत्पादन शुल्कयोग्य पदार्थाच्या बाबतीत—

(एक) ज्या जिल्ह्यातून त्याचे परिवहन करण्यात आले असेल त्या जिल्ह्यात शुल्क देऊन, अथवा

(दोन) या अधिनियमांच्या तरतुदीअन्वये स्थापन केलेल्या किंवा लायसन दिलेल्या वखारीतून विक्रीकरिता बाहेर काढल्यावर शुल्क देऊन;

(घ) या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या कोणत्याही दारूच्या भट्टींत अथवा लायसन्स दिलेल्या कोणत्याही दारूच्या भट्टीत किंवा दारू गाळण्याच्या कारखान्यात तयार झालेल्या मद्यसाराच्या किंवा बीअरच्या बाबतीत—

(एक) यथास्थिति, अशा दारूच्या भट्टीत किंवा दारू गाळण्याच्या कारखान्यात तयार झालेल्या किंवा त्यातून बाहेर काढलेल्या किंवा या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या किंवा लायसन दिलेल्या वखारीतून बाहेर काढलेल्या परिमाणावर बसविलेल्या दराने, अथवा

(दोन) [३][राज्य] शासन विहित करील अशा [४][सममूल्य प्रमाणानुसार] घ्यावयाच्या दराने, हे प्रमाण वापरलेल्या मालमसाल्याच्या परिमाणाप्रमाणे अथवा, यथास्थिति, वॉश किंवा वर्ट ज्या प्रमाणात मिसळून पातळ केलेला असेल त्याप्रमाणे मोजावे;

(ङ) [५][[२][राज्यात] तयार केलेल्या] मादक औषधींच्या बाबतीत, या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या किंवा लायसन दिलेल्या वखारीत तयार केलेल्या किंवा तेथून बाहेर काढलेल्या परिमाणावर शुल्क देऊन:

---

[१]सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२ कलम ३ अनुसूची अन्वये "संचालकाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १५ अन्वये "दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३]विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ६८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ४२ अन्वये "ह्या अधिनियमान्वये दिलेल्या लायसननुसार तयार केलेल्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु ,या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या किंवा लायसन दिलेल्या वखारीतून विक्रीकरिता बाहेर काढलेल्या पदार्थावर शुल्क देण्यात येईल तेव्हा, ते पदार्थ वखारीतून बाहेर काढण्याच्या दिनांकास अंमलात असणाऱ्या शुल्काच्या दराप्रमाणे देईल :

परंतु आणखी असे की, एकाच व्यक्तीला देशी दारू किंवा कोणतेही मादक द्रव्य--

(एक) तयार करण्याची किंवा आयात करण्याची व विकण्याची, अथवा.

(दोन) तयार करण्याची व निर्यात करण्याची,

परवानगी देण्यात आली असेल तेव्हा, अशा रीतीने देण्यात आलेला संयुक्त विशेष अधिकार लक्षात घेऊन, जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल असे शुल्क वसूल करता येईल.

**१०७.** [उत्पादनशुल्क माफ करण्याचा, त्यात सूट देण्याचा किंवा ते परत करण्याचा अधिकार.] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ६९ अन्वये वगळण्यात आले.

कलम २४-क मध्ये नमूद केलेल्या पदार्थांचा साठा जाहीर करणे; हिशेब ठेवणे व विवरणे सादर करणे.

[1][**१०७-क.** कलम २४-**क** मध्ये नमूद केलेला कोणताही पदार्थ आयात करणारी किंवा तयार करणारी प्रत्येक व्यक्ती--

(क) विहित करण्यात येईल अशा मुदतीत व अशा नमुन्याप्रमाणे त्याच्या कब्जात असलेल्या अशा पदार्थाचे परिमाण दर्शविणारे विवरण यथास्थिति, असा पदार्थ आयात करण्यात येईल किंवा तयार करण्यात येईल त्यावेळी जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करील;

(ख) अशा पदार्थाचे विहित करण्यात येईल अशा नमुन्याप्रमाणे हिशेब ठेवील व विहित करण्यात येतील अशी विवरणे सादर करील.

माहिती मिळविण्याचा व उत्पादन-शुल्कयोग्य पदार्थांची झडती घेण्याचा व ते जप्त करण्याचा अधिकार.

**१०७-ख.** (१) जिल्हाधिकारी किंवा राज्य शासन याबाबत अधिकार देईल अशा कोणत्याही अधिकाऱ्यास विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून--

(क) आदेशाद्वारे, या विभागांन्वये कोणतेही उत्पादनशुल्क किंवा फी देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, या विभागाच्या प्रयोजनांकरिता आवश्यक असेल अशा कोणत्याही उत्पादन शुल्कयोग्य पदार्थासंबंधी कोणतीही माहिती त्यास पुरविण्यास किंवा कोणतेही हिशेब किंवा इतर कागदपत्र त्याच्यापुढे हजर करण्यास फर्मावता येईल.

(ख) ज्याच्या बाबतीत असे शुल्क किंवा फी भरण्यात आली आहे किंवा भरण्याजोगी असेल अशा आयात केलेल्या, तयार केलेल्या किंवा साठविलेल्या कोणत्याही उत्पादन शुल्कयोग्य पदार्थाच्या साठ्यासंबंधीचे हिशेब व इतर कागदपत्र, तसेच असा पदार्थ जेथे तयार केला जातो किंवा साठविण्यात येतो अशी कोणतीही जागा, सर्व वाजवी वेळी तपासता येईल.

(ग) लेखी नमूद करावयाच्या कारणासाठी, असे शुल्क किंवा फी ज्याच्या बाबतीत भरण्यात आली नसेल असा कोणताही उत्पादन शुल्कयोग्य पदार्थ जेथे आयात करण्यात, तयार करण्यात किंवा साठविण्यात येत आहे असे त्यास माहीत असेल किंवा सकारण वाटत असेल अशा कोणत्याही जागेत प्रवेश करण्याचा व अशा पदार्थाची झडती घेण्याचा आणि तीत सापडलेल्या अशा पदार्थाचा कोणताही साठा जप्त करण्याचा व असे शुल्क किंवा फी भरल्याचा पुरावा हजर करण्यात

---

[1] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलमे ४४ अन्वये कलम १०७-क व १०७-ख समाविष्ट करण्यात आली.

येईपर्यंत किंवा कलम ९८, ९९ किंवा १०० अन्वये कारवाई करण्याकरिता किंवा कलम १०८ अन्वये अपराध केल्याबद्दल खटला दाखल करण्याकरिता आवश्यक असेल तितक्या अधिक मुदतीपर्यंत असा पदार्थ अटकावून ठेवता येईल.

(२) जी कोणतीही व्यक्ती –

(क) पोट-कलम (१), खंड (क) अन्वये दिलेल्या आदेशास अनुसरून कोणतीही माहिती पुरविण्यात किंवा कोणतेही हिशेब किंवा इतर कागदपत्र हजर करण्यात कसूर करील [१][किंवा खोटी माहिती पुरवील किंवा खोटा हिशेब किंवा कागदपत्र हजर करील ; अथवा]

(ख) पोट-कलम (१), खंड (ख) किंवा (ग) अन्वये जो कोणताही अधिकारी तपासणी करीत असेल, प्रवेश करीत असेल, झडती घेत असेल किंवा पदार्थ जप्त करीत असेल त्यास अडथळा करील, त्यास सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रूपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील].

शुल्क दिल्यावाचून कोणतेही मादक द्रव्य, वगैरे आयात करण्याबद्दल शास्ती.

**१०८.** जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमान्वये तरतूद केल्याप्रमाणे शुल्क किंवा फी दिल्यावाचून कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग आयात करील, निर्यात करील, तिचे परिवहन करील, ती जवळ बाळगील, [२][विकील] किंवा तयार करील, [३][तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता, असे शुल्क किंवा फी भरण्यास भाग पाडण्यात येऊन, त्याशिवाय एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा एक हजार रूपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या किंवा अशा शुल्काच्या किंवा फीच्या रकमेइतक्या, यांपैकी जी रक्कम अधिक असेल तितक्या रकमेइतक्या, दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.]

ताडीची झाडे छेदण्याबद्दल शुल्क.

**१०९.** (१) [४][राज्य] शासन तसा निदेश देईल तर, [५][ताडी देणारे जे झाड छेदण्यात आले असेल किंवा छेदण्याचे लायसन दिले असेल किंवा ज्याच्या संबंधात त्यापासून ताडी काढण्यासाठी लायसन दिले असेल] त्या प्रत्येक झाडाबद्दल, ते झाड ज्या मुदतीत छेदण्यात येईल किंवा छेदण्यासाठी लायसन्स देण्यात येईल अशा कोणत्याही मुदतीसाठी [४][राज्य] शासन वेळोवेळी निदेश देईल असे शुल्क वसूल करण्यात येईल.

(२) या अधिनियमान्वये [६][ताडी देणारी झाडे छेदण्यासाठी व त्यापासून ताडी काढण्यासाठी] दिलेल्या प्रत्येक लायसनमध्ये या अधिनियमाच्या तरतुदी किंवा विनियम याअन्वये जो कोणताही इतर तपशील विहित करण्यात आला असेल त्याशिवाय आणखी पुढील तपशील विनिर्दिष्ट करण्यात येईल :–

(क) छेदावयाच्या झाडांची संख्या, वर्णन व ठिकाण,

(ख) प्रत्येक झाडाच्या बाबतीत वसूल करावयाची शुल्काची रक्कम,

(ग) शुल्क हप्त्याहप्त्याने भरावयाचे असल्यास ज्या हप्त्यांनी व ज्या मुदतीने ते वसूल करावयाचे ते हप्ते व ती मुदत.

---

[१]सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ७० अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२]सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ४५ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३]वरील अधिनियमाच्या कलम ४५ (२) अन्वये "त्यास दोषी ठरविण्यात आल्यास" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "त्याच शिक्षेस पात्र ठरेल" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ७१ (अ) अन्वये "ताडी देणाऱ्याच्या झाडापासून ताडी काढण्यात येत असेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६]सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ७१ (ब) अन्वये "ताडी काढण्यासाठी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

११०. ताडी देणाऱ्या झाडाबद्दल द्यावयाचे शुल्क हे, प्रथमतः [1][ती छेदण्याचे व त्यापासून ताडी काढण्याचे] लायसन धारण करणाऱ्या व्यक्तीकडून वसूल करण्यात येईल आणि असे शुल्क देण्यास त्याने कसूर केली तर किंवा अशी झाडे लायसन वाचून छेदण्यात आली तर, ते अशा झाडांच्या मालकाकडून वसूल करण्यात येईल. शुल्क कोणी द्यावे.

१११. ताडी देणाऱ्या झाडाबद्दल झाडांच्या मालकाकडून शुल्क वसूल करण्यात येईल तेव्हा, त्यास, असे शुल्क लायसन धारण करणाऱ्या व्यक्तीकडून वसूल करण्यासाठी, वरिष्ठ धारकास आपल्या कुळांकडून आपली येणी वसूल करण्याच्या बाबतीत त्या त्या वेळी अमलात असलेल्या ज्या कायद्याच्या तरतुदीअन्वये सहाय्य मिळण्याचा हक्क आहे त्याच कायद्यांच्या तरतुदीअन्वये हक्क असेल. झाडांच्या मालकास त्याने दिलेले शुल्क वसूल करण्यासाठी सहाय्य मिळण्याचा हक्क.

११२. जी झाडे [2][राज्य] शासनाच्या मालकीची आहेत त्या झाडांपासून ताडी काढण्याचा विशेषाधिकार जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा शर्तीवर, [3][ * * * ] लिलाव करुन किंवा अन्य प्रकारे विकता येईल. शासनाच्या मालकीच्या झाडांपासून ताडी काढण्याचा विशेषाधिकार.

११३. [अफू वगैरे यांवर शुल्क बसविण्यासाठी नियम] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ७४ अन्वये वगळण्यात आले.

[4][११४. (१) या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींअन्वये देण्याजोगे किंवा या अधिनियमान्वये दिलेले कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र यांच्याबाबतीत वसूल करावयाची सर्व शुल्के, कर, दंड (न्यायालयाने बसविलेल्या दंडाव्यतिरिक्त इतर) व फी आणि कलम ५८-**क** अन्वये नेमलेल्या पर्यवेक्षकीय कर्मचारी वर्गाचा खर्च हा, [5][जर देय झाल्याच्या दिनांकास किंवा विहित कालावधीत दिला नाही तर, तो देण्याचे दायित्व असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा त्याचा कोणताही जामीनदार असल्यास त्याच्याकडून, देय झाल्याच्या दिनांकापासून दरमहा २ टक्के दराने सरळ व्याज्यासह जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.] शुल्क वगैरे वसूल करणे.

(२) जेव्हा कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमान्वये केलेला कोणताही नियम, विनियम किंवा दिलेला आदेश यांचे पालन करुन कोणतेही कृत्य करण्यासाठी किंवा त्याने कोणतेही कृत्य न करण्याबद्दल (कलम ९१ किंवा ९३ अन्वयेच्या बंधपत्राव्यतिरिक्त) बंधपत्र दिले असेल तेव्हा, असे कृत्य करणे किंवा न करणे हे भारतीय संविदा अधिनियम, १८७२ याच्या कलम ७४ च्या अर्थाप्रमाणे सार्वजनिक कर्तव्य आहे असे समजण्यात येईल व त्याने अशा बंधपत्राच्या शर्तीचा भंग केल्यानंतर, असे उल्लंघन केल्याच्या बाबतीत, त्याच्याकडून वसूल करावयाची रक्कम म्हणून त्यात सांगितलेली रक्कम त्याच्याकडून किंवा त्याचा जामीनदार असल्यास त्या जामीनदाराकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.] १८७२ चा ११.

---

[1]सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ७२ अन्वये " ताडी काढण्याचे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2]विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3]सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ७३ अन्वये "प्रतिवर्षी" हा मजकूर वगळण्यात आला.

[4]वरील अधिनियमाच्या कलम ७५ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[5]सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम २ अन्वये "तो देण्यास पात्र असलेल्या" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "वसूल करता येईल" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण नऊ

## अधिकाऱ्याचे अधिकार, कर्तव्ये व कार्यपद्धती

वाढीव दंड बसविण्याचा दंडाधिकाऱ्याचा अधिकार.

[1][११५. *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ च्या कलम ३२ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी इलाखा शहर दंडाधिकाऱ्यास किंवा पहिल्या वर्गाच्या कोणत्याही दंडाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्या कलम ३२ अन्वये त्यांना असलेल्या कोणत्याही अधिकाराव्यतिरिक्त आणखी या अधिनियमान्वये प्राधिकृत केलेली कोणतीही शिक्षा देता येईल व त्यांनी तसे करावे हे कायदेशीर असेल. परंतु दंडाची रक्कम तीन हजार रुपयांहून अधिक असणार नाही.] १८९८ चा ५.

दंडाधिकाऱ्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती.

**११६.** या अधिनियमाखालील अपराधांच्या न्यायचौकशीच्या सर्व कामांत, दंडाधिकाऱ्याने *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ मध्ये, ज्यात अपील करता येते अशा संक्षिप्तरीत्या काम चालवावयाच्या खटल्यात न्यायचौकशीकरिता जी कार्यपद्धती विहित केलेली आहे, तीच कार्यपद्धती अनुसरण्यात येईल. १८९८ चा ५.

सहअपराध्यास माफी देणे.

[2][**११६-क.** (१) या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोन किंवा अधिक व्यक्तींवर खटला भरण्यात आल्यास, इलाखा शहर दंडाधिकाऱ्यास किंवा पहिल्या वर्गाच्या कोणत्याही दंडाधिकाऱ्यास त्या अपराधाच्या तपासाच्या किंवा चौकशीच्या किंवा न्यायचौकशीच्या कोणत्याही अवस्थेत अपराधात ज्यांचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंध आहे किंवा जो अपराधात भागीदार आहे असे समजण्यात येत असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून पुरावा मिळविण्याच्या दृष्टीने अशा व्यक्तीस, त्याने अपराधाच्या संबंधात त्यास माहीत असलेल्या सर्व दस्तुस्थिती पूर्णपणे व खरेपणाने उघड करण्याच्या अटीवर माफी देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये माफी देणारा प्रत्येक दंडाधिकारी तसे करण्याची कारणे नमूद करील.

(३) या कलमाखालील माफी स्वीकारणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची, अपराधाची दखल घेणाऱ्या दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात, आणि नंतरची न्यायचौकशी असल्यास, त्या न्यायचौकशीत तपासणी करण्यात येईल.

(४) *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ ची कलमे ३३९ व ३३९-**क** यांच्या तरतुदी या संहितेच्या कलम ३३७ किंवा कलम ३३८ अन्वये ज्याला माफी देण्यात आली आहे अशा व्यक्तीस ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे या कलमान्वये माफी दिलेल्या व्यक्तीच्या न्यायचौकशीस लागू होतील, १८९८ चा ५.

**स्पष्टीकरण.**–पोट-कलम (४) च्या प्रयोजनाकरिता उक्त संहितेच्या कलम ३३९ मधील सरकारी वकिलाच्या उल्लेखात, या अधिनियमान्वये खटला चालविणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या उल्लेखाचा अंतर्भाव होतो.] .

तपास, अटक, झडत्या, वगैरे कशा कराव्या.

**११७.** या अधिनियमात स्पष्टपणे अन्यथा जी तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, तपास करणे, अटक करणे, अभिरक्षेत अटकावून ठेवणे व झडती घेणे या सर्व गोष्टी *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ च्या तरतुदींनुसार करण्यात येतील : १८९८ चा ५.

परंतु, झडती घेतेवेळी असलेले साक्षीदार हे, झडती घेतलेली जागा ज्या भागात आहे त्या भागातील रहिवासी नव्हते एवढ्याच केवळ कारणामुळे अशी झडती [3][* * *] बेकायदेशीर आहे असे समजण्यात येणार नाही.

---

[1]सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ७६ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2]वरील अधिनियमाच्या कलम ७७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[3]सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६ कलम ४६ अन्वये "राज्य सरकार" या मजकुराने सुरू होणारा व "कोणत्याही स्थानिकप्रदेशात" या मजकुराने संपणारा मजकूर वगळण्यात आला.

*आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

१८९८ चा ५. [१][११८. या अधिनियमात त्याविरुद्ध केलेल्या कोणत्याही तरतुदीच्या अभावी दखलपात्र अपराधासंबंधी *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ च्या तरतुदी या अधिनियमाखालील अपराधांच्या बाबतीत लागू असतील.] फौजदारी प्रक्रिया संहितेची दखलपात्र अपराधांच्या संबंधांतील कार्यपद्धती लागू असणे.

[१][११९. कलमे ६५, ६७, ६७-१ **क** व ६८ याखालील अपराध जामीन घेण्यास अयोग्य असतील.] विवक्षित अपराध जामीन घेण्यास अयोग्य असणे.

[२][१२०. [३][आयुक्त], जिल्हाधिकारी किंवा राज्य शासनाने याबाबत रीतसर अधिकार दिलेला कोणताही दारूबंदी अधिकारी किंवा कोणताही पोलीस अधिकारी यांस – प्रवेश करण्याचा व तपासणी करण्याचा अधिकार.

(क) ज्या वखारीत, गोदामात, दुकानात, जागेत, घरात, इमारतीत, जलयानात, वाहनात किंवा परिवेष्टित जागेत या अधिनियमान्वये जप्त होण्यास पात्र असलेले कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले, काकवी, मालमसाला किंवा पदार्थ तयार करण्यात येतो, ठेवण्यात येतो किंवा लपविण्यात येतो किंवा या अधिनियमाच्या तरतुदींच्याविरुद्ध कोणतेही मादक द्रव्य तयार करण्याच्या प्रयोजनांसाठी कोणतीही दारु गाळण्याची भट्टी, भांडी, साधने किंवा उपकरणे वापरतो, ठेवतो किंवा लपवितो असे त्यास सकारण वाटत असेल अशा कोणत्याही वखारीत, गोदामात, दुकानात, जागेत, घरात, इमारतीत, जलयानात, वाहनात किंवा परिवेष्टित जागेत दिवसा किंवा रात्री कोणत्याही वेळी प्रवेश करता येईल;

(ख) प्रतिकार केला गेल्यास, दरवाजा फोडून उघडण्याचा आणि कोणत्याही अशा वखारीत, गोदातात, दुकानात, जागेत, घरात, इमारतीत, जलयानात, वाहनात किंवा परिवेष्टित जागेत प्रवेश मिळविण्याच्या कामी जो कोणताही इतर अडथळा होईल तो दूर करता येईल;

(ग) या अधिनियमान्वये जप्त होण्यास पात्र आहे असे त्यास सकारण वाटत असेल असे कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी व कोणतेही मादक द्रव्य तयार करण्याच्या कामी वापरात येणारा असा कोणताही मालमसाला व अशी कोणतीही दारू गाळण्याची भट्टी, भांडी, साधने किंवा उपकरणे व असा कोणताही इतर पदार्थ आणि या अधिनियमाखालील कोणताही अपराध केल्याचा पुरावा ज्यावरून मिळेल असे त्यास सकारण वाटत असेल असा कोणताही लेख किंवा इतर वस्तू जप्त करता येईल; आणि

(घ) जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाखालील कोणताही अपराध केल्याबद्दल दोषी आहे असे त्यास सकारण वाटत असेल त्या व्यक्तीस अटकावून ठेवता येईल व तिची झडती घेता येईल आणि त्यास योग्य वाटेल तर अशा व्यक्तीस अटक करता येईल.]

---

[१]सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, याच्या कलम ७८ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२]वरील अधिनियमाच्या कलम ७९ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[३]सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ३, अनुसूचीअन्वये "संचालक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

*आता फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चा २) पहा.

सवेष्टने, वगैरे उघडण्याचा अधिकार.

**१२१.** (१) [१][राज्य] शासनाने याबाबत रीतसर अधिकार दिलेल्या कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्यास किंवा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास कोणतेही सवेष्टन उघडता येईल व कोणताही माल तपासता येईल; आणि त्याला कोणतेही जलयान, वाहन किंवा वाहतुकीचे इतर साधन [२][थांबविता येईल व] कोणत्याही मादक द्रव्यासाठी, भांगेसाठी, मोहाच्या फुलांसाठी किंवा काकवीसाठी त्याची [२][झडती घेता येईल]; [३][आणि अशी झडती घेताना आढळून आलेला व या अधिनियमान्वये किंवा उत्पादनशुल्क महसुलासंबंधीच्या त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये जप्त केले जाण्यास किंवा सरकारजमा केले जाण्यास पात्र असलेले कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले, काकवी किंवा कोणतीही इतर वस्तू जप्त करता येईल.]

(२) या कलमान्वये [४][घेतलेल्या झडत्यांसाठी तसे करणे आवश्यक असेल] तेव्हा, माल उतरवणे व वाहून नेणे, तपासणीसाठी पोट-कलम (३) अन्वये नेमलेल्या जागी तो आणणे, तो उघडणे व पुन्हा भरून ठेवणे या गोष्टी व पोट-कलम (३) अन्वये [५][मालाची तपासणी करण्यासाठी व तो ठेवण्यासाठी] नेमलेल्या जागी माल नेणे व ठेवणे या गोष्टी अशा मालाच्या मालकाकडून किंवा त्याच्या खर्चाने करण्यात येईल.

(३) मालाचा मालक किंवा माल ताब्यात असलेली व्यक्ती, झडती घेणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याने तसे करण्यास फर्माविले असता, मालाची तपासणी करण्यासाठी किंवा तो ठेवण्यासाठी [६][बृहन्मुंबईत पोलीस आयुक्त, मुंबई यांनी व इतरत्र जिल्हा दंडाधिकाऱ्यांने नेमलेल्या जागी.] असा माल नेईल.

[७][(४) राज्य शासनाला, पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही कारणासाठी आलेला खर्च, मालाच्या मालकाकडून किंवा यथास्थिति, तो ताब्यात असणाऱ्या व्यक्तीकडून, तो जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.]

लायसन हजर करण्यास भाग पाडण्याचा अधिकार.

[८][**१२२.** (१) [९][आयुक्त] किंवा जिल्हाधिकारी किंवा याबाबत राज्य शासनाने योग्य रीतीने अधिकार दिलेला कोणताही दारूबंदी अधिकारी किंवा कोणताही पोलीस अधिकारी यांस ––

(क) लायसन दिलेल्या कोणत्याही कारखानदाराला किंवा विक्रेत्याला किंवा ताडीचे झाड छेदणाऱ्याच्या किंवा ताडी काढणाऱ्याला किंवा अशा कारखानदाराच्या किंवा विक्रेत्याच्या किंवा ताडीचे झाड छेदणाऱ्याला किंवा ताडी काढणाऱ्याच्या नोकरीत असलेल्या व्यक्तीला किंवा त्यांच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने त्याच्या वतीने काम करणाऱ्या व्यक्तीला तो या अधिनियमान्वये दिलेल्या ज्या लायसनच्या, परवानाच्या, पासाच्या किंवा प्राधिकारपत्राच्या आधारे कोणतीही मादक द्रव्ये, भांग, मोहाची फुले किंवा काकवी तयार करण्याचे, साठविण्याचे किंवा विकण्याचे काम चालवीत असेल किंवा ज्या आधारे ताडी देणारी झाडे छेदीत असेल किंवा त्यापासून ताडी काढीत असेल ते लायसन,परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र हजर करण्यास भाग पाडता येईल;

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८० (अ) अन्वये "थांबविता येईल व ............ झडती घेता येईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ४७ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८० (ब) (१) अन्वये "तसे करणे आवश्यक असेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ८० (ब) (२) अन्वये "माल ठेवण्यासाठी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ८० (क) अन्वये "जिल्हा फौजदारी न्यायाधीश किंवा पोलिस कमिशनर, मुंबई यांनी नेमलेल्या जागी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ८०-ड अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले

[८] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८१ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[९] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ अनुसूचीअन्वये "संचालक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ख) ज्या कोणत्याही जमिनीत छेदण्यासाठी लायसन दिलेली अथवा न दिलेली, ताडी देणारी झाडे असतील अथवा ज्या कोणत्याही वखारीत, गोदामात, दुकानात किंवा जागेत कोणताही लायसन दिलेला कारखानदार किंवा विक्रेता कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी तयार करीत असेल, साठवीत असेल किंवा विकीत असेल त्या जमिनीवर, वखारीत, गोदामात, दुकानात किंवा जागेत दिवसा किंवा रात्री कोणत्याही वेळी प्रवेश करता येईल व त्याची तपासणी करता येईल. तसेच त्यास, अशा कोणत्याही पदार्थाच्या कोणत्याही साठ्याची तपासणी करता येईल, पारख करता येईल, मापता येईल व त्याचे वजन करता येईल किंवा अशा कोणत्याही साठ्याची तपासणी करविता येईल, पारख करविता येईल, माप किंवा वजन करविता येईल.

(२) या अधिनियमान्वये दिलेले लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करणारी व्यक्ती किंवा असे लायसन वगैरे धारण करणाऱ्या व्यक्तीच्या नोकरीत असलेली व्यक्ती किंवा तिच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने तिच्या वतीने काम करणारी व्यक्ती, या अधिनियमान्वये अपराध असलेले कोणतेही कृत्य मुद्दाम करीत आहे किंवा जे करण्याचे वगळल्यामुळे या अधिनियमान्वये अपराध होतो असे कोणतेही कृत्य करण्याचे वगळीत आहे असे पोट-कलम (१) मध्ये दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास आढळून येईल तर, त्यास ज्याच्या संबंधात असा अपराध करण्यात आला असेल असे कोणतेही मादक द्रव्य भांग, मोहाची फुले किंवा काकवी किंवा कोणतीही वस्तू किंवा पदार्थ तसेच, जो कोणताही दस्तऐवज किंवा इतर वस्तू या अधिनियमान्वये केलेल्या अपराधाचा पुरावा म्हणून सादर करता येईल असे त्यास सकारण वाटत असेल असा दस्तऐवज किंवा अशी वस्तू जप्त करता येईल. तसेच त्यास अशा गोष्टीसंबंधीचे प्रतिवृत्त, त्याला योग्य वाटेल ती उपाययोजना करण्यासाठी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठविता येईल.]

**१२३.** (१) [१][राज्य] शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्यास किंवा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास– अपराध्यास अटक करणे व निषिद्ध पदार्थ जप्त करणे.

(क) जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमान्वये अपराध केल्याबद्दल दोषी आहे असे त्यास सकारण वाटत असेल त्याला अधिपत्रावाचून अटक करता येईल;

(ख) या अधिनियमान्वये जप्त केले जाण्यास किंवा सरकारजमा केले जाण्यास पात्र आहे असे त्यास सकारण वाटत असेल असे कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी किंवा इतर वस्तू जप्त करता येईल व अटकावता येईल.

[२][आणि जो कोणताही दस्तऐवज किंवा इतर वस्तू या अधिनियमान्वये केलेल्या अपराधाचा पुरावा म्हणून सादर करता येईल असे त्यास सकारण वाटत असेल असा कोणताही दस्तऐवज किंवा अशी वस्तू जप्त करता येईल.]

(२) या कलमान्वये [१][राज्य] शासनाने प्राधिकृत केलेला जो कोणताही दारूबंदी अधिकारी पोट-कलम (१), खंड (क) अन्वये कोणत्याही व्यक्तीस अटक करील किंवा खंड (ख) अन्वये कोणतीही वस्तू जप्त करील व अटकावील त्याने अशा व्यक्तीला निष्कारण विलंब न लावता, अगदी नजीकचे पोलीस ठाणे स्वाधीन असणाऱ्या अधिकाऱ्याकडे पाठविल व त्याचप्रमाणे असा पदार्थही अशा अधिकाऱ्याकडे पाठविल.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये ''प्रांतिक'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८२ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

माहिती मिळविण्याचा अधिकार.

१२४. (१) [1][आयुक्त] किंवा जिल्हाधिकारी किंवा [2][राज्य] शासनाने याबाबत खास अधिकार दिलेला कोणताही दारूबंदी अधिकारी किंवा पोलीस अधिकारी यास, आदेशाद्वारे, कोणत्याही व्यक्तीला अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी, कोणत्याही मादक द्रव्यासंबंधी, भांगेसंबंधी, मोहाच्या फुलासंबंधी किंवा काकवीसंबंधी त्याच्या जवळ असलेली कोणतीही माहिती कोणत्याही विनिर्दिष्ट प्राधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस पुरविण्याविषयी फर्माविता येईल.

(२) कोणत्याही व्यक्तीने, पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशानुसार कोणतीही माहिती पुरविण्यात कसूर केली किंवा खोटी माहिती पुरविली तर, त्यास सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा होईल किंवा पाचशे रुपयापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

मादक द्रव्ये, वगैरे जप्त करण्याचा अधिकार.

१२५. [1][आयुक्त] जिल्हाधिकारी किंवा याबाबत योग्य रीतीने अधिकार दिलेला कोणताही दारूबंदी अधिकारी किंवा कोणताही पोलीस अधिकारी यांस,–

(क) या अधिनियमान्वये किंवा उत्पादन शुल्क महसुलासबंधीच्या त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये जे [3][जप्त केले जाण्यास व सरकार जमा होण्यास] पात्र आहे असे त्यास सकारण वाटत असेल असे कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी किंवा कोणतीही इतर वस्तू कोणत्याही खुल्या जागेत किंवा त्यांची ने आण करताना जप्त करता येईल, [4][आणि जो कोणताही दस्तऐवज किंवा इतर वस्तू या अधिनियमान्वये केलेल्या अपराधाचा पुरावा म्हणून सादर करता येईल असे त्यास सकारण वाटत असेल असा दस्तऐवज किंवा अशी वस्तू जप्त करण्याचा ] अधिकार असेल,

(ख) हा अधिनियम किंवा उत्पादन शुल्क महसुलासबंधीचा त्या त्या वेळी अमलात असलेला कोणताही इतर कायदा यांविरुद्ध अपराध केल्याबद्दल जी कोणतीही व्यक्ती दोषी आहे असे त्यास सकारण वाटत असेल तिला अटकावून ठेवता येईल व तिची झडती घेता येईल आणि अशा व्यक्तीच्या जवळ कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले, काकवी किंवा [5][ कोणतीही वस्तू ] असल्यास, तिला अटक करता येईल.

अधिपत्रावाचून अटक करणे.

१२६. [1][आयुक्त], जिल्हाधिकारी किंवा [2][राज्य] शासनाने याबाबत योग्य रीतीने अधिकार दिलेल्या कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्यास किंवा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, या अधिनियमान्वये असलेली त्याची कर्तव्ये पार पाडण्याच्या कामी अडथळा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा या अधिनियमान्वये कायदेशीररीत्या अभिरक्षेत अटकावून ठेवलेल्या व्यक्तीला, तो अशा अभिरक्षेतून पळून गेला असेल किंवा त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला असेल तेव्हा, दंडाधिकाऱ्याच्या आदेशावाचून व अधिपत्रावाचून अटक करता येईल.

---

[1] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३, अनुसूची अन्वये "संचालक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८३ (अ) अन्वये "जप्त केले जाण्यास" या मजकुराऐवजी, हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ८३ (अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ८३ (ब) अन्वये "कोणतीही इतर वस्तू" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**नाव सांगण्यास कसूर करणाऱ्या अपराध्यास अटक.**

१२७. (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीने [१][आयुक्त], जिल्हाधिकारी किंवा [२][राज्य] शासन ठरवील अशा दर्जाहून कमी नसलेल्या कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्यासमक्ष या अधिनियमाखालील अपराध केला किंवा त्याच्यावर असा अपराध केल्याचा आरोप ठेवण्यात आला आणि त्याने अशा अधिकाऱ्याने विचारले असता आपले नाव व राहण्याचे ठिकाण सांगण्याचे नाकारले किंवा जे नाव व राहण्याचे ठिकाण खोटे आहे असे मानण्यास त्या अधिकाऱ्यास कारण असेल असे नाव, राहण्याचे ठिकाण सांगितले तर, त्याचे नाव व राहण्याचे ठिकाण शोधून काढण्यासाठी अशा अधिकाऱ्यास त्याला अटक करता येईल.

(२) अशा व्यक्तीचे खरे नाव व राहण्याचे ठिकाण शोधून काढल्यानंतर, तिने ज्या ज्या वेळी फर्मावण्यात येईल त्या त्या वेळी [३][क्षेत्राधिकार असलेल्या दंडाधिकाऱ्यापुढे] हजर राहण्याबद्दल जामिनानिशी किंवा जामिनावाचून बंधपत्र लिहून दिले तर तिला सोडून देण्यात येईल :

परंतु, अशी व्यक्ती [४][भारताचा] रहिवासी नसेल तर, त्या बंधपत्रास [४][भारतात] राहणाऱ्या एक किंवा एकाहून अधिक व्यक्ती जामीन राहतील.

(३) अशा व्यक्तीस अटक केलेल्या चोवीस तासांच्या आत तिचे खरे नाव व राहण्याचे ठिकाण शोधून काढण्यात आले नाही किंवा तिने बंधपत्र लिहून देण्यात कसूर केली किंवा तसे फर्मावण्यात आले असता पुरेसे जामीन देण्यात कसूर केली तर, तिला क्षेत्राधिकार असलेल्या अगदी नजीकच्या दंडाधिकाऱ्याकडे पाठविल.

**अधिपत्रे काढणे.**

१२८. (१) [१][आयुक्त], जिल्हाधिकारी किंवा याबाबत योग्य रीतीने अधिकार दिलेला कोणताही दारूबंदी अधिकारी [५][किंवा बृहन्मुंबईत पोलीस उप-आयुक्त] किंवा विभाग स्वाधीन असलेला [६][सहायक पोलीस आयुक्त] किंवा दंडाधिकारी किंवा [७][पोलीस अधीक्षक] किंवा [२][राज्य] शासनाने याबाबत खास अधिकार दिलेला सहायक किंवा उप-पोलीस अधीक्षक यास पुढील कारणांसाठी अधिपत्र काढता येईल. ती कारणे अशी–

(क) हा अधिनियम किंवा उत्पादनशुल्क महसुलासंबंधीचा त्या त्या वेळी अमलात असलेला कोणताही इतर कायदा याखालील अपराध ज्या कोणत्याही व्यक्तीने केला आहे असे त्यास सकारण वाटत असेल तिला अटक करणे;

---

[१] सन १९७३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम ३, अनुसूची अन्वये " संचालक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१, कलम ३, दुसरी अनुसूची अन्वये " न्यायधीशापुढे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ४८ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, कलम ३, अनुसूची अन्वये " पोलीस अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमान्वये " जिल्हा पोलीस अधीक्षक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ख) ज्या कोणत्याही इमारतीत, वाहनात किंवा जागेत या अधिनियमाच्या तरतुदींविरुद्ध कोणतेही मादक द्रव्य, भांग [१][ * * * * ] मोहाची फुले किंवा काकवी तयार करण्यात, विकण्यात किंवा साठविण्यात येते किंवा ताडी काढण्यात येते अथवा या अधिनियमान्वये किंवा उत्पादनशुल्क महसुलासंबंधीच्या त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये जप्त केले जाण्यास किंवा सरकारजमा केले जाण्यास पात्र असलेले कोणतेही मादक द्रव्य, भांग, [२][मोहाची फुले, काकवी] किंवा इतर वस्तू ठेविली आहे किंवा लपविली आहे असे त्यास सकारण वाटत असेल त्या इमारतीची, वाहनाची किंवा जागेची दिवसा किंवा रात्री झडती घेणे [३][आणि अशा इमारतीत, वाहनात किंवा जागेत सापडलेले असे मादक द्रव्य, भांग [१][ * * * * ] मोहाची फुले, काकवी किंवा इतर वस्तू जप्त करणे.]

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेली सर्व अधिपत्रे, पोलीस अधिकाऱ्याकडून किंवा याबाबत योग्य रीतीने अधिकार दिलेल्या दारूबंदी अधिकाऱ्यांकडून किंवा अधिपत्र काढणाऱ्या अधिकाऱ्यास योग्य वाटेल तर कोणत्याही इतर व्यक्तीकडून फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ [†]च्या तरतुदीनुसार बजावण्यात येतील. १८९८ चा ५.

विवक्षित तरतुदी विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थांस लागू असणे.

[४][**१२८-क.** कलमे ८०, ९८, ९९, १०३ (१), १०४, १२०, १२१, १२२, १२३, १२४, १२५, १२८, १३५ व १३९ यांच्या तरतुदी या इतर कोणत्याही मादक पदार्थांस या अधिनियमान्वये ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे विप्रकृत मद्यासारयुक्त सिद्धपदार्थांस लागू होतील.]

दारूबंदी अधिकाऱ्यास अपराधांचा तपास करण्यासाठी अधिकार देता येईल.

**१२९.** (१) [५][राज्य] शासनास या अधिनियमाखालील अपराधांचा तपास करण्यासाठी कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्यास अधिकार देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यास, असा तपास करताना, दखली अपराधांचा तपास करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८[†]अन्वये पोलीस ठाणे स्वाधीन असलेल्या अधिकाऱ्यास जे अधिकार देण्यात आले आहेत ते अधिकार चालविता येतील. १८९८ चा ५.

(३) असा अधिकारी ज्याच्या हाताखाली असेल त्या कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्यास, तपास चालू असताना, तपासाचे काम स्वतःकडे घेण्याचा किंवा योग्य रीतीने अधिकार दिलेल्या कोणत्याही इतर दारूबंदी अधिकाऱ्यास ते काम चालविण्याविषयी निदेश देता येईल. तपासाचे काम चालविताना अधिकाऱ्यास, जणू तो त्या क्षेत्रासाठी किंवा उक्त अपराधाचा तपास करण्यासाठी नेमलेला दारूबंदी अधिकारी आहे असे समजून, पोट-कलमे (१) आणि (२) अन्वये असलेले अधिकार असतील.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८४ अन्वये "अफू" हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८४ अन्वये "किंवा अफू" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ४८ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८५ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[५] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[†] आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

(४) आरोपी व्यक्तीला दंडाधिकाऱ्याकडे पाठविणे न्याय्य होईल, इतका पुरेसा पुरावा नाही किंवा संशय घेण्यास वाजवी कारण नाही असे किंवा अटक केलेल्या व्यक्तीस ताकीद देऊन सोडण्यात यावे असे तपासाचे काम चालविणाऱ्या दारूबंदी अधिकाऱ्याचे मत झाले तर असा अधिकारी, अपराधाची दखल घेण्यास अधिकार दिलेल्या दंडाधिकाऱ्यापुढे अशा व्यक्तीने जर व जेव्हा तसे करण्यास फर्माविण्यात येईल तर व तेव्हा, हजर राहण्यासाठी, जामिनानिशी किंवा जामिनावाचून बंधपत्र लिहून दिल्यावर त्यास सोडून देईल; आणि असा अधिकारी प्रकरणाचे संपूर्ण प्रतिवृत्त आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठवील व अशा प्रतिवृत्तावर त्यास जो आदेश दिला जाईल त्याप्रमाणे वागेल.

(५) या कलमान्वये अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याचे अधिकार, [१][राज्य] शासनास योग्य वाटतील त्या इतर फेरफारांस व निर्बंधास अधीन असतील.

[२][**१२९-क.** (१) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाचा तपास करताना, याबाबत राज्य शासनाने योग्य रीतीने अधिकार दिलेल्या कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्यास किंवा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, एखाद्या व्यक्तीने मादक द्रव्य घेतले आहे आणि तिने मादक द्रव्य घेतले आहे हे सिद्ध करण्याच्या कारणाकरिता किंवा त्याबाबतचा पुरावा मिळविण्याकरिता त्या व्यक्तीची वैद्यकीय तपासणी होणे आवश्यक आहे किंवा त्याच्या रक्तातील मद्यार्काचे प्रमाण ठरविण्यासाठी त्याचे रक्त घेणे आवश्यक आहे असे समजण्यास वाजवी कारण असेल त्याबाबतीत अशा दारूबंदी अधिकाऱ्यास किंवा पोलीस अधिकाऱ्यास, अशा व्यक्तीची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी किंवा तिचे रक्त घेण्यासाठी त्यास (राज्य शासनाने याबाबत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये अधिकार दिलेल्या) नोंदलेल्या वैद्यक व्यवसायीपुढे हजर करता येईल आणि अशा नोंदलेल्या वैद्यक व्यवसायीस, अशा व्यक्तीने कोणतेही मादक द्रव्य घेतले आहे किंवा कसे याबाबत त्याने तपासणी केल्यावर त्यासंबंधीचे प्रमाणपत्र सादर करण्याची विनंती करता येईल आणि त्याने काढलेले रक्त शासनाचा रसायन परीक्षक किंवा सहायक रसायन परीक्षक यांच्याकडे किंवा त्याबाबत राज्य शासन नेमील अशा इतर अधिकाऱ्यांकडे पाठविण्याची विनंती करता येईल.

व्यक्तींची वैद्यकीय तपासणी, वगैरे करविण्यासाठी त्यांना भाग पाडण्याचा अधिकार.

(२) ज्याच्यापुढे अशा व्यक्तीस हजर करण्यात आले असेल असा नोंदलेला वैद्यक व्यवसायी अशा व्यक्तीची तपासणी करील व विहित केलेल्या रीतीने अशा व्यक्तीचे रक्त घेऊन ते पाठवील व ज्या अधिकाऱ्याने अशा व्यक्तीस हजर केले असेल त्यास, त्याने केलेल्या तपासणीचा निष्कर्ष असलेले प्रमाणपत्र विहित केलेल्या नमुन्यात देईल. शासनाचा रसायन परीक्षक किंवा सहायक रसायन परीक्षक किंवा पोट-कलम (१) अन्वये नेमलेला इतर अधिकारी, त्यांच्याकडे पाठविलेल्या रक्ताच्या तपासणीच्या निष्कर्षाबद्दल एक प्रमाणपत्र देईल; आणि त्यात विहित केलेल्या नमुन्यात मद्यर्काचे प्रमाण व आवश्यक किंवा तत्संबद्ध असा इतर तपशील नमूद करील.

(३) नोंदलेल्या वैद्यक व्यवसायीपुढे पोट-कलम (१) अन्वये हजर होण्यास कोणत्याही व्यक्तीने प्रतिकार केल्यास किंवा अशा अधिकाऱ्यापुढे हजर केल्यावर, त्याची शारीरिक तपासणी करण्यास किंवा त्याचे रक्त काढून घेण्यास प्रतिकार केल्यास त्यास हजर करण्यासाठी किंवा त्याची शारीरिक तपासणी करण्यासाठी किंवा रक्ताची परीक्षा करण्याकरिता त्याचे रक्त काढून घेण्यासाठी वाजवी रीतीने आवश्यक वाटतील असे सर्व उपाय योजणे हे कायदेशीर असेल.

(४) जर हजर केलेली व्यक्ती ही स्त्री असेल तर, अशी तपासणी आणि रक्त काढून घेणे या गोष्टी, राज्य शासनाने याबाबत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या अशा नोंदलेल्या स्त्री वैद्यक व्यवसायीच्या देखरेखीखाली करण्यात येतील व अशा स्त्रीची शारीरिक तपासणी करणे किंवा रक्त काढणे हे शिष्टाचारास धरून करण्यात येतील.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १६ अन्वये कलमे १२९-क व १२९-ख समाविष्ट करण्यात आली.

(ख) जो अपराध घडल्याचे त्यांना माहीत होईल किंवा जो घडण्याच्या बेतात आहे किंवा घडण्याचा संभव आहे असे त्यास सकारण वाटत असेल तर तो अपराध घडण्यास प्रतिबंध करण्याच्या कामी आपल्या अधिकारात असलेल्या सर्व वाजवी उपाययोजना अमलात आणण्यास;बांधलेले असतील.

जमीन मालकांनी व इतर व्यक्तींनी माहिती कळविणे.

१३५. ज्यामध्ये ताडी देणारी झाडे बेकायदेशीररीत्या छेदण्यात येत असतील, किंवा ज्यामध्ये कोणत्याही प्रकारची दारू किंवा मादक औषधी तयार करण्यात येत असेल आणि जीत भांगेची बेकायदेशीररीत्या लागवड करण्यात येऊन गोळा करण्यात येते अशी कोणतीही जमीन किंवा इमारत यांचा मालक असलेली किंवा भोगवटा करणारी प्रत्येक व्यक्ती किंवा अशा मालमत्तेच्या गावात राहणारा मालक आणि यथास्थिति, अशा जमिनीच्या, इमारतीच्या किंवा मालमत्तेच्या मालकाचा, भोगवटा करणाऱ्याचा किंवा जमीनदाराचा अभिकर्ता हा आणि ज्यात या अधिनियमाच्या तरतुदींविरुद्ध दारू किंवा मादक औषधी तयार करण्यात येते अशा जलयानाचा किंवा वाहनाचा प्रत्येक मालक हा वाजवीं सबबीच्या अभावी अशा प्रकारे झाडे छेदण्यात आल्याची किंवा दारू किंवा मादक औषधी तयार करण्यात आल्याची माहिती त्यास मिळाल्याबरोबर त्याबाबतची नोटीस दंडाधिकाऱ्यास किंवा दारुबंदी अधिकाऱ्यास किंवा पोलीस अधिकाऱ्यास देण्यास बांधलेला असेल.]

१३६. [अटक करण्याचा व व्यक्तीस अटकावून ठेवण्याचा किंवा तिच्या हालचालींवर किंवा कृत्यांवर निर्बंध घालण्याचा अधिकार]. हे कलम सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ५० अन्वये वगळण्यात आले.

---

## प्रकरण - दहा

## अपिले व पुनरीक्षण

अपिले.

१३७. (१) जिल्हाधिकारी किंवा [1][आयुक्त] याव्यतिरिक्त इतर कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्याने या अधिनियमान्वये दिलेल्या सर्व आदेशांवर, तक्रारीचा विषय असलेला आदेश दिल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत कोणत्याही वेळी जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करता येईल.

(२) जिल्हाधिकारी आणि [1][आयुक्त] यांनी दिलेल्या सर्व आदेशांवर अनुक्रमे [1][आयुक्ताकडे] व [2][राज्य] शासनाकडे, तक्रारीचा विषय असलेला आदेश दिल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत कोणत्याही वेळी अपील करता येईल :

परंतु, [1][आयुक्ताने] अपिलात दिलेल्या आदेशावर कोणतेही अपील करता येणार नाही.

(३) [2][राज्य] शासन याबाबत जे नियम करील ते, मागील तरतुदींना अधीन राहून, या कलमान्वये दिलेल्या अपिलास लागू होतील.

---

[1] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२ कलम ३, अनुसूचीअन्वये "संचालक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(४) आरोपी व्यक्तीला दंडाधिकाऱ्याकडे पाठविणे न्याय्य होईल, इतका पुरेसा पुरावा नाही किंवा संशय घेण्यास वाजवी कारण नाही असे किंवा अटक केलेल्या व्यक्तीस ताकीद देऊन सोडण्यात यावे असे तपासाचे काम चालविणाऱ्या दारूबंदी अधिकाऱ्याचे मत झाले तर असा अधिकारी, अपराधाची दखल घेण्यास अधिकार दिलेल्या दंडाधिकाऱ्यापुढे अशा व्यक्तीने जर व जेव्हा तसे करण्यास फर्माविण्यात येईल तर व तेव्हा, हजर राहण्यासाठी, जामिनानिशी किंवा जामिनावाचून बंधपत्र लिहून दिल्यावर त्यास सोडून देईल; आणि असा अधिकारी प्रकरणाचे संपूर्ण प्रतिवृत्त आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठवील व अशा प्रतिवृत्तावर त्यास जो आदेश दिला जाईल त्याप्रमाणे वागेल.

(५) या कलमान्वये अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याचे अधिकार, [1][राज्य] शासनास योग्य वाटतील त्या इतर फेरफारांस व निर्बंधास अधीन असतील.

व्यक्तींची वैद्यकीय तपासणी, वगैरे करविण्यासाठी त्यांना भाग पाडण्याचा अधिकार.

[2][**१२९-क.** (१) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाचा तपास करताना, याबाबत राज्य शासनाने योग्य रीतीने अधिकार दिलेल्या कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्यास किंवा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, एखाद्या व्यक्तीने मादक द्रव्य घेतले आहे आणि तिने मादक द्रव्य घेतले आहे हे सिद्ध करण्याच्या कारणाकरिता किंवा त्याबाबतचा पुरावा मिळविण्याकरिता त्या व्यक्तीची वैद्यकीय तपासणी होणे आवश्यक आहे किंवा त्याच्या रक्तातील मद्यार्काचे प्रमाण ठरविण्यासाठी त्याचे रक्त घेणे आवश्यक आहे असे समजण्यास वाजवी कारण असेल त्याबाबतीत अशा दारूबंदी अधिकाऱ्यास किंवा पोलीस अधिकाऱ्यास, अशा व्यक्तीची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी किंवा तिचे रक्त घेण्यासाठी त्यास (राज्य शासनाने याबाबत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये अधिकार दिलेल्या) नोंदलेल्या वैद्यक व्यवसायीपुढे हजर करता येईल आणि अशा नोंदलेल्या वैद्यक व्यवसायीस, अशा व्यक्तीने कोणतेही मादक द्रव्य घेतले आहे किंवा कसे याबाबत त्याने तपासणी केल्यावर त्यासंबंधीचे प्रमाणपत्र सादर करण्याची विनंती करता येईल आणि त्याने काढलेले रक्त शासनाचा रसायन परीक्षक किंवा सहायक रसायन परीक्षक यांच्याकडे किंवा त्याबाबत राज्य शासन नेमील अशा इतर अधिकाऱ्यांकडे पाठविण्याची विनंती करता येईल.

(२) ज्याच्यापुढे अशा व्यक्तीस हजर करण्यात आले असेल असा नोंदलेला वैद्यक व्यवसायी अशा व्यक्तीची तपासणी करील व विहित केलेल्या रीतीने अशा व्यक्तीचे रक्त घेऊन ते पाठवील व ज्या अधिकाऱ्याने अशा व्यक्तीस हजर केले असेल त्यास, त्याने केलेल्या तपासणीचा निष्कर्ष असलेले प्रमाणपत्र विहित केलेल्या नमुन्यात देईल. शासनाचा रसायन परीक्षक किंवा सहायक रसायन परीक्षक किंवा पोट-कलम (१) अन्वये नेमलेला इतर अधिकारी, त्यांच्याकडे पाठविलेल्या रक्ताच्या तपासणीच्या निष्कर्षाबद्दल एक प्रमाणपत्र देईल; आणि त्यात विहित केलेल्या नमुन्यात मद्यार्काचे प्रमाण व आवश्यक किंवा तत्संबद्ध असा इतर तपशील नमूद करील.

(३) नोंदलेल्या वैद्यक व्यवसायीपुढे पोट-कलम (१) अन्वये हजर होण्यास कोणत्याही व्यक्तीने प्रतिकार केल्यास किंवा अशा अधिकाऱ्यापुढे हजर केल्यावर, त्याची शारीरिक तपासणी करण्यास किंवा त्याचे रक्त काढून घेण्यास प्रतिकार केल्यास त्यास हजर करण्यासाठी किंवा त्याची शारीरिक तपासणी करण्यासाठी किंवा रक्ताची परीक्षा करण्याकरिता त्याचे रक्त काढून घेण्यासाठी वाजवी रीतीने आवश्यक वाटतील असे सर्व उपाय योजणे हे कायदेशीर असेल.

(४) जर हजर केलेली व्यक्ती ही स्त्री असेल तर, अशी तपासणी आणि रक्त काढून घेणे या गोष्टी, राज्य शासनाने याबाबत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या अशा नोंदलेल्या स्त्री वैद्यक व्यवसायीच्या देखरेखीखाली करण्यात येतील व अशा स्त्रीची शारीरिक तपासणी करणे किंवा रक्त काढणे हे शिष्टाचारास धरून करण्यात येतील.

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १६ अन्वये कलमे १२९-क व १२९-ख समाविष्ट करण्यात आली.

(५) पूर्वोक्तप्रमाणे नोंदलेल्या वैद्यक व्यवसायीपुढे हजर करण्यास किंवा या कलमाखालील शारीरिक तपासणीस किंवा पूर्वोक्तप्रमाणे रक्त काढून घेण्यास प्रतिकार करणे हा, भारतीय दंड संहितेच्या कलम १८६ अन्वयेचा अपराध आहे असे समजण्यात येईल. १८६० चा ४०

(६) या कलमाच्या तरतुदी अमलात आणण्याच्या कामी नोंदलेल्या वैद्यक व्यवसायीस किंवा पोट-कलम (१) अन्वये नेमलेल्या अधिकाऱ्यास द्यावयाच्या फीचा समावेश करून आलेला खर्च, राज्य विधानमंडळाने तरतूद केलेल्या पैशातून भागविण्यात येईल.

(७) कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्याने किंवा पोलीस अधिकाऱ्याने, त्रास देण्यासाठी व गैरवाजवी रीतीने पोट-कलम (१) अन्वये कारवाई केली तर त्यास, सिद्धापराध ठरविण्यात आले असता पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल.

(८) या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे, अपराध केल्याचा आरोप ज्या व्यक्तीवर ठेवला असेल तिने मादक द्रव्य घेतले आहे ही वस्तुस्थिती, या कलमाच्या तरतुदीनुसार असेल त्याव्यतिरिक्त इतर रीतीने सिद्ध करण्यास प्रतिबंध होतो असे समजले जाणार नाही.

नोंदविलेला वैद्यक व्यवसायी, इत्यादी यांनी दिलेले दस्तऐवज किंवा प्रतिवृत्ते, वगैरे पुरावा असणे.

**१२९-ख.** जो कोणताही दस्तऐवज हा,—

(क) कलम १२९-**क** अन्वये नोंदलेल्या वैद्यक व्यवसायीने किंवा शासनाच्या रसायन परीक्षकाने किंवा सहायक रसायन परीक्षकाने किंवा त्या कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये नेमलेल्या अधिकाऱ्याने त्याच्या सहीशिक्क्यानिशी दिलेले प्रमाणपत्र असेल; किंवा

(ख) राज्य शासनाने किंवा स्थानिक प्राधिकाऱ्याने चालविलेल्या कोणत्याही रुग्णालयातील किंवा दवाखान्यातील कोणत्याही नोंदलेल्या वैद्यकीय व्यवसायीने किंवा याबाबत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर नोंदलेल्या वैद्यक व्यवसायीने त्याने कोणत्याही व्यक्तीच्या तपासणीसंबंधीचे किंवा त्याच्याकडे तपासणीसाठी किंवा पृथःकरणासाठी किंवा प्रतिवृत्तासाठी योग्य रीतीने सादर केलेल्या गोष्टीसंबंधीचे त्याच्या सहीशिक्क्यानिशी दिलेले प्रतिवृत्त असेल ;

तर तो दस्तऐवज या अधिनियमान्वयेच्या कोणत्याही कारवाईत, त्या प्रमाणपत्रात किंवा, यथास्थिति, प्रतिवृत्तात नमूद केलेल्या वस्तुस्थितीचा पुरावा म्हणून वापरता येईल; परंतु फिर्यादीने किंवा आरोपी व्यक्तीने अर्ज केला तर, न्यायालयास, अशा व्यक्तीस आज्ञापत्र (समन्स) काढून बोलविण्याचा आणि प्रमाणपत्रातील किंवा यथास्थिति, प्रतिवृत्तातील वादविषयाबद्दल अशा व्यक्तीची तपासणी करता येईल आणि न्यायालय त्यास योग्य वाटेल तर अशा व्यक्तीस आज्ञापत्र (समन्स) काढून बोलावील आणि प्रमाणपत्रातील किंवा, यथास्थिति प्रतिवृत्तातील वादविषयाबद्दल अशा व्यक्तीची तपासणी करील.]

अटक केलेली व्यक्ती व जप्त केलेल्या वस्तू पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे पाठविणे.

**१३०.** या अधिनियमान्वये दारुबंदी अधिकाऱ्याने अटक केलेली प्रत्येक व्यक्ती व जप्त केलेली प्रत्येक वस्तू ही अगदी नजीकच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे पाठवील [१][किंवा या अपराधाची चौकशी करण्यास एखाद्या विशिष्ट बाबतीत [२][आयुक्ताने] अशा अधिकाऱ्यास निदेश दिल्यास, कलम १२९ अन्वये योग्यरीत्या अधिकार दिलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल.]

दारूबंदी अधिकाऱ्याने जामिनावर सोडणे.

**१३१.** (१) या अधिनियमाखालील अपराधाचा तपास करण्यासाठी अधिकार दिलेल्या कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्यास, या अधिनियमाखालील अपराध केल्याबद्दल अधिपत्रावाचून अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तीला फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८† च्या तरतुदींनुसार जामिनावर सोडून देता येईल. १८९८ चा ५.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८६ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३, अनुसूची अन्वये "संचालकाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

† आता फौजदारी प्रकीया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

(२) कलम १२६ अन्वये कोणत्याही व्यक्तीला अटक करण्यात येईल तेव्हा, या अधिनियमाखालील अपराधांचा तपास करण्यासाठी अधिकार दिलेल्या दारूबंदी अधिकाऱ्यास, तिला फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८* च्या तरतुदींनुसार जामीनावर सोडून देता येईल. १८९८ चा ५.

जप्त केलेल्या वस्तू.

**१३२.** [३][कलम १२९ अन्वये अधिकार चालवून एखाद्या दारूबंदी अधिकाऱ्याने किंवा पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याने या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये कोणत्याही वस्तू जप्त केल्या असतील], किंवा या अधिनियमाच्या तरतुदींनुसार कोणत्याही वस्तू त्याच्याकडे पाठविण्यात आल्या असतील तेव्हा, असा अधिकारी, आवश्यक वाटेल ती चौकशी केल्यानंतर,—

(क) अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या खटल्यात पुराव्यादाखल अशा वस्तूची आवश्यकता आहे असे दिसून आले तर, अशा व्यक्तीस ज्या दंडाधिकाऱ्याकडे पाठविले असेल किंवा ज्याच्यापुढे हजर राहण्याबद्दल जामीन घेतला असेल त्या दंडाधिकाऱ्याकडे ती वस्तू पाठवील ;

(ख) जर अशी वस्तू जप्त केली जाण्यास पात्र आहे परंतु वर सांगितल्याप्रमाणे पुरावा म्हणून त्याची आवश्यकता नाही असे दिसून आले तर, ती जप्त केल्याच्या तपशिलाच्या संपूर्ण प्रतिवृत्तासह जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील ;

(ग) जर कोणताही अपराध केल्याचे दिसून आले नाही तर, ज्या व्यक्तींच्या कब्जातून ती वस्तू घेतली असेल तिला ती परत करील.

[४][शासनाच्या अधिकाऱ्यांचे] व स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे सहाय्य करण्याचे कर्तव्य.

**१३३.** [२][शासनाचा] प्रत्येक अधिकारी व स्थानिक प्राधिकरणाचा प्रत्येक अधिकारी व सेवक हा, या अधिनियमाच्या तरतुदी पार पाडण्यासाठी, [३][कोणत्याही दारुबंदी अधिकाऱ्यास किंवा] पोलीस अधिकाऱ्यास किंवा याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस सहाय्य करण्यास कायदेशीररीत्या बांधलेला असेल.

अपराध झाल्याचे कळविणे.

[५][**१३४.** शासनाला उपयुक्त असलेला प्रत्येक ग्राम-अधिकारी किंवा ग्रामसेवक, राज्य शासनाचा प्रत्येक अधिकारी, आणि (केंद्र सरकारची संमती घेऊन) सीमा शुल्क विभागाचा आणि केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचा प्रत्येक अधिकारी व स्थानिक प्राधिकरणाचा प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी, आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अन्वये घटित केलेल्या ग्रामपंचायतीचा सरपंच हे,— १८५९ चा मुंबई ३.

(क) त्यांना कळेल असा या अधिनियमान्वये घडलेला कोणताही अपराध आणि या अधिनियमान्वये अपराध करण्याचा हेतू किंवा करण्याची तयारी याबद्दलची या अधिनियमाखाली कोणताही अपराध घडल्याची गोष्ट किंवा कोणत्याही अपराधाच्या इराद्याची किंवा तयारीची माहिती त्यांना समजली तर त्याबद्दलची खबर अगदी नजीकच्या पोलीस ठाण्याकडे किंवा याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा व्यक्तीकडे देण्यास;

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८७ अन्वये ''कलेक्टर किंवा संचालक या खेरीज करून एखाद्या इतर मद्यनिषेध अधिकाऱ्याने या अधिनियमाच्या उपबंधान्वये कोणताही पदार्थ धरला असेल'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये ''बादशहाचा'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ८८ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ८८ (ब) अन्वये ''सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांचे'', या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ८९ अन्वये मूळ कलमाऐवजी कलमे १३४ व १३५ ही दाखल करण्यात आली.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

(ख) जो अपराध घडल्याचे त्यांना माहीत होईल किंवा जो घडण्याच्या बेतात आहे किंवा घडण्याचा संभव आहे असे त्यास सकारण वाटत असेल तर तो अपराध घडण्यास प्रतिबंध करण्याच्या कामी आपल्या अधिकारात असलेल्या सर्व वाजवी उपाययोजना अमलात आणण्यास बांधलेले असतील.

जमीन मालकांनी व इतर व्यक्तींनी माहिती कळविणे.

१३५. ज्यामध्ये ताडी देणारी झाडे बेकायदेशीररीत्या छेदण्यात येत असतील, किंवा ज्यामध्ये कोणत्याही प्रकारची दारू किंवा मादक औषधी तयार करण्यात येत असेल आणि जीत भांगेची बेकायदेशीररीत्या लागवड करण्यात येऊन गोळा करण्यात येते अशी कोणतीही जमीन किंवा इमारत यांचा मालक असलेली किंवा भोगवटा करणारी प्रत्येक व्यक्ती किंवा अशा मालमत्तेच्या गावात राहणारा मालक आणि यथास्थिति, अशा जमिनीच्या, इमारतीच्या किंवा मालमत्तेच्या मालकाचा, भोगवटा करणाऱ्याचा किंवा जमीनदाराचा अभिकर्ता हा आणि ज्यात या अधिनियमाच्या तरतुदींविरुद्ध दारू किंवा मादक औषधी तयार करण्यात येते अशा जलयानाचा किंवा वाहनाचा प्रत्येक मालक हा वाजवी सबबीच्या अभावी अशा प्रकारे झाडे छेदण्यात आल्याची किंवा दारू किंवा मादक औषधी तयार करण्यात आल्याची माहिती त्यास मिळाल्याबरोबर त्याबाबतची नोटीस दंडाधिकाऱ्यास किंवा दारुबंदी अधिकाऱ्यास किंवा पोलीस अधिकाऱ्यास देण्यास बांधलेला असेल.]

१३६. [अटक करण्याचा व व्यक्तीस अटकावून ठेवण्याचा किंवा तिच्या हालचालींवर किंवा कृत्यांवर निर्बंध घालण्याचा अधिकार]. हे कलम सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ५० अन्वये वगळण्यात आले.

---

## प्रकरण - दहा

# अपिले व पुनरीक्षण

अपिले.

१३७. (१) जिल्हाधिकारी किंवा [१][आयुक्त] याव्यतिरिक्त इतर कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्याने या अधिनियमान्वये दिलेल्या सर्व आदेशांवर, तक्रारीचा विषय असलेला आदेश दिल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत कोणत्याही वेळी जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करता येईल.

(२) जिल्हाधिकारी आणि [१][आयुक्त] यांनी दिलेल्या सर्व आदेशांवर अनुक्रमे [१][आयुक्ताकडे] व [२][राज्य] शासनाकडे, तक्रारीचा विषय असलेला आदेश दिल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत कोणत्याही वेळी अपील करता येईल :

परंतु, [१][आयुक्ताने] अपिलात दिलेल्या आदेशावर कोणतेही अपील करता येणार नाही.

(३) [२][राज्य] शासन याबाबत जे नियम करील ते, मागील तरतुदींना अधीन राहून, या कलमान्वये दिलेल्या अपिलास लागू होतील.

---

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२ कलम ३, अनुसूचीअन्वये "संचालक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][१३८. या अधिनियमाखालील लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र देण्यासंबंधीचे किंवा नाकारण्यासंबंधीचे कामकाज धरून कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्यापुढे चालू असलेल्या कोणत्याही कामकाजाचे कागदपत्र हे, अशा कामकाजात दिलेल्या कोणत्याही आदेशाचा बिनचूकपणा, कायदेशीरपणा किंवा औचित्य याविषयी तसेच असे कामकाज व्यवस्थितपणे चालविण्यात येते किंवा कसे याविषयी स्वतःची खात्री करून घेण्यासाठी राज्य शासनास मागविता येतील व त्याची तपासणी करता येईल आणि असे कागदपत्रे मागविल्यानंतर, त्यांची तपासणी पूर्ण होईतोपर्यंत आदेश अंमलात आणण्यात येऊ नये असा निदेश देता येईल. तसेच, त्यास कागदपत्र तपासल्यानंतर असा आदेश रद्द करता येईल, फिरविता येईल, त्यात फेरफार करता येईल किंवा तो कायम करता येईल किंवा त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे इतर कोणताही आदेश देता येईल.] पुनरीक्षण.

---

## प्रकरण अकरा

### संकीर्ण.

१३९. [2][(१)] हा अधिनियम किंवा तदन्वये, केलेले नियम यात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, [3][राज्य] शासनास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे पुढील गोष्टी करता येतील, -- लायसन, वगैरे यांच्या बाबतीत [3][राज्य] शासनाचे सर्वसाधारण अधिकार.

(क) सबंध [3][राज्यात] किंवा कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही प्रकारची लायसने, परवाने, पास किंवा प्राधिकारपत्रे देण्यास मनाई करणे;

(ख) सबंध [4][राज्यात] किंवा कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या हद्दीत, [5][ते घालून देईल त्या शर्तीस अधीन राहून] लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र याअन्वये किंवा त्यावाचून, कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले, काकवी किंवा मादक द्रव्ये तयार करण्यासाठी जी वापरता येण्याचा संभव आहे असा कोणताही पदार्थ यांच्या आयातीचे, निर्यातीचे, परिवहनाचे, ते जवळ बाळगण्याचे, विकण्याचे, खरेदी करण्याचे, सेवन करण्याचे किंवा वापरण्याचे विनियमन करणे;

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९० अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९१ (१) अन्वये कलम १३९ यास पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[3] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ३ अन्वये "दुसऱ्या राज्यात घेतलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९१ (१) (अ) अन्वये "त्यास योग्य वाटेल त्या शर्तीस अधीन ठेवून व अशा मुदतीसाठी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ (ग) ते घालून देईल त्या शर्तीस अधीन राहून कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेस किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तीस किंवा संस्थांना या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी अथवा तदन्वये केलेले सर्व किंवा कोणतेही नियम, विनियम किंवा दिलेले सर्व किंवा कोणतेही आदेश किंवा तदन्वये देण्यात आलेले लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र यातील सर्व किंवा कोणत्याही शर्ती पाळण्यापासून सूट देणे ;

(घ) ते घालून देईल त्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदीपासून किंवा तदन्वये केलेले सर्व किंवा कोणतेही नियम, विनियम किंवा दिलेले सर्व किंवा कोणतेही आदेश यांतून, कोणतेही मादक द्रव्य, किंवा मादकद्रव्याचा वर्ग , विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ, भांग, मोहाची फुले किंवा काकवी यांना सूट देणे ;

(घ-१) ते घालून देईल त्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमान्वये देण्यात आलेला कोणताही विशेषाधिकार, लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र यांच्या बाबतीतील फी किंवा ताडी देणारी झाडे यांवरील कोणतेही शुल्क किंवा कोणत्याही व्यक्तीने, संस्थेने किंवा व्यक्तींच्या किंवा संस्थांच्या वर्गाने कोणताही मादक पदार्थ, भांग, मोहाची फुले किंवा काकवी यावरील या अधिनियमान्वये द्यावयाचे कोणतेही उत्पादन शुल्क किंवा प्रतिशुल्क किंवा फी माफ करणे किंवा परत करणे किंवा असे शुल्क किंवा द्यावयाची फी, यांतून कोणतीही व्यक्ती किंवा कोणतीही संस्था किंवा कोणत्याही व्यक्तींचा किंवा संस्थांचा वर्ग यांस अंशतः किंवा पूर्णपणे सूट देणे;]

(ङ) कोणत्याही क्षेत्रात किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तीस द्यावयाच्या कोणत्याही प्रकारच्या लायसनची, परवान्याची, पासाची किंवा प्राधिकारपत्रांची कमाल संख्या विहित करणे;

(च) कोणत्याही क्षेत्रात, अशा आदेशांत विनिर्दिष्ट करण्यात आलेले कोणतेही मादक द्रव्य, [२][विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ,] भांग, मोहाची फुले, अगर काकवी ज्या जागी विकता येईल त्या जागांची संख्या, कोणत्याही क्षेत्रात अशा जागांचे ठिकाण, ज्या दिवशी व ज्या वेळांच्या दरम्यान अशा जागा उघड्या ठेवता येतील किंवा उघड्या ठेवता येणार नाहीत ते दिवस व त्या वेळा, ज्या जागांच्या संबंधात विक्रीसाठी लायसन देता येईल त्या जागांची संख्या आणि [३][राज्य शासनाच्या विभागाकडून] ज्या जागांची व्यवस्था ठेवली जाईल त्या जागांची संख्या, ही विहित करणे;

(छ) अशा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारचे कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र [४][राज्य] शासनाच्या पूर्व मंजुरीवाचून देण्यात येऊ नये असा निदेश देणे अथवा असे लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र या अधिनियमाच्या ज्या कोणत्याही इतर तरतुदींअन्वये देता येईल त्या तरतुदींत किंवा ज्या शर्तीस अधीन राहून असे लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र देता येईल त्या शर्तीमध्ये कोणताही जादा मजकूर दाखल करण्याविषयी किंवा कोणताही फेरफार करण्याविषयी निदेश देणे ;

(ज) कोणत्याही क्षेत्रात किंवा कोणत्याही जागी कोणतेही मादक द्रव्य, [५][विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ,] भांग, मोहाची फुले, किंवा काकवी जास्तीत जास्त किती विकता येईल ते कमाल परिमाण विहित करणे;

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९१ (१) (ब) अन्वये मूळ खंड (ग) व (घ) ऐवजी खंड (ग) (घ) व (घ-१) दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ९१ (१) (क), (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ९१ (१) (क) (दोन) अन्वये " उत्पादन शुल्क विभागाकडून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९१ (१) (ड) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१] [ (झ) जी छेदण्यासाठी किंवा ज्यापासून ताडी काढण्यासाठी लायसन किंवा लायसने देता येतील अशा ताडी देणाऱ्या झाडांची कमाल संख्या, कोणत्याही जागेच्या किंवा क्षेत्राच्या संबंधात विहित करणे ;]

[२] [ (ञ) या अधिनियमान्वये कोणतेही मादकद्रव्य, विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ, भांग, मोहाची फुले किंवा काकवी विकण्यासाठी प्राधिकृत केलेले कोणतेही दुकान किंवा कोणतीही दुकाने यांचा विनियोग करण्यासाठी अनुसरावयाची व लायसन किंवा लायसने देण्यापूर्वी अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे ;]

(ट) लायसन देण्यापूर्वी लिलाव करण्यात यावेत, निविदा मागविण्यात याव्यात किंवा देऊ केलेल्या किंमतीचा विचार करण्यात यावा आणि ज्या व्यक्तीच्या लिलावातील किंमती, मूल्य, निवेदने, किंवा देऊ केलेल्या रकमा [३] [ विहित करण्यात येतील त्या शर्तीस अधीन राहून ] जिल्हाधिकाऱ्याकडून स्वीकारण्यात येतील त्यास लायसन देण्यात यावीत असा निदेश देणे ;

(ठ) ज्या व्यक्तीस किंवा ज्या वर्गातील व्यक्तीस लायसन [४] [ देण्यात यावी किंवा देण्यात येऊ नयेत ] त्या व्यक्ती किंवा तो वर्ग विनिर्दिष्ट करणे आणि ज्याबाबतीत लिलाव करण्यात येईल त्याबाबतीत लिलावाचे वेळी ज्या व्यक्तीस किंवा वर्गातील व्यक्तीस लिलावात किंमत बोलण्याची परवानगी देण्यात यावी किंवा देण्यात येऊ नये त्या व्यक्ती किंवा वर्ग विनिर्दिष्ट करणे ;

(ड) अशा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारची लायसने त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीस देण्यात यावीत असा निदेश देणे ; आणि

(ढ) [५] [ राज्य ] शासनास योग्य वाटेल त्याप्रमाणे या अधिनियमान्वये लायसन, परवाने, पास किंवा प्राधिकारपत्रे देण्यासंबंधीच्या कोणत्याही गोष्टीबाबत किंवा त्याच्याशी अन्य प्रकारे संबंध असलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत असे इतर अनुदेश देणे.

[६] [ (२) पोट-कलम (१) अन्वयेचा आदेश सामान्य स्वरुपाचा असेल किंवा त्यामुळे व्यक्तींच्या वर्गास बाध येत असेल तर तो राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल.]

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९१ (१) (ई) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (झ) दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ९१ (१) (फ) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ९१ (१) (ग) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ९१ (१) (ह) अन्वये " लायसने देण्यात येऊ नयेत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९१ (२) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

सार्वजनिक जागी मादक द्रव्ये, वगैरे यांचे सेवन करणे किंवा ती वापरणे यांस मनाई करण्याचा, त्यांचे विनियमन करण्याचा किंवा त्यावर नियंत्रण ठेवण्याचा [१] [ राज्य ] शासनाचा अधिकार.

**१४०.** [१] [ राज्य ] शासनास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही सार्वजनिक जागेत कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग सेवन करणे किंवा वापरणे यांस अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून मनाई करता येईल, त्याचे विनियमन करता येईल किंवा त्यावर नियंत्रण ठेवता येईल.

जादा पोलिसांची नेमणूक करणे.

**१४१.** (१) [२] [ कलमे ६५, ६६, ६६-**क**, ६७, ६७-१ **क**, ६७-ग, ६८, ६९ व ७०,] या खालील कोणताही अपराध करण्याशी किंवा तो करण्यास प्रोत्साहन देण्याशी कोणत्याही क्षेत्रातील रहिवाशांचा संबंध आहे अशी [१] [राज्य] शासनाची खात्री झाल्यास, त्यास राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारा योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत [३] [ त्या क्षेत्रात ] जादा पोलीस नेमण्यात यावेत असा निदेश देता येईल.

(२) अशा जादा पोलिसांचा खर्च [१] [राज्य ] शासनाने तसा निदेश दिल्यास, संपूर्ण किंवा अंशतः खाली नमूद केलेल्या व्यक्तीवर कर बसवून किंवा अशा व्यक्तीच्या मालमत्तेवर पट्टी आकारून किंवा असा कर किंवा पट्टी ही दोन्ही बसवून व आकारून बसविण्यात येईल ; असा कर किंवा पट्टी,–

(क) अशी अधिसूचना ज्या स्थानिक क्षेत्रांस लागू आहे त्या क्षेत्रांतील रहिवासी असलेल्या सामान्यतः सर्व व्यक्तींवर ; अथवा

(ख) विशेषतः अशा व्यक्तींच्या विशिष्ट गटावर किंवा गटांवर अथवा वर्गावर किंवा वर्गांवर ; आकारण्यात येईल ; आणि [१] [ राज्य ] शासनास असा कर किंवा अशी पट्टी ज्या प्रमाणात आकारली जाईल ते प्रमाण ठरविण्याविषयी निदेश देता येईल.

**स्पष्टीकरण.**– या कलमाच्या प्रयोजनाकरिता " रहिवासी " या मध्ये, अशा क्षेत्रात ज्या व्यक्ती स्वतः किंवा आपल्या अभिकर्त्यामार्फत किंवा नोकरांमार्फत जमिनीचा किंवा इतर स्थावर मालमत्तेचा भोगवटा करतात किंवा ती धारण करतात त्या व्यक्तींचा समावेश होतो. तसेच तीत, जे जमीन मालक अशा क्षेत्रात प्रत्यक्ष रयतेकडून किंवा जमिनीचा भोगवटा करणाऱ्या व्यक्तीकडून स्वतः किंवा आपल्या अभिकर्त्यामार्फत किंवा नोकरांमार्फत खंड किंवा महसूल वसूल करतात त्यांचा समावेश होतो–मग असे जमीन मालक अशा क्षेत्रात प्रत्यक्ष राहत नसेल तरी हरकत नाही.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९२ (अ) अन्वये " ६५ ते ६९ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ९२ (ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) [१] [ राज्य ] शासनास असा कर किंवा पट्टी देण्याची मुदत, अशा जादा पोलीसांची ज्या मुदतीकरिता प्रत्यक्ष नेमणूक झाली असेल त्या मुदतीपलिकडे कोणत्याही बाबतीत पाच वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीपर्यंत वाढविता येईल व [१] [ राज्य ] शासनाने तसे करणे हे कायदेशीर असेल.

१९५१ चा मुंबई २२. [२] [(४) मुंबई पोलीस अधिनियम, १९५१, कलम ५०, पोट-कलम (४) ते (७) याच्या तरतुदी योग्य त्या फेरफारासह असा कर किंवा पट्टी वसूल करण्याच्या बाबतीत लागू होतील.]

[३] [१४२. (१) ज्या कोणत्याही जागेत कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग विकली जाते ती जागा सार्वजनिक शांततेसाठी बंद करण्यात यावी, असे जिल्हाधिकाऱ्याचे मत असल्यास, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळी किंवा अशा मुदतीपर्यंत असा मादक द्रव्य किंवा भांग विकणाऱ्या लायसनदारांना लेखी आदेश देऊन जिल्हाधिकाऱ्याने अशा जागा बंद करण्यास, त्यास भाग पाडणे हे कायदेशीर असेल. जेथे मादक द्रव्य किंवा भांग विकली जाते ती ठिकाणे काही बाबतीत बंद करण्याचे जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार.

(२) जर दंगा किंवा बेकायदेशीर जमाव जमण्याची तात्कालिक भीती असेल किंवा असा दंगा किंवा असा बेकायदेशीर जमाव जमला असेल तर उपस्थित असलेल्या कार्यकारी दंडाधिकाऱ्यास किंवा पोलीस अधिकाऱ्यास, अशी जागा बंद करण्यात यावी आणि त्यास योग्य वाटेल त्या मुदतीपर्यंत ती बंद ठेवण्यात यावी असा निदेश देता येईल व त्याने तसे करणे हे कायदेशीर असेल आणि कार्यकारी दंडाधिकारी किंवा पोलीस अधिकारी यांच्या अनुपस्थितीत, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती स्वतः ती जागा बंद करील.

(३) या कलमान्वये देण्यात आलेला आदेश अंतिम असेल.]

**१४३.** (१) [१] [ राज्य ] शासनास, या अधिनियमाच्या तरतुदी किंवा उत्पादनशुल्क महसुलासंबंधीचा त्या त्या वेळी अमलात असलेला कोणताही इतर कायदा अंमलात आणण्याकरिता नियम करता येतील. [१] [ राज्य ] शासनाचा नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषकरून व वरील तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, [१] [ राज्य ] शासनास पुढील गोष्टींसाठी नियम करता येतील,—

(क) [४] [ आयुक्त ], जिल्हाधिकारी किंवा कोणताही इतर दारूबंदी अधिकारी यांना कोणताही अधिकार सोपवून देणे यांचे विनियमन करणे;

(ख) कोणतेही मादक द्रव्य, [५] [ विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ] किंवा भांग, मोहाची फुले किंवा काकवी यांची आयात करणे, निर्यात करणे, परिवहन करणे, [६][ती गोळा करणे], तिची विक्री करणे, खरेदी करणे, [५][ बाटलीत भरणे ], तिचे सेवन करणे, ती वापरणे किंवा जवळ बाळगणे यांचे विनियमन करणे ;

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम ३ अन्वये पोट-कलमे (४) व (५) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९३ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[४] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ याच्या अनुसूचीअन्वये " संचालक " या मजकुरऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९४ (१) (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ५१ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ग) कोणतेही मादक द्रव्य [1] [ किंवा विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ ] तयार करण्याचे यांचे विनियमन करणे ;

(घ) भांगेची लागवड करणे व ती गोळा करणे यांचे विनियमन करणे ;

(ङ) ताडी देणारी झाडे छेदणे व त्यापासून ताडी काढणे यांचे विनियमन करणे ;

(च) [2][ खंड (ख).] मध्ये नमूद केलेल्या वरील पदार्थांपैकी कोणत्याही पदार्थाची आयात करणे, निर्यात करणे, परिवहन करणे, [3] [ ते गोळा करणे, त्यांची विक्री करणे, ते खरेदी करणे, ] जवळ बाळगणे, तयार करणे, [4] [बाटलीत भरणे ], त्याचे सेवन करणे, ते वापरणे किंवा त्यांची लागवड करणे यासाठी [2] [आणि खंड (ङ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गोष्टीसाठी, ] लायसने, परवाने, पास किंवा प्राधिकारपत्रे देणे, तहकूब करणे, किंवा रद्द करणे यांचे विनियमन करणे ;

(छ) खंड (ख) मध्ये नमूद केलेल्या वरील पदार्थांपैकी कोणत्याही पदार्थाची घाऊक किंवा किरकोळ विक्री करण्याकरिता ज्या मुदतीसाठी व ज्या विभागासाठी लायसने देता येतील त्या मुदती व ते विभाग यांबाबत नियमन करणे ;

(ज) कोणत्याही व्यक्तीस किंवा कोणत्याही विभागात खंड (ख) मध्ये नमूद केलेल्या वरील पदार्थांपैकी कोणत्याही पदार्थाची विक्री करण्यासाठी, सेवन करण्यासाठी किंवा वापर करण्यासाठी, कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र देण्यापूर्वी लोकमत विचारात घेण्यासाठी तरतूद करणे आणि अनुसरावयाची कार्यपद्धती व ज्या गोष्टीसंबंधी खात्री करून घ्यावयाची त्या गोष्टी विहित करणे ;

[5] [ (ज-१) जे निर्बंध घालून व ज्या शर्तीवर कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र देता येईल ते निर्बंध व त्या शर्ती विहित करणे ; यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :–

(एक) उपद्रवकारक किंवा आक्षेपार्ह म्हणून समजण्यात येणाऱ्या कोणत्याही पदार्थाचे कोणत्याही मादक द्रव्याबरोबर अवमिश्रण करण्यास प्रतिबंध करणे ;

(दोन) ज्या तीव्रतेपेक्षा, किंमतीपेक्षा किंवा परिमाणापेक्षा अधिक किंवा कमी तीव्रता, किंमत किंवा परिमाण असलेले कोणतेही मादक द्रव्य किंवा मोहाची फुले विकणार नाही किंवा त्यांचा पुरवठा करणार नाही. ती तीव्रता, किंमत किंवा परिमाण ठरविणे आणि ज्या परिमाणापेक्षा अधिक विप्रकृत मद्यसार विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ किंवा काकवी जवळ बाळगणार नाही, ते परिमाण ठरविणे आणि कोणतेही मादक द्रव्य, विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ, मोहाची फुले किंवा काकवी ज्या दर्जाची असली पाहिजे ते प्रमाण विहित करणे ;

(तीन) रोख पैसे घेतल्यावाचून कोणत्याही मादक द्रव्याची, विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थाची किंवा भांगेची विक्री करण्यास मनाई करणे ;

(चार) कोणतेही लायसन दिलेली जागा ज्या दिवशी व ज्या वेळांच्या दरम्यान उघडी ठेवता येईल किंवा उघडी ठेवता येणार नाही ते दिवस व त्या वेळा विहित करणे आणि विशेष प्रसंगी अशा जागा बंद करण्यासाठी तरतूद करणे ;

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९४ (१) (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[2] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ५१ (२) (ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५१ (२) (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९४ (१) (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९४ (१) (ड) अन्वये खंड (ज-१) व (ज-२) समाविष्ट करण्यात आले.

(पाच) ज्या जागेत कोणतेही मादक द्रव्य विकता येईल त्या जागेचे स्वरूप व अशा जागी लावावयाच्या नोटिसा विहित करणे ;

(सहा) लायसन किंवा परवाना धारण करणाऱ्या व्यक्तींनी ठेवावयाचे हिशेब व सादर करावयाची पत्रके विहित करणे ;

(सात) लायसनच्या हस्तांतरणाचे विनियमन करणे किंवा अशा हस्तांरणास मनाई करणे;

(आठ) कोणत्याही मादक द्रव्याच्या, भांगेच्या, मोहाच्या फुलांच्या किंवा काकवीच्या किंवा ज्या कोणत्याही पदार्थाची विक्री किंवा खरेदी ही, कलम १३९, पोट-कलम (१), खंड (ख) द्वारे विनियमित करण्यात आली आहे त्या कोणत्याही पदार्थाच्या विक्रीबाबत असलेल्या नोंदवहीत खरेदीदारांची नावे व पत्ते लिहिणे व त्यांच्या सह्या घेणे ;

(ज-२) (एक) विशिष्ट क्षेत्रात किंवा विशिष्ट कारणांकरिता ज्या प्रक्रिया करून मद्यसार विप्रकृत करता येईल त्या प्रक्रिया जाहीर करणे ;

(दोन) अभिकर्त्यामार्फत किंवा राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांच्या पर्यवेक्षणाखाली असे मद्यसार विप्रकृत करविणे, आणि अशा पर्यवेक्षणासाठीचा खर्च ठरविणे ;

(तीन) असे मद्यसार विप्रकृत केले आहे किंवा कसे हे निश्चित करणे ;]

(झ) लायसन धारण करणाऱ्या व्यक्तीने आपल्या धंद्यात सहाय्य करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या वर्गास कोणत्याही नात्याने कामावर लावण्यास मनाई करणे व त्याचे विनियमन करणे ;

(ञ) नारळीच्या, शिंदीच्या, खजुरीच्या किंवा कोणत्याही प्रकारच्या ताडांच्या झाडापासून काढलेल्या रसावर तो आंबू नये म्हणून ज्या रीतीने क्रिया करावयाची ती रीत विहित करणे ;

[१] [(ट) ज्यांना कोणतेही मादक द्रव्य, विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ, भांग, मोहाची फुले किंवा काकवी विकण्यात येईल किंवा विकण्यात येणार नाही किंवा ज्यांना यांपैकी एखादा पदार्थ विकण्याची, खरेदी करण्याची किंवा उपयोग करण्याची परवानगी देण्यात येईल किंवा देण्यात येणार नाही अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचे वर्ग विहित करणे ;]

(ठ) कोणत्याही लायसन दिलेल्या जागेत किंवा जागेजवळ दारू पिऊन धुंद होण्यास, जुगार खेळण्यास किंवा गैरशिस्त वर्तन करण्यास किंवा अशा जागी वाईट चालीचे लोक जमण्यास व ते तेथे राहू देण्यास प्रतिबंध करणे ;

[२] [(ठ-१) या अधिनियमान्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही अधिसूचनेत विहित केलेल्या व्यतिरिक्त इतर प्रकारच्या दारूची किंवा इतर प्रकारच्या मादक औषधिद्रव्यांची किंवा अफूची ज्याप्रसंगी किरकोळीने मोठ्या प्रमाणात विक्री करण्यासाठी विशेष आदेश देता येतील ते प्रसंग आणि ज्या शर्तीवर अशी विक्री करता येईल त्या शर्ती विहित करणे ;

(ठ-२) कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीने अशा लायसनातील, परवान्यातील, पासातील किंवा प्राधिकारपत्रातील शर्ती पार पाडण्याकरिता ठेवावयाच्या तारणांची रक्कम विहित करणे ;

(ठ-३) लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्रे धारण करणाऱ्यांनी विक्री करणे, खरेदी करणे, जवळ बाळगणे, सेवन करणे किंवा वापरणे यासंबंधी नोंदवह्या ठेवणे आणि अशा नोंदवह्यात तपशील दाखल करणे याबाबत तरतूद करणे ;]

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९४ (१) (इ) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ९४ (१) (फ) अन्वये खंड (ठ-१), (ठ-२) व (ठ-३) दाखल करण्यात आले.

१[(ड) या अधिनियमाखालील अपराधासंबंधी चौकशी व तपास करणारे अधिकारी व माहिती देणाऱ्या व सहाय्य करणाऱ्या व्यक्ती यांना बक्षिसे व खर्च देणे आणि या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधांचा ज्या व्यक्तींवर आरोप ठेवण्यात आला असेल व ज्यास दोषमुक्त करण्यात आले असेल, त्यास नुकसान भरपाई देणे याबाबींचे विनियमन करणे ;]

(ढ) ज्याद्वारे कोणतेही मादक द्रव्य २ [किंवा] भांग वापरण्याची ३ [ * * *] विनंती करण्यात येते किंवा असे द्रव्य किंवा भांग देऊ करण्यात येते अथवा ज्याद्वारे, कोणत्याही व्यक्तीस किंवा कोणत्याही वर्गातील व्यक्तीस किंवा सर्वसामान्य लोकांस या अधिनियमाखालील अपराध करण्यास किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमांची तरतूद किंवा तदन्वये दिलेला कोणताही आदेश किंवा तदन्वये दिलेले कोणतेही लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र यांच्या शर्ती यांचा भंग करण्यास किंवा त्या टाळण्यास हेतूपूर्वक उत्तेजन किंवा चिथावणी देण्यात येत आहे अशी कोणतीही जाहिरात किंवा इतर मजकूर छापणे, प्रसिद्ध करणे अथवा अशी जाहिरात अन्यथा प्रदर्शित करणे किंवा वाटणे अथवा असा मजकूर प्रदर्शित करणे किंवा प्रस्तुत करणे यांचे विनियमन करणे;

(ण) ज्याद्वारे ४[ * * * * * ] कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग ४[* * * *], वापरण्याची विनंती करण्यात येत आहे किंवा असे द्रव्य किंवा भांग देऊ करण्यात येत आहे अशी कोणतीही जाहिरात किंवा मजकूर असलेले ५[६[राज्याबाहेर] छापलेले व प्रसिद्ध केलेले] वर्तमानपत्र, वृत्तपत्र, पुस्तक, पत्रक, पुस्तिका किंवा इतर प्रकाशन यांचा प्रसार, वाटप किंवा विक्री यांचे ६ [राज्यात] विनियमन करणे;

७[(त) मादक द्रव्य, विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ, भांग, मोहाची फुले किंवा काकवी किंवा कलम १३९ चे पोट-कलम (१), खंड (ख) अन्वये ज्यांची खरेदी विनियमित करण्यात आली आहे अशी कोणतीही वस्तू खरेदी करणाऱ्या व्यक्तींवर निर्बंध व शर्ती घालणे; यात त्याने खरेदी केलेल्या या कोणत्याही वस्तुसंबंधीच्या नोंदीत त्यांना सही करण्यास भाग पाडण्याबाबत तरतुदीचा समावेश होतो;]

---

१ सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९४ (१) (ग) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

२ सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ५१ (३) (ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ५१ (३) (अ) अन्वये "तारीफ करण्यात येते" हा मजकूर वगळण्यात आला.

४ सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ५१ (४) (ब) व ५१ (४) (क) अन्वये "वापरण्याचे विहित करण्यात किंवा तारीफ करण्यात येते" हा मजकूर वगळण्यात आला.

५ वरील अधिनियमाच्या कलम ५१ (४) (अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ३ अन्वये " दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्याबाहेर" व "दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात" या मजकुराऐवजी अनुक्रमे हा मजकूर दाखल करण्यात आला.

७सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९४ (१) (ह) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[1][ * * * * * ]

(द) काकवीचे नमुने घेण्याचे विनियमन करणे;

[2][ (द-१) समित्या, मंडळे व वैद्यकीय मंडळे यांची रचना किंवा त्यांची नामिका व त्यांची कार्यपद्धती विहित करणे;]

(ध) दारूबंदी अधिकारी, [3][मंडळे, समित्या ] व [4][वैद्यक मंडळे व त्यांच्या नामिका] यांचे अधिकार, कामे व कर्तव्ये विहित करणे तसेच [4][मंडळाच्या, समित्यांच्या] व [3][वैद्यक मंडळाच्या व त्याच्या नामिकांच्या] सदस्यास द्यावयाची फी व भत्ते विहित करणे;

[5][(न) तज्ञ मंडळाच्या कामासंबंधी कार्यपद्धती विहित करणे;]

[6][(न-१) कलम २९ अन्वये थेट वाहतुकीच्या शर्ती विहित करणे;]

(प) या अधिनियमान्वये दिलेला कोणताही विशेष अधिकार, लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र यासंबंधी द्यावयाची फी [7][ (भाडे किंवा मोबदला यांसह) ] विहित करणे;

[8][(पप) कलम ६६, पोट-कलम (३), खंड (ख) अन्वये इतर व्यक्ती, इतर परिसंस्था किंवा परिस्थिती विहित करणे;]

(फ) कलम १०७-**क** अन्वये ज्या मुदतीच्या आत व ज्या नमुन्याप्रमाणे पत्रक सादर केले पाहिजे ती मुदत व तो नमुना आणि ज्या नमुन्याप्रमाणे हिशेब ठेवले पाहिजेत तो नमुना विहित करणे;]

[9][(ब) रक्त काढून घेण्याची व पाठविण्याची पद्धती विहित करणे आणि प्रमाणपत्रांचा नमुना व त्यात कलम १२९-**क**, पोट-कलम (२) अन्वये नमूद करणे आवश्यक असलेला इतर तपशील विहित करणे.]

(३) त्या कलमान्वये नियम करण्याचा अधिकार पूर्वप्रसिद्धीच्या अधीन असेल :

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९४ (१) (आय) अन्वये खंड (थ) वगळण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ९४ (१) (ज) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ९४ (१) (के) अन्वये "समित्या" व "समित्यांच्या" या मजकुराऐवजी अनुक्रमे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या त्याच कलमान्वये "वैद्यकीय मंड़ळे" व "वैद्यकीय मंडळाच्या" यांच्याऐवजी अनुक्रमे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ५१ (५) अन्वये मूळ खंड (न) ऐवजी खंड (न) ते (फ) दाखल करण्यात आले.

[6] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९४ (१) (ल) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[7] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[8] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १७ (अ) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[9] वरील अधिनियमाच्या कलम १७ (ब) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

(क) अशी कोणतीही कारवाई करण्यापूर्वी उपरोक्त चार महिन्यांच्या अवधीत वादीस, या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये जी कोणतीही अपिले सादर करता आली असती ती अपिले त्याने सादर केली होती असे त्याने सिद्ध करून दाखविले नाही तर, किंवा.

(ख) नुकसानभरपाईसाठी केलेल्या कारवाईच्या बाबतीत, कारवाई दाखल करण्यापूर्वीच भरपाईची पुरेशी रक्कम दिलेली असेल तर किंवा कारवाई दाखल केल्यानंतर प्रतिवादीने किंवा त्याच्या वतीने न्यायालयात खर्चासह पुरेशी रक्कम भरली असेल तर.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ †, कलम १९७ च्या तरतुदींना अधीन राहून, कोणताही दारूबंदी अधिकारी, पोलीस अधिकारी किंवा इतर अधिकारी किंवा या अधिनियमान्वये अधिकार वापरण्यास किंवा कामे पार पाडण्यास प्राधिकृत करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती यांनी, या अधिनियमाखालील कोणत्याही गोष्टींच्या संबंधात, या अधिनियमान्वये केलेल्या किंवा केल्याचे मानण्यात आलेल्या कोणत्याही अपराधाची, क्षेत्राधिकार असलेल्या जिल्हाधिकाऱ्याची मान्यता मिळेपर्यंत, कोणतेही न्यायालय दखल घेणार नाही. १८९८ चा ५.

अधिनियमाच्या तरतुदी शासनाला लागू नसणे.

**१४६-ख.** या अधिनियमान्वये करण्यात आलेला कोणताही नियम, विनियम किंवा आदेश यात स्पष्टपणे जेथवर तरतूद करण्यात आली असेल ती खेरीजकरून या अधिनियमातील कोणताही मजकूर शासनाची मालमत्ता असलेल्या व शासनाच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही मादक द्रव्यास, विप्रकृत मद्यासारयुक्त सिद्धपदार्थास, भांगेस, मोहाच्या फुलांस किंवा काकवीस लागू असणार नाही.]

या अधिनियमाच्या तरतुदी शुल्क सीमांत ओलांडून केलेल्या आयातीस किंवा निर्यातीस लागू नसणे.

**१४७.** शंकांचे निरसन व्हावे म्हणून याअन्वये असे जाहीर करण्यात येते की, या अधिनियमातील कोणतीही तरतूद [1][ * * * * * ] शुल्क सीमांत ओलांडून जे कोणतेही मादक द्रव्य किंवा इतर द्रव्य आयात किंवा निर्यात करण्यात येते त्याबाबतीत लागू होते असे समजण्यात येणार नाही.

निरसन आणि सुधारणा.

**१४८.** (१) अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिनियम हे उक्त अनुसूचीच्या चौथ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत या अन्वये रद्द करण्यात आले आहेत आणि अनुसूची दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमात त्या अनुसूचीच्या चौथ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत या अन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत.

(२) परंतु या अधिनियमातील कोणतीही तरतूद किंवा या अधिनियमान्वये जो कोणताही अधिनियम किंवा तरतूद रद्द करण्यात किंवा सुधारण्यात आली असेल त्यामुळे—

(एक) हा अधिनियम अमलात येण्यापूर्वी संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क किंवा स्वामित्व अथवा प्राप्त झालेले किंवा पत्करलेले कोणतेही बंधन किंवा दायित्व यांस बाध येणार नाही किंवा बाध येतो असे समजण्यात येणार नाही.

---

[1] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ५३ अन्वये " डोमिनियन सरकारने व्याख्या केल्याप्रमाणेचा " हा मजकूर वगळण्यात आला.

† आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ( १९७४ चा २ ) पहा.

[1][ * * * * * ]

(द) काकवीचे नमुने घेण्याचे विनियमन करणे;

[2][ (द-१) समित्या, मंडळे व वैद्यकीय मंडळे यांची रचना किंवा त्यांची नामिका व त्यांची कार्यपद्धती विहित करणे;]

(ध) दारूबंदी अधिकारी, [3][मंडळे, समित्या ] व [4][वैद्यक मंडळे व त्यांच्या नामिका] यांचे अधिकार, कामे व कर्तव्ये विहित करणे तसेच [4][मंडळाच्या, समित्यांच्या] व [3][वैद्यक मंडळाच्या व त्याच्या नामिकांच्या] सदस्यास द्यावयाची फी व भत्ते विहित करणे;

[5][(न) तज्ञ मंडळाच्या कामासंबंधी कार्यपद्धती विहित करणे;]

[6][(न-१) कलम २९ अन्वये थेट वाहतुकीच्या शर्ती विहित करणे;]

(प) या अधिनियमान्वये दिलेला कोणताही विशेष अधिकार, लायसन, परवाना, पास किंवा प्राधिकारपत्र यासंबंधी द्यावयाची फी [7][ (भाडे किंवा मोबदला यांसह) ] विहित करणे;

[8][(पप) कलम ६६, पोट-कलम (३), खंड (ख) अन्वये इतर व्यक्ती, इतर परिसंस्था किंवा परिस्थिती विहित करणे;]

(फ) कलम १०७-**क** अन्वये ज्या मुदतीच्या आत व ज्या नमुन्याप्रमाणे पत्रक सादर केले पाहिजे ती मुदत व तो नमुना आणि ज्या नमुन्याप्रमाणे हिशेब ठेवले पाहिजेत तो नमुना विहित करणे;]

[9][(ब) रक्त काढून घेण्याची व पाठविण्याची पद्धती विहित करणे आणि प्रमाणपत्रांचा नमुना व त्यात कलम १२९-**क**, पोट-कलम (२) अन्वये नमूद करणे आवश्यक असलेला इतर तपशील विहित करणे.]

(३) त्या कलमान्वये नियम करण्याचा अधिकार पूर्वप्रसिद्धीच्या अधीन असेल :

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९४ (१) (आय) अन्वये खंड (थ) वगळण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ९४ (१) (ज) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ९४ (१) (के) अन्वये "समित्या" व "समित्यांच्या" या मजकुराऐवजी अनुक्रमे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या त्याच कलमान्वये "वैद्यकीय मंडळे" व "वैद्यकीय मंडळाच्या" यांच्याऐवजी अनुक्रमे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ५१ (५) अन्वये मूळ खंड (न) ऐवजी खंड (न) ते (फ) दाखल करण्यात आले.

[6] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९४ (१) (ल) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[7] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[8] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १७ (अ) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[9] वरील अधिनियमाच्या कलम १७ (ब) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

परंतु, असे कोणतेही नियम ताबडतोब अंमलात आणले पाहिजेत असे [१][राज्य] शासनास वाटल्यास ते पूर्वप्रसिद्धी न देता करता येतील.

[२][(४) या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम, ते केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधान-मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे, तीस दिवसांहून कमी नसेल इतक्या मुदतीपर्यंत, ठेवण्यात येतील आणि ते, ज्या अधिवेशनात अशा रीतीने ठेवण्यात आले असतील त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ जे फेरफार करील त्यास अधीन असतील.]

[३][आयुक्ताचा] विनियम करण्याचा अधिकार.

१४४. (१) [३][आयुक्तास] पुढील गोष्टीसाठी, या अधिनियमाच्या तरतुदी किंवा नियम यांच्याशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील,—

(क) कोणतेही मादक द्रव्य [४] [विप्रकृत मद्यसारयुक्त सिद्धपदार्थ] किंवा भांग, मोहाची फुलें किंवा काकवी यांचा यथास्थिति, [५][ * * * * * ] पुरवठा करणे किंवा ती साठविणे यांचे विनियमन करणे; यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(एक) असे पदार्थ तयार करण्यासाठी, त्यांचा पुरवठा करण्यासाठी किंवा साठविण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही जागा आणि त्यातील जोडकामे, साधने व उपकरणे ही बांधणे, त्यांची तपासणी करणे, त्यावर देखरेख ठेवणे, त्यांची व्यवस्था पाहणे व त्यावर नियंत्रण ठेवणे;

[६][ * * * * * ]

(ख) कोणतेही मादक द्रव्य, भांग [७][ * * * * ] मोहाची फुले किंवा काकवी वखारीत ठेवणे आणि असे पदार्थ अशा कोणत्याही वखारीतून अथवा कोणत्याही दारूच्या भट्टीतून किंवा दारू गाळण्याच्या कारखान्यातून काढून नेणे याचे विनियमन करणे;

[८][ * * * * ]

(घ) [९][ * * * * ] कोणतेही मादक द्रव्य, भांग [१०][ * * * * * * ] मोहाची फुले किंवा काकवी यांच्या कोणत्याही साठ्या-संबंधी द्यावयाच्या फीचे प्रमाण [११] [(भाडे किंवा मोबदला यांसह) किंवा ज्या रीतीने अशी फी ठरविली पाहिजे ती रीत विहित करणे;

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९४ (२) अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, कलम ३ अनुसूची अन्वये " संचालकाचा " व " संचालकास " या मजकुराऐवजी अनुक्रमे हे मजकूर दाखल करण्यात आले.

[४] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९५ (अ) (२) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ९५ (अ) (१) अन्वये " उत्पादन " हा मजकूर वगळण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ९५ (अ) (३) अन्वये उपखंड (२) ते (५) वगळण्यात आले.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ९५ (ब) अन्वये " अफू " हा मजकूर वगळण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ९५ (क) अन्वये खंड (ग), (च), (छ), (ज), (ट) आणि (ठ) वगळण्यात आले.

[९] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ५२ (१) अन्वये " कोणताही विशेष हक्क " या मजकुराने सुरू होणारा व " यांच्या संबंधी किंवा " या मजकुराने संपणारा मजकूर वगळण्यात आला.

[१०] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९५ (ब) अन्वये " अफू " हा मजकूर वगळण्यात आला.

[११] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ङ) कोणतेही शुल्क किंवा फी देण्याची वेळ, जागा व रीत यांचे विनियमन करणे ;

[1][ * * * * * ]

(ज) वापरण्यासाठी अयोग्य म्हणून जाहीर केलेले कोणतेही मादक द्रव्य नष्ट करणे किंवा त्याची इतर प्रकारे विल्हेवाट लावणे यांसाठी तरतूद करणे ;

(झ) जप्त केलेल्या किंवा सरकारजमा केलेल्या वस्तुंची विल्हेवाट लावण्याचे विनियमन करणे;

[1][ * * * * * ]

(ड) [2][राज्य] शासन, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याकरिता जी कोणतीही इतर गोष्ट विहित करण्याविषयी त्यास निदेश देईल ती गोष्ट ;

(२) या कलमान्वये केलेले विनियम राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील.

१८६० चा ४५. **१४५.** या अधिनियमान्वये कोणतेही अधिकार चालविण्यासाठी किंवा कोणतीही कामे पार पाडण्यासाठी अधिकार दिलेले सर्व अधिकारी व व्यक्ती या, भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असे मानण्यात येतील.

या अधिनियमान्वये काम करणारे अधिकारी व व्यक्ती लोकसेवक असणे.

**१४६.** [3][ शासनाविरुद्ध ] किंवा कोणत्याही दारूबंदी अधिकाऱ्याविरुद्ध, पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध किंवा इतर अधिकाऱ्याविरुद्ध किंवा या अधिनियमान्वये अधिकार वापरण्यासाठी किंवा कामे पार पाडण्यासाठी अधिकार दिलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध, या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा आशय असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणताही दावा किंवा कार्यवाही चालविता येणार नाही.

कारवाई करण्यास मनाई.

[4][**१४६-क.** या अधिनियमास अनुसरून केलेल्या किंवा करण्यात आल्याचे समजण्यात येणाऱ्या कोणत्याही कृत्याच्यासंबंधात कोणताही दारूबंदी अधिकारी, पोलीस अधिकारी किंवा इतर अधिकारी यांच्याविरुद्ध किंवा या अधिनियमान्वये अधिकार वापरण्यासाठी किंवा कामे पार पाडण्यासाठी अधिकार दिलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध चालवावयाचे सर्व खटले आणि शासनाविरुद्ध किंवा उपरोक्त कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध कायदेशीररीत्या चालविण्यात येऊ शकतील अशा सर्व कारवाया या, ज्यासंबंधी तक्रार करण्यात आली ते कृत्य ज्या दिनांकास घडले त्या दिनांकापासून चार महिन्यांच्या आत दाखल करण्यात येतील आणि त्यानंतर त्या दाखल करता येणार नाहीत ; तसेच अशी कोणतीही कारवाई पुढील कारणांवरून काढून टाकण्यात येईल-

अधिकाऱ्यांविरुद्ध करावयाच्या खटल्यांची किंवा दाव्यांची मुदत.

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९५ (क) अन्वये खंड (ग), (च), (छ), (ञ), (ट) आणि (ठ) वगळण्यात आले.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " बादशाहाविरुद्ध " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९६ अन्वये ही कलमे दाखल करण्यात आली.

(क) अशी कोणतीही कारवाई करण्यापूर्वी उपरोक्त चार महिन्यांच्या अवधीत वादीस, या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये जी कोणतीही अपिले सादर करता आली असती ती अपिले त्याने सादर केली होती असे त्याने सिद्ध करून दाखविले नाही तर, किंवा.

(ख) नुकसानभरपाईसाठी केलेल्या कारवाईच्या बाबतीत, कारवाई दाखल करण्यापूर्वीच भरपाईची पुरेशी रक्कम दिलेली असेल तर किंवा कारवाई दाखल केल्यानंतर प्रतिवादीने किंवा त्याच्या वतीने न्यायालयात खर्चासह पुरेशी रक्कम भरली असेल तर.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ †, कलम १९७ च्या तरतुदींना अधीन राहून, कोणताही दारूबंदी अधिकारी, पोलीस अधिकारी किंवा इतर अधिकारी किंवा या अधिनियमान्वये अधिकार वापरण्यास किंवा कामे पार पाडण्यास प्राधिकृत करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती यांनी, या अधिनियमाखालील कोणत्याही गोष्टींच्या संबंधात, या अधिनियमान्वये केलेल्या किंवा केल्याचे मानण्यात आलेल्या कोणत्याही अपराधाची, क्षेत्राधिकार असलेल्या जिल्हाधिकाऱ्याची मान्यता मिळेपर्यंत, कोणतेही न्यायालय दखल घेणार नाही. १८९८ चा ५.

अधिनियमाच्या तरतुदी शासनाला लागू नसणे.

**१४६-ख.** या अधिनियमान्वये करण्यात आलेला कोणताही नियम, विनियम किंवा आदेश यात स्पष्टपणे जेथवर तरतूद करण्यात आली असेल ती खेरीजकरून या अधिनियमातील कोणताही मजकूर शासनाची मालमत्ता असलेल्या व शासनाच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही मादक द्रव्यास, विप्रकृत मद्यासारयुक्त सिद्धपदार्थास, भांगेस, मोहाच्या फुलांस किंवा काकवीस लागू असणार नाही.]

या अधिनियमाच्या तरतुदी शुल्क सीमांत ओलांडून केलेल्या आयातीस किंवा निर्यातीस लागू नसणे.

**१४७.** शंकांचे निरसन व्हावे म्हणून याअन्वये असे जाहीर करण्यात येते की, या अधिनियमातील कोणतीही तरतूद [१][ * * * * * ] शुल्क सीमांत ओलांडून जे कोणतेही मादक द्रव्य किंवा इतर द्रव्य आयात किंवा निर्यात करण्यात येते त्याबाबतीत लागू होते असे समजण्यात येणार नाही.

निरसन आणि सुधारणा.

**१४८.** (१) अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिनियम हे उक्त अनुसूचीच्या चौथ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत या अन्वये रद्द करण्यात आले आहेत आणि अनुसूची दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमात त्या अनुसूचीच्या चौथ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत या अन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत.

(२) परंतु या अधिनियमातील कोणतीही तरतूद किंवा या अधिनियमान्वये जो कोणताही अधिनियम किंवा तरतूद रद्द करण्यात किंवा सुधारण्यात आली असेल त्यामुळे–

(एक) ह्या अधिनियम अमलात येण्यापूर्वी संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क किंवा स्वामित्व अथवा प्राप्त झालेले किंवा पत्करलेले कोणतेही बंधन किंवा दायित्व यांस बाध येणार नाही किंवा बाध येतो असे समजण्यात येणार नाही.

---

[१] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम ५३ अन्वये " डोमिनियन सरकारने व्याख्या केल्याप्रमाणेचा " हा मजकूर वगळण्यात आला.

† आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ( १९७४ चा २ ) पहा.

(दोन) अशा हक्काच्या, स्वामित्वाच्या, हितसंबंधाच्या, बंधनाच्या किंवा दायित्वाच्या संबंधातील कोणत्याही कायदेशीर कारवाईस किंवा उपाययोजनेस अथवा हा अधिनियम अमलात येण्यापूर्वी केलेल्या किंवा करून दिलेल्या कोणत्याही गोष्टीस बाध येणार नाही किंवा बाध येतो असे समजण्यात येणार नाही आणि हा अधिनियम जणू संमत करण्यात आला नव्हता असे समजून कोणतीही अशी कारवाई पुढे चालविण्यात येईल व त्याप्रमाणे ती निकालात काढण्यात येईल ;

१८७८ चा मुंबई ५. (तीन) मुंबई अबकारी अधिनियम, १८७८, कलम २९-अ अन्वये कोणतीही शुल्के बसविण्यात आणि या अन्वये रद्द करण्यात आलेल्या अधिनियमाच्या कोणत्याही इतर तरतुदींअन्वये बसवावयाची कोणतीही शुल्के किंवा फी यांच्या वसुलीस बाध येणार नाही किंवा बाध येतो असे समजण्यात येणार नाही आणि हा अधिनियम जणू संमत करण्यात आला नव्हता असे समजून अशी सर्व शुल्के किंवा फी च्या रकमा, यथास्थिति, बसविण्यात किंवा वसूल करण्यात येतील.

(३) प्रस्तुत अधिनियमान्वये निरसित करण्यात आलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये केलेली कोणतीही नेमणूक, काढलेली कोणतीही अधिसूचना अथवा दिलेली कोणतीही नोटीस किंवा आदेश, केलेला नियम किंवा नमुना ही, प्रस्तुत अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर अमलात असण्याचे चालू राहील आणि ती प्रस्तुत अधिनियमाच्या तरतुदीअन्वये करण्यात, काढण्यात किंवा देण्यात आली आहे, असे समजण्यात येईल; आणि या अधिनियमान्वये दिलेली, अशी काढलेली किंवा दिलेली कोणतीही नेमणूक, अधिसूचना, नोटीस, आदेश, नियम किंवा ही प्रस्तुत अधिनियमान्वये अधिक्रमित करण्यात आली नसतील तर व अधिक्रमित करण्यात येईपर्यंत, तशीच अमलात असण्याचे चालू राहील. मग अशी अधिसूचना, नोटीस, आदेश, नियम किंवा नमुना करण्यास, काढण्यास किंवा देण्यास सक्षम असलेला प्राधिकारी निरसित केलेल्या अधिनियमान्वये प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याहून भिन्न असला तरी सुद्धा हरकत असणार नाही. तसेच अशी अधिसूचना, नोटीस, आदेश, नियम किंवा नमुना ही भिन्न नमुन्याप्रमाणे किंवा भिन्न नावाने करण्यात, काढण्यात किंवा देण्यात आली असली तरीही हरकत असणार नाही.

(४) या अधिनियमान्वये रद्द करण्यात आलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये दिलेले कोणतेही लायसन, परवाना, पास, प्राधिकारपत्र किंवा परवानगी अमलात असण्याचे चालू राहील आणि ती या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये देण्यात आली आहेत असे समजण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ हा राज्याच्या इतर प्रदेशात अमलात आल्याचा परिणाम म्हणून इतर अधिनियमांचे निरसन व व्यावृत्ती.

१९५९ चा मुंबई १२. [१] [१४९. [२] [* * * * ] मुंबई दारूबंदी ( व्याप्ती वाढविणे व सुधारणे) अधिनियम, १९५९ अन्वये राज्याच्या ज्या कोणत्याही प्रदेशास हा अधिनियम लागू करण्यात आला आहे त्या प्रदेशात, अनुसूची तीन मध्ये नमूद केलेले आणि त्या प्रदेशात अमलात असलेले अधिनियम, अनुसूचीच्या चौथ्या स्तंभात निर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत निरसित करण्यात आल्याचे समजण्यात येईल :

परंतु, अधिनियम अशा रीतीने निरसित करण्यात आल्यामुळे,–

(क) अशा रीतीने निरसित झालेल्या कोणत्याही अधिनियमांचा पूर्वीचा अमल किंवा तदन्वये योग्यरीत्या केलेली किंवा करू दिलेली कोणतीही गोष्ट, किंवा

(ख) अशा रीतीने निरसित झालेल्या कोणत्याही अधिनियमान्वये संपादन केलेला कोणताही हक्क व विशेषाधिकार किंवा पत्करलेली किंवा प्राप्त झालेली कोणतीही जबाबदारी किंवा बंधन, किंवा

---

[१] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १८ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९७ अन्वये "(१)" हा मजकूर वगळण्यात आला.

(ग) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमापैकी कोणत्याही अधिनियमांविरूद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या बाबतीत झालेली कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा, किंवा ;

(घ) उपरोक्त कोणताही हक्क, विशेषाधिकार, बंधन, जबाबदारी, शास्ती, जप्ती किंवा शिक्षा याबाबतची कोणतीही चौकशी, कायदेशीर कारवाई किंवा इलाज ;

यांस बाध येतो असे समजण्यात येणार नाही ;

आणि ते अधिनियम निरसित करण्यात आले नव्हते असे समजून अशी कोणतीही चौकशी, कायदेशीर कारवाई किंवा इलाज करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अमलात आणता येईल, आणि अशी कोणतीही शास्ती, जप्ती, किंवा शिक्षा लादता येईल :

परंतु, आणखी असे की,–

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमांन्वये दिलेले किंवा काढलेले कोणतेही लायसन, परवाना, पास, प्राधिकारपत्र किंवा परवानगी अमलात असणे चालू राहील आणि ते या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये देण्यात किंवा काढण्यात आले आहेत असे समजण्यात येईल ; आणि

(ख) (एक) मध्यप्रांत व वऱ्हाड उत्पादन शुल्क अधिनियम, १९१५ याचे कलम २७-अ च्या तरतुदींअन्वये, किंवा — १९१५ चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

(दोन) सौराष्ट्र प्रदेशात अमलात असलेला मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ याच्या कलम ११२-अ अन्वये, किंवा — १९४९ चा मुंबई २५.

(तीन) कोणत्याही प्रदेशात हा अधिनियम अमलात येण्यापूर्वी, या कलमान्वये निरसित झालेल्या इतर कोणत्याही अधिनियमांच्या कोणत्याही तरतुदींअन्वये,

बसविण्याजोगा कोणताही कर, शुल्क किंवा फी (यात कोणत्याही शास्तीचा समावेश होतो) देणे आणि बसविणे, त्यांची आकरणी करणे आणि वसूल करणे किंवा परत देणे यासंबंधीच्या सर्व कारणांकरिता उपरोक्त अधिनियमांपैकी कोणताही अधिनियम निरसित झाला तरीही.

या कलमान्वये अशा रीतीने निरसित झालेले संबंधित अधिनियम (यात तदन्वये केलेले सर्व नियम, विनियम, काढलेल्या अधिसूचना आणि दिलेले आदेश यांचा समावेश होतो) अशा कारणांकरिता अमलात असण्याचे चालू राहील ; आणि जणू काही ते संबंधित अधिनियम निरसित करण्यात आले नाहीत असे समजून, असे सर्व कर, शुल्क व फी बसविण्यात येईल, आकारण्यात येईल, वसूल करण्यात येईल, परत करण्यात येईल व दंड बसविण्यात येईल व यथास्थिति, तो देण्यात येईल.]

## [1] [अनुसूची एक-क

[ कलम १ (३) पहा.]

### चांदा जिल्ह्यातील हातभट्ट्या असलेले क्षेत्र.

### ( Out still area )

(१) सबंध सिरोंचा तहसील ;

(२) गडचिरोली तहसिलीतील पुढील गावे :–

(क) (१) चारगाव, (२) गोंजाली, (३) पळसगांव, (४) चिमगाव, (५) मेंढा, (६) वाडेगाव, (७) सिंगापूर, (८) कोंडलवाही, (९) चाटगाव, (१०) पांडेर, (११) मोहनदाला, (१२) पालखेडा, (१३) सुना कातिझरी, (१४) खुटगाव, (१५) गाटेपल्ली, (१६) मेंढा, (१७) हरिकाता, (१८) तोहकपूर,

[1] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १९ (१) अन्वये अनुसूची एक-क दाखल करण्यात आली.

(१९) हळदी, (२०) गाढेवाही, (२१) साकोरा, (२२) तळोधी, (२३) कर्बाफा, (२४) नवेगाव, (२५) घोटेविहिर, (२६) रानभूमी, (२७) जांबळी, (२८) रानमूल, (२९) दर्सानी, (३०) कुसुमघाट, (३१) गट्टागुडा, (३२) मारोडा, (३३) बंधोना, (३४) नवरगाव, (३५) गिलगाव, (३६) भांडीकन्हार, (३७) गजनगुडा, (३८) साखेरा, (३९) कन्हरगांव, (४०) कर्कापल्ली, (४१) रावन-झोंला, (४२) साईमारा, (४३) पेकिनकासा, (४४) सातेर्ली, (४५) सोविटा, (४६) बेनोटी, (४७) फिलेकनार, (४८) फात्री, (४९) दिटान्टोला, (५०) देवापूर, (५१) देवाडा, (५२) गवामा, (५३) रामपूर, (५४) पोतेहाव, (५५) सुर्गादेवी, (५६) राजोली, (५७) तोहनगाव, (५८) रामडा, (५९) कोटेरगाव, (६०) तुलसी, (६१) तुम्रिकासा, (६२) नागोली, (६३) कर्कुसो, (६४) मालेर, (६५) कुडेगाव, (६६) रावणपल्ली, (६७) मुरमारी, (६८) जोंगना, (६९) भागभीर, (७०) जमार, (७१) पावालीसान, (७२) पेन्डरी, (७३) बुडापूर, (७४) अहापूर, (७५) मुरान्दा, (७६) धेहनी, (७७) चिचाली, (७८) बनार्चा, (७९) लेन्गाडा, (८०) जामगाव, (८१) जुडेगाव, (८२) ताडगेला आणि (८३) कोडसी,

(ख) पुराडा पोलीस ठाणे क्षेत्रातील पुढील २४ गावांव्यतिरिक्त सर्व गावे :—

(१) चावडा, (२) रामतोला, (३) धुलडोंगरी, (४) नायचरपल्ली, (५) नवेझरी, (६) सत्तितोला, (७) खम्बाडा, (८) सजेना, (९) कन्निचक, (१०) तळेगांव, (११) मुसका, (१२) अन्गारा, १३) पळसगांव, (१४) सावताला, (१५) खोडकी, (१६) सालेन, (१७) सालेभट्टी, (१८) निमगांव, (१९) मेंढा, (२०) भावसी, (२१) भाकरूंडी, (२२) कुलकुली, (२३) नवेगांव आणि (२४) तुलतुली;

(ग) अहेरी पोलीस ठाणे क्षेत्रातील पुढील ३३ गावांव्यतिरिक्त सर्व गावे :—

(१) लग्गम, (२) लग्गम-चक, (३) रामपूर, (४) बोरी, (५) कुलथा, (६) राजूरस्यक, (७) टिकेपल्ली, (८) चतु गुन्तापच, (९) तुमरगुन्डा, (१०) दामपूर, (११) बौदूकपल्ली, (१२) कोठारी, (१३) मारपल्ली, (१४) मोरारली, (१५) चिचेला, (१६) गोमी, (१७) अलबतपल्ली, (१८) फुसकी, (१९) मुकडी, (२०) फुस्की-चक, (२१) धानू, (२२) येल्ला, (२३) माच्छली गड्डा, (२४) नागलवाही, (२५) सिंगन पल्ली, (२६) चौडमपल्ली, (२७) चामप्राला, (२८) लग्गमहट्टी, (२९) कोपराल्ली, (३०) सिंगनपेठ, (३१) मचली, (३२) गोमनी-चक, आणि (३३) कोडेगाव.]

---

## अनुसूची एक

(कलम १४८ पहा.)

| वर्ष (१) | क्रमांक (२) | संक्षिप्त नाव (३) | निरसनाची व्याप्ती (४) |
|---|---|---|---|
| [1][* | * | * | * ] |
| १८७८ .. | ५ | मुंबई अबकारी अधिनियम, १८७८ .. | कलम २९-अ व्यतिरिक्त सर्व तरतुदी. |
| १९४७ .. | ३० | मुंबई काकवी अधिनियम, १९४७ | संपूर्ण. |

[1]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १९ (२) अन्वये ही बाब वगळण्यात आली.

## अनुसूची दोन

(कलम १४८ पहा.)

| वर्ष (१) | क्रमांक (२) | संक्षिप्त नाव (३) | सुधारणांची व्याप्ती (४) | |
|---|---|---|---|---|
| १८९० .. | ४ | मुंबई जिल्हा पोलीस अधि-नियम, १८९०. | १. कलम ४६ मध्ये--<br>(क) पोट-कलम (४) मध्ये " खंड (२) व (३)" ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात यावा :--<br>"(२) मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९, कलम ६५ किंवा ६८" ; | १९४९ चा मुंबई २५ |
| | | | (ख) पोट-कलम (६) मध्ये "मुंबई अबकारी अधिनियम, १८७८ किंवा अफू अधिनियम, १८७८ अन्वये " या मजकुराऐवजी, "मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ अन्वये " हा मजकूर दाखल करण्यात येईल. | १९४९ चा मुंबई २५. |
| | | | २ कलम ६१-अअ हे वगळण्यात यावे. | |
| १९०२ .. | ४ | मुंबई शहर पोलीस अधि-नियम, १९०२. | १. कलम २७ मध्ये--<br>(क) पोट-कलम (२) मध्ये, "मुंबई अबकारी अधिनियम, १८७८ किंवा अफू अधिनियम, १८७८ अन्वये" या मजकुराऐवजी, " मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ अन्वये" हा मजकूर दाखल करण्यात यावा.<br>(ख) पोट-कलम (२-अ) मध्ये "खंड (दोन) व (तीन) "ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात यावा.<br>"(दोन) मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ कलम ६५ किंवा ६८". | १९४९ चा मुंबई २५. |
| | | | २. कलम १२२-अ वगळण्यात यावे. | |
| [1][१९५१ | २२ | मुंबई पोलीस अधिनियम, १९५१. | कलम ५७-मध्ये--<br>(क) खंड (ब), उपखंड (२) मध्ये "किंवा मुंबई राज्याच्या" या वाक्याने सुरू होणारा व "किंवा कलम ९ अन्वये" या वाक्यावर संपणारा मजकूर वगळण्यात यावा.<br>(ख) खंड (क) मधील "वरील मद्यनिषेध अधिनियमाच्या" या मजकूराऐवजी "मुंबई दारू-बंदी अधिनियम, १९४९ याच्या" हा मजकूर दाखल करण्यात यावा.] | १९४९ चा मुंबई २५. |

[1]सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ९८ अन्वये ही नोंद जादा दाखल करण्यात आली.

## [1][अनुसूची तीन

(कलम १४९ पहा.)

| वर्ष (१) | क्रमांक (२) | संक्षिप्त नाव (३) | निरसनाची व्याप्ती (४) |
|---|---|---|---|
| १८७८ | १ | अफू अधिनियम, १८७८, मुंबई राज्यास लागू असेल तेथवर. | संपूर्ण. |
| १९१५ | २ | मध्यप्रांत व वऱ्हाड उत्पादन शुल्क अधिनियम, १९१५. | कलम २७-अ व्यतिरिक्त सर्व तरतुदी. |
| १९३८ | ७ | मध्यप्रांत व वऱ्हाड दारूबंदी अधिनियम, १९३८. | संपूर्ण. |
| १३१६ फसली | १ | अबकरी अधिनियम. | संपूर्ण. |
| १३३३ फसली | ४ | हैद्राबादचा मादक औषधींबाबत अधिनियम | संपूर्ण |
| १९४९ | २५ | मुंबई राज्याच्या सौराष्ट्र क्षेत्रात अमलात असलेला मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९. | कलम ११२-अ व्यतिरिक्त सर्व तरतुदी. |
| १९४९ | २५ | मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशात अमलात असलेला मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९. | संपूर्ण.] |

[1]सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १९ (३) अन्वये अनुसूची तीन जादा दाखल करण्यात आली.

(यथार्थ अनुवाद)

**प. ग. पाटील,**

भाषा संचालक,

महाराष्ट्र राज्य.